# ाम्हीं खेडवळ माणसं



एका खेड्यांतील जीवनाचं नि भल्याबुऱ्या
भावभावनांचं हळुवार चित्रण

अमर ज्योति
वाङ्मय

पुष्प १० वें

विद्यार्थी-मार्गदर्शन


ए. परब,
एम्. ए. एस्. टी. सी.

एस्. एस्. पाटकर,
एम्. ए. एस्. टी. सी.


-१४८. ] दी-पा-व-ली—१८७१ [ मूल्य रु. २।



रघुवीर सामंत

# ाम्हीं खेडवळ माणसं



एका खेड्यांतील जीवनाचं नि भल्याबुऱ्या
भावभावनांचं हळुवार चित्रण

अमर ज्योति
वाङ्मय

पुष्प १० वें

विद्यार्थी-मार्गदर्शन


ए. परब,
एम्. ए. एस्. टी. सी.

एस्. एस्. पाटकर,
एम्. ए. एस्. टी. सी.



-१४८. ] दी-पा-व-ली—१८७१ [ मूल्य रु. २।




रघुवीर सामंत

—रघुवीर सामंत संपादित—

★

अमर ज्योति
वाङ्मय

★

**आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या!**

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

**मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवाङ्मय**

# आम्ही खेडवळ माणसं

(ग्रामीण जीवनाचं व त्याच्या पुनर्रचनेचं हृद्य चित्र)

—: लेखक :—

रघुवीर सामंत

(श्री. दिनकर पांडुरंग रेगे यांच्या
मूळ छोट्या स्थूल गोष्टीच्या आधारें.)

: मार्गदर्शक :

श्री. बी. ए. परब, एम्. ए., एस्. टी. सी. • श्री. एस्. एस्. पाटकर, एम्. ए., एस्. टी. सी.

[ मराठीचे अध्यापक : चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुंबई ४. ]

अमर ज्योति वाङ्मय

पुष्प-१० वें . दीपावली १८७१

—: प्र का श क :—

र. ज. सामंत, बी.ए., बी.टी.
१४, बी. हरजीवनदास एस्टेट,
व्हीन्सेंट रोड, दादर मुंबई १४

*

अमरज्योति वाङ्मय
पुष्प १० वें
['पारिजात प्रकाशन'च्या]
सहकार्यानें

मूल्य २। रु.

[ पृष्ठें १४८ ]
दी पा व ली
१८७१

*

पुनर्मुद्रण, उद्धृतीकरण प्रकट वाचन, ध्वनि-मुद्रण, ध्वनि-क्षेपन, नाट्यीकरण, चित्रीकरण इत्यादि सर्व हक्क श्री. र. ज. सामंत यांजकडे

—: मु द्र क :—

र. ज. सामंत, बी.ए., बी.टी.
सागर साहित्य छापखाना
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४.

# रघुवीर सामंत—

[त्रोटक परिचय]

[रघुनाथ जगन्नाथ सामंत, बी.ए.बी.टी; जन्म २४ डिसें.१९०९]

बालपणापासूनच लेखनांची फार हौस; १९२८ नंतर 'कुमार रघुवीर' या टोपण नांवानें 'प्रगति' साप्ताहिकांत प्रथमच प्रामुख्यानें चमकण्याचा योग; 'शद्बचित्र' या स्वतंत्र नवीन वाङ्मय प्रकाराला मराठींत रुढ व स्थिर करण्याचें प्रमुख श्रेय.

'आप्पांची बैलांची जोडी', 'सुभान्या', 'व्हिक्टोरीआवाला,' 'चिनी,' 'अंत्रभिकारी,' 'पाटीवाली' इ. शालेय पाठ्य–पुस्तकांतील शद्ब-चित्रात्मक उद्धृत उताऱ्यांमुळें व 'गीत-ज्योती' इ. 'अमर ज्योती वाङ्मय' पुष्पांमुळें बालजगांत परिचित; 'हृदय' 'वाळूंतील पावलें' या पुस्तकांचा विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत व 'पणत्या' 'मासलेवाईक प्राणी' या पुस्तकांचा शालेय पुरवणी-वाचनांत कित्येक वर्षें समावेश.

अव्वल दर्जाच्या रसिक 'पारिजात' (१९३३-३५) मासिकाचें व 'ज्योती' (१९३९-४१) मासिकाचें संपादन–प्रकाशन; शद्बचित्र, लघु-निबंध ('चित्रबंध'?), लघुकथा, काव्य (सांघिक), कादंबरी, चरित्र, प्रवास-वर्णन, बाल–वाङ्मय, नभो–नाट्य, इ. विविध ललित वाङ्मय प्रकार हाताळून सुमारें अठरा वीस ग्रंथांचें प्रकाशन.

चार स्वयंपूर्ण खंडांतील सुमारें १०।११शें पृष्ठांची व सुमारें शंभर लहानमोठ्या पात्रांना कुशलतेनें हलवणाऱ्या व्यापक कथानकाची मराठींतील पहिलीच प्रदीर्घ सामाजिक कादंबरी– 'उपकारी माणसें' यांच्याच लेखणींतून उतरलेली.

यांचें सारेंच वाङ्मय सोज्वळ, जिव्हाळ्याचें, वास्तववादी, कलात्मक पण अनभिनिवेशी; व्यापक जीवनानुभवाचा पाया, सूक्ष्म निरीक्षण, सखोल व्यक्ति-दर्शन, भाव–विचारांची मोहक सांगड घालणारी मनाची बैठक, निर्दोष

आकर्षक रचना-मांडणी, हुबेहूब वर्णन-शैली, साधी ओघवती सूचक भाषा-शैली, अर्थव्यक्तीसाठीं विराम-चिन्हांचा (क्वचित् फाजील ठरणारा) उपयोग, इ. सामंत-वाङ्मयाचे बरेवाईट विशेष.

१९३८ जूनपासून मुख्यतः शिक्षकाचा पेशा ठेऊन, लेखन-प्रकाशन, मुद्रण-संपादन-व्यवसाय व्याप; नभो-नाट्य, काव्यगायन, ध्वनिमुद्रित-गायन, अध्यापन इ. बाबत हौशी भूमिकेनें कित्येक प्रयोग; पण अन्यतः अबोल व प्रसिद्धिपासून दूर राहण्याची नैसर्गिक एक-कल्ली वृत्ती.

P.S.W.-K.G.K.
15-8-48

## — आ गा मी सा मं त वा ङ्म य —

चिमण्या जगाचे नेते -[शालेय जीवनावरील कादंबरी]
कानगोष्टी- [ लघुनिबंध ]
आम्हाला जगायचं आहे !- [ संक्रमण कालीन भारताची कादंबरी]
पाण्यावरल्या रेघा - [ लघुकथा ]
जिवंत माणूस-[ झुंजार व्यक्ति-जीवनावरील कादंबरी ]
मासलेवाईक प्राणी—२ [ स्वभाव-चित्रें ]

— य था का ल प्र का शां त ये ई ल —

****★

अमर बापूजींच्या नवभारतांतील

रानावनांत विखुरलेल्या खेड्याखेड्यांच्या कोनाकोनांत, (आशा, पावित्र्य, प्रेम नि ज्ञान यांची) जागती मशाल समता-सुखासाठीं चौफेर फिरवून, जिथं तिथं खरीखुरी जाग व कार्यप्रवणता आणण्यासाठीं, आपल्या जीवाचं घोर रान व जीवनाचं अमोल दान खऱ्या तळमळीनें व अविश्रांत अखंडपणें करणाऱ्या

मुग्ध, प्रसिद्धिपराङ्मुख नि अविरत कर्मयोगी अशा

**सुसंस्कृत, सुशिक्षित, त्यागी जीवांना—**

व

त्यांच्याच प्रेमाच्या पखरणींत, त्यांचाच हात धरून खऱ्या प्रगति-पथाची वाटचाल करणाऱ्या

**लक्षावधि निरागस खेडवळ जीवांना—**

★****

## —आम्हीं खेडवळ माणसं—

### [अनुक्रमणिका]


| | |
|---|---|
| अर्पणपत्रिका ... ... | १ |
| अनुक्रमणिका ... ... | २ |
| मोहनचं पत्र ... ... | ३ |
| गांवच्या वेशीपाशीं ... | ५ |
| जळजळणाऱ्या ज्वाला ... | १३ |
| धुमसती आग ... ... | १६ |
| सतीची आग ... ... | १९ |
| निसर्ग आणि मानव ... | २२ |
| धनाची किमया ... ... | २५ |
| देव आणि मानव ... ... | २७ |
| मदोन्मत्त हत्ती ... ... | २९ |
| माईचं वृंदावन ... ... | ३१ |
| गरिबाचं घरकुल ... ... | ३३ |
| पोरीचे अश्रू ... ... | ३६ |
| मंतरलेला बुडकुला ... | ३९ |
| बुडकुल्याचं गुपित ... | ४२ |
| शृंखला तुटल्या ... ... | ४३ |
| देवीचा प्रसाद ... ... | ४७ |
| गोड स्वप्न ... ... ... | ४८ |
| सिद्ध-साधकांची दुक्कल ... | ५० |
| देवांची सभा ... ... | ५५ |
| दरिद्री कर्ण... ... ... | ५९ |
| अमृताचा झरा ... ... | ६४ |
| देव-दानवांची कुस्ती ... | ६७ |
| वांकडा पेंच ... ... | ७१ |
| रणभेरी ... ... ... | ७३ |
| देवळांत दानव ... ... | ७८ |
| मानवांतला सैतान ... | ८० |
| माणुसकीची यातना ... | ८४ |
| आकाश-वाणी ... ... | ८७ |
| शत्रूची मैत्री ... ... | ९० |
| अंगावर उलटलं ... ... | ९१ |
| संताचा अवतार ... ... | ९६ |
| आनंदाचा प्रकाश ... | ९८ |
| हस्तांदोलन ... ... | १०० |
| नवा कारभार ... ... | १०१ |
| नवीं आंदोलनें ... ... | १०५ |
| सुंदर काया-पालट ... | १०७ |
| एकादशीचं स्नान ... | ११० |
| मतमतांचा गलबला ... | ११२ |
| आचार आणि विचार ... | ११५ |
| सत्याग्रह-सत्यानंद ... | ११८ |
| जिवंत माणसांची रीत ... | १२० |
| नवा संसार ... ... | १२३ |
| नवी दृष्टी ... ... | १२६ |
| नवें जग-नवे देव ... | १२८ |
| नवे पाश ... ... | १३१ |
| नवे नागरिक ... ... | १३३ |
| नवा धडा ... | १३५ |


आजच आलेलं मोहनचं पत्र—

' विद्या-मंदिर ';—सुंदरगांव.
१५-८-४८

प्रिय रसिक—

तसं म्हटलं—तर साधीसुधी अशीच-' आम्हीं खेडवळ माणसं !..' तरी पण, अगदीं आडपडदा न ठेवतां, आम्हीं तुम्हाला आज प्रथमच भेटायला येत आहोंं. विशेषतः, तुमच्यांतल्या किशोर-कुमारांना भेटायला आम्हाला जितका आनंद वाटतोय्, तितकाच, आमच्या भेटीअंतीं, तुम्हाला-सुद्धां तो वाटेल, अशी मला खात्री वाटते.

आमच्या सुंदरगांवांतल्या, आजकालच्याच जमान्यांतल्या कांहीं नव्या-कांहीं जुन्या व्यक्ति; त्यांच्याच आयुष्यांतले हे कांहीं नवे-जुने सुखद-दुःखद खरेखुरे प्रसंग...असे तुमच्यापुढं इथं आहेत. त्या त्या वेळचे आमचे ते विचार नि आमच्या खेडवळ...साध्यासुध्या पण उत्कट अशा त्या भाव-भावना; आमचे ते अधःपात नि आमची ती छोटी-मोठी प्रगति !... सारं कांहीं—

या हळुवार भावपूर्ण शब्दपटाच्या ओघांत एकदां तुम्हीं शिरलांत, नि त्या त्या परिस्थितींत, त्या त्या व्यक्तींशीं, त्या त्या वेळच्या त्यांच्या भाव-जालांशीं नि विचार-मालिकांशीं रसिकपणें समरस होऊन, धडकत धडकत, सुख-दुःखं अनुभवित, तुम्हीं अखेरपर्यंत प्रवास केलांत, तर मला वाटतं, या आमच्या साध्यासुध्या जीवन-कथेतूनहि, तुम्हाला एक प्रकारचं सोज्वळ मनोरंजन, प्रसन्न समाधान, आणि हितकर उद्बोधनच लाभेल.— [मला कल्पनाहि नव्हती, आमच्या या सुंदर सुंदरगांवाचं असं सर्वांगीण शब्दचित्र इतक्या हळुवार हुबेहूबपणें आमच्या इतर भारतीय बांधवांपुढें ग्रंथरूपानें इतक्या झटपट कोणी ठेवील, अशी !— ]

आतां असं पहा—महात्माजी, सरदार पटेल, राजेन्द्र प्रसाद, जवाहरलाल, जयप्रकाश नि असल्याच इतर थोरामोठ्यांच्या कृपा-पुण्याईनें, आतांच कुठं तुम्हां शहरवासी जनांची आमच्याकडे नि आमच्या खेड्यांकडे थोडीशीं दृष्टि वळतेय्!-तीच त्या महाभागांची खरी पुण्याई...खरी कृपा!-म्हणूनच, तर आजचीं खेडीं अशीं खडबडून जागीं झालीं आहेत; झपझप सुधारण्याच्या मार्गाला लागलीं आहेत. आतां तर आपण गेल्याच वर्षी स्वतंत्रहि झालों;...आपल्या स्वातंत्र्याला एक वज्रलेप कालिमा लागला खरा; पण स्वत: बापूंनीं तरी आपल्या देहमनाची पवित्र विभूतीहि अखेर खेड्याखेड्यांच्या कणाकणांत उधळून,...आपली जीवन-यात्रा दिव्यपणें संपवली आहे!—आतां खेड्यांचा अभ्युदय हा सूर्यप्रकाशासारखा अगदीं ठरलेलाच!—

आपल्या या भारतांत लक्षावधी खेडीं आहेत. एकट्या या मुंबई प्रांतांतच एकवीसहजार कीं कितीशीं आहेत, म्हणे. त्यांतल्याच एकामध्यें कांहीं वर्षांपूर्वी, देवांनीं बुद्धी दिली म्हणून मी शिरलों. आजहि तिथंच आहे; व उद्यांहि असेन अशी खात्री आहे. कांहीं भरीव कार्य केलं असल्याच्या व करीत असल्याच्या समाधानांतहि मी आहे.

—पण हें झालं माझं-या मोहनचं; हें झालं-आमच्या खेड्याचं...या सुंदरगांवाचं!- अशीं नि याहूनहि सुंदर सुंदर 'सुंदरगांवं' भारतांत जिकडे तिकडे व्हायला नकोत का? पण मग, आज शिक्षण घेऊन पुढें येणाऱ्या तुमच्याच वाढत्या सुशिक्षित पिढीचं नव्हें कां हें काम?—काय, करतां हां काय, तुम्ही सगळे,...त्या आयत्या जीवनानें गजबजलेल्या शहरा-शहरां-मध्यें?-या...या खेड्याखेड्यांत जरा शिरून पहा ना;.तिथं रहा ना!...

...निदान, आधीं एकदां आमचं सुंदरगांव प्रत्यक्ष पाहायला आमच्या या 'गांवच्या वेशीपाशीं' तरी या—

तुमचा नम्र

**मोहन**

# —गांवच्या वेशीपाशीं—

त्याच्या पंगतीला बसून, त्याचा तसा अगंतुक साधासुधा पाहुणचार घेतांना, माझ्या मनाला मौज वाटत होती. त्यानें प्रेमानें दिलेला विडा चघळीत, पडवींत तक्या-चटई टाकून बसल्या बसल्या, तासापूर्वीच्या त्या गोंधळाचं माझं मलाच हसूं येत होतं.

तोहि हळूच हंसला;..लांबून भजनाच्या टाळ-मृदुंगांचा अस्पष्ट पण सुरेळ ठेकेदार आवाज ऐकूं येत होता—

"चला...पण त्या निमित्तानंच कां होईना, आज तुम्ही आमच्या पंगतीला तरी लाभलांत!...माझ्या म्हाताऱ्याच्या हातचं पिठलं-भात जेवलांत!...नाहींतर आतां बसणार होतां..तिकडं.. तात्या-माईकडे,....मोहन-मंजीताईकडे,...सदबांकडे! ...किंवा तें भजन चाललंय् ना याक्षणीं, गणरायासमोर?...तिथं!... तें कांहीं नाहीं;..अशा योगायोगाच्याच गोष्टी असतात बघा, देवाऽ, या साऱ्या!... ना ओळख...ना पाळख!... कधीं येणार-भेटणार होतां कशाला तुम्ही या गरीबाला?.वाः!आनंद वाटला जिवाला!"

★

आणि खरंच होतं तें त्याचं!..किंबहुना,..त्या गांवाला तरी कशाला मुद्दाम जाणार होतों मी?

दहा वर्षांपूर्वींचा माझा शाळेंतला एक विद्यार्थी-मोहन! गेलीं सहा वर्षे तो तिथं राहिला होता; आतां तर तिथला स्थानिकहि झाला होता, म्हणा. गेल्याच वर्षापासून तो माझ्यामागं लागला होता; म्हणूनच शेवटीं, यंदा स्वातंत्र्याच्या पहिल्या वर्षी तरी त्याच्या गांवच्या गणेशोत्सवांत तिथल्या गांवकऱ्यांपुढं कांहीं

‘सांघिक गीतं’ म्हणायचं मी कबूल केलं होतं; नि निघालों होतों.

पण शेवटीं, दशमी-एकादशींचा पंचांगी गडबडगुंडा करून, आज असा मी आधल्याच दिवशीं तिथं पोहोचलों होतों! तो सुद्धां (मोटार नादुरुस्त झाल्यामुळें) अवेळीं;...तें सुद्धां, गांवापासून मैलभर लांब असलेल्या मोटार रस्त्याला;...तें सुद्धां, अगदीं तीन्हीसांजेनंतर,..थोडाथोडा झिम्‌झिम् पाऊस पडत असतांना;... अगदीं खडाफटिंग...एकटा...

तिथं सभोंवार हिरवंगार गवत वाढलेलं;..काळोख किनाट पडलेला;..आलेल्या आभाळींत चंद्रही लपलेला;..गांवचा थांगपत्ता नाही;..अनोळखी भागांतला रस्ता माहीत नाहीं;..भोंवतीं तर किर्र किर्र वाजतयं;..माणसाची ये-जा नाही-नि वरून झिम्‌झिमतयं; अंगालाहि वारं झोंबतयं...

कोणी माझ्या स्वागताला आलं नाही म्हणून उलट मनांत मी रागावलोंच होतों;...पण समोर दिसली ती पाऊलवाट धरून, शेवटीं, रबरबीत चिखलांतूनच अडखळत-चांचपडत मी कसा बसा चालूं लागलों !...

★

शहरांतल्या रस्त्यातूनच नेहमीं वांवरणारा मनुष्य, मी! त्या भयाण वातावरणांत, त्या अपरिचित परिस्थितींत, थोडा गोंधळलों..घाबरलों मी,..तर आश्चर्य कसलं?

पण तेवढ्यांत, माझ्या कानावर दूरवरचा घंटानाद ऐकूं आला,..हळूहळू नगाऱ्याचा मंद-गंभीर अस्पष्ट ध्वनीहि हवेंत



भरला;...तेव्हां मग, मोठ्या आशेनें त्या बाजूला पावलं टाकीत–मी भोंवतीं निरखून पाहिलं...

अभ्राच्छादित चंद्रप्रकाशांत, साधारण हांकेच्या अंतरावर, एका बैठ्या देवळाचा कळस नि वरचं छोटंसं त्रिकोणी निशाण मला अगदीं अस्पष्ट दिसलं;...तिथला लुकलुकणारा दिवा पाहून मला एकदम हायसंच वाटलं;...नि मग त्याच दिशेनें झपाझप पावलं टाकूं लागलों मी...

इतक्यांतच, देवळांतल्या नगाऱ्याचा पुन्हां प्रचंड गडगडाट नि घंटानाद, आळीपाळीनें पण एकदम पिसाटासारखा जोरजोरानें होऊं लागला; मी दचकलोंच!..क्षणभर थबकलोंहि;..तरी पण पुढें चालतच राहिलों, धीर करून...

तशीं दोन पावलं टाकतों, नाहीं,..तोंच ‘हाः हाः हाः हाः’-असा मोठमोठ्यानें झालेला खदखदाट त्या देवळांतूनच बाहेर धांवत आला. त्याच वेळीं एक उंच व्यक्ती, धांवत-हंसत धांपा टाकीत, माझ्याच बाजूला जोरानें येत असतांना मला दिसली...

तें सारं वातावरण अगदीं अनोळखी नि अद्भुत; त्यांत पुन्हां तो चमत्कारिक असाच अनुभव! माझे तर...त्या बाजूस चालतां चालतां...पाय लटलटूंच लागले; वाचलेल्या-ऐकलेल्या खेडेगांवांतल्या भूत-पिशाच्चांच्या... साऱ्या कथा-कल्पना... माझ्या डोळ्यांपुढें एकदम दाटी करूं लागल्या.

★

“ हाःऽ हाः-डंका वाजतोय् सदबांचा!...हहहऽ क्!... घनघनतंय् नांव तात्यासावकारांचं !!...अन् मी? हृहहृऽक्?...

भूत-येताळ,...काळभैरव,...टोळभैरव...मी !... भिरभिरतोय् मी वारा जनुं वेशीपासच्या मसनांत !...हां!...आलारेऽआला !..भैरव आला !... आग्यायेताळ आला !!... हि हि हिऽक् - हहहऽक् -" असं मोठमोठ्यानें बडबडत, ती उंच धिप्पाड व्यक्ती,...माझ्या रोखानें, त्या पाऊलवाटेनेंच,...जवळ जवळ येत होती.

माझ्या अंगाला तर दरदरून घामच सुटला; पाय लटपटले. देऊळ अगदीं जवळ दिसत होतं;..तरी माझं एकहि पाऊल पुढं पडेना. शेवटीं,...मी जागच्या जागीं थबकलों...थिजलों !..

तशी ती व्यक्तिही...टवकारून माझ्याकडे पाहात...एकदम थबकली. एक शब्दहि फुटेना माझ्या तोंडून भीतीनें—

तसे समोरासमोर आम्ही उभे;..भोंवतीं सारी शांतता !- त्यांतच किर्रकिर्र...डरांवडरांव !...

...तेवढ्यांतच आणखी...ती आकृती-कांहीं एक न बोलतां- माझ्या जवळ जवळच येऊं लागली—

मी घाबरलोंच होतों;...बोलवत नव्हतं;...पण माझे पाय ( नकळत काम करून ) एकेक पाऊलं मात्र मागं घेत होते !-माझे डोळे समोरचं सारं टवाकरून पाहात होते—

★

डोक्यावर लांब केसाच्या अस्ताव्यस्त उडणाऱ्या झिंज्या;.. दाढी-मिशांचं भलं भेसूर जंगल;...कमरेला गोणपाटासारखं कांहीं जाडजूड फाटकंतुटकं लपेटलेलं...अगांत लक्तरं झालेली बंडी—



अतिशय बिचकून, भयभीत अंतःकरणानें मी मागं मागं होतोंय्,..तोच,...तो मघांपेक्षांही मोठ्यानें एकदां हसून, मग कुज-बुजत म्हणाला-"अरं थांब बेट्याऽ-चाललाऽस कुटं ? मी येतोंय् तुज्याकडं ! अंऽ,अरं नाय् बसतं तुज्या मानगुटीवर !-नाय् फोडत तुजी हंडींमडकीं;...नाय् ओढून नेत तुजं गायवासरूं !-ऐक, माजं ऐक;..नको देवू तूं याज अन् करज !-मेला..तो लकपती मेला !-आन् तो तात्यासावकार बि मेल्यागत हाय् !-जातूस ? जा...बरं जा.. तुज्या घरीं; जा..सुकान् ऱ्हा!..माज्यारेऽ बाचं काय जायचंय् ?-मी तुज्यागत आन् तूं बी माज्यागतच !-मंग मी सावकाराचं कुत्रं कां होवूं ?..नाय् व्हनार !-तुला वरबडुन, तुज्यावर बसकन् वरडून,.. त्याचं घर नाय् भरणार मी !-जा निचीत जा—"

प्रथम मला गुदमरल्यासारखं झालं,..पण त्याची हालचाल, त्याचं बोलणं...हळूहळू सौम्य होत गेल्यामुळें, शेवटीं,... मला थोडा धीरहि आला.

★

तोंच,...देवळाजवळचा कंदील हलला. कोणी तरी तो घेऊन पुढं येत ओरडलं-" कुठंऽ रे चाललास,...पावसापाण्यांतून मरायला ?...कोणाशीं बोलतो आहेत ? अंऽ ? चल ! चल आधीं,.. फीऽर मागं !-येतोऽस कीं नाहीं ?-"

त्या नव्या मानवी आवाजानें मात्र मला खरा धीर आला. माझ्यासमोरचा विचित्र प्राणीही झटकन् भानावर आला...नि म्हणाला—" आलों...आलोंऽ, पुजारीदाऽ—"

नि तेवढ्यांतच माझ्याकडे एकदम दचकून पाहात तो म्हणाला- " अंऽ?... तुमी कोन ? नवं पावनं ? आन् हितं कां

काळुकात येड्यावानी उबऽ!... चला ना आमच्या गांवात—गणपती येवाचा उत्सो हाय् तितं—"

तो माझ्या बराच जवळ आला होता; पण मघांपेक्षां किती तरी भानाबर आला होता; तरी माझ्या छातींतली धडधड साफ कमी झाली नव्हती.

तेवढ्यांत, कंदील घेऊन पुजारीच तिथं पोंचला; मला पहातांच, तो लगबगीनें पुढें झाला; माझा जीव आतां खरा भांड्यांत पडला; माझी चौकशी करून त्यानें मला देवळाकडे आस्थेवाईकपणं नेलं; तो विचित्र प्राणी त्यानंतर एकदम गप्प झाला तो गप्पच !-पुजाऱ्यानं माझं मग यथास्थित आदरातिथ्य केलं होतं!-

★

अगदीं या क्षणापर्यंत त्या विचित्र प्राण्याचा पुन्हां आवाज-हालचाल ऐकूं आली नाही; म्हणून आश्चर्यानेंच, शेजारीं चटईवर बसलेल्या पुजाऱ्याला मी विचारलं-"वेडाऽ का आहे तो ?... "

"कोण नसतं वेडं जगांत ?- म्हटलं तर वेडा आहे !—नाहीं तर शहाण्यांतला शहाणा !-" पुजारी हंसून मला म्हणाला.

"म्हणजेऽ?" मी गोंधळलों. माझ्या मनातल्या उत्सुकतेला त्याचं तें तत्वज्ञान झेंपेना.

"आमच्या या गांवांत तो वेड्यासारखाच फिरतो;...पण कधीं कोणाला दगड मारत नाही!... पोरंसुद्धां याच्याजवळ जायला घाबरत नाहीत ! कारण गांवांत तो फिरतो, तो अगदीं तोंड बंद करून !... गांवांतल्या विहिरीजवळ, धर्मशाळेत, मुलांच्या शाळेजवळ,...भिरीभिरी कावरंबावरं पहात,...तो गप्प



बसून राहील, किंवा चालेल;...पण असा इकडे वेशीकडे,..देवळाकडे आला नाऽ, कीं एकदम कधीं तरी झटका येतो त्याला !-धांवतो...बडबडतो...ओरडतो...हंसतो..."

"हो, त्या झपाट्यांतच सांपडलों होतों मी मघां !" मला तें सारं आठवूनही अंगावर पुन्हां शहारे आले; पण मी पुन्हां म्हणालों... "पण आहे काय हें गौडबंगाल? -झाला कसा तो वेडा? केव्हां ?"

पुजारी हंसला नि म्हणाला- "तें त्याचं गौडबंगाल समजायला आमच्या गांवचंच गौडबंगाल ठाऊक असलं पाहिजे!- मोठा इतिहास आहे तो !-तो वेडा झाला कुऱ्हाड मारायला उठल्यानंतर !..पण त्याला सुरवात खरी झाली...गांवांत आग लागली तेव्हां..."

"आऽग लागली ?... कसली आग ?... कधींऽ ?" मी कुतुहलानें विचारलं-"कुऱ्हाऽड मारली ?..कोणी ?..कोणाच्याऽ ?"

★

पुजारी हंसला नि क्षणभरानें म्हणाला- "अनयासं आलांच आहांत गांवाला आमच्या !..योगायोगानें आज आणखी मुक्कामहि केला आहांत, वेशीपाशीं;..उद्यां प्रत्यक्ष गांव पाहाणार आहांतच !..तेव्हां,..ऐकाच आमच्या गांवच्या सगळ्यां गोष्टी या म्हाताऱ्याच्या तोंडून!- झोंप नाहीं ना येत ?... "

"छे छे !...सांगा कीं..." मी अतिशय उत्सुकतेनेंच भिंतीला टेकून ताठ बसत म्हणालों.

"ठीऽक...आपल्यासाठीं दोन गाद्या टाकतों...तुम्हाला मघां

भेटलेला तो अवलीया, देवळांत नीट झोंपलाय् कीं नाहीं तें पाहतों,...देवळाला कुलूप लावतों,...नि येतोंच सुरवात करायला—" पुजारी उठतां उठतां म्हणाला.

★

त्या म्हाताऱ्याची थंड, प्रशांत वृत्ती मोठी गंमतीची वाटली मला; त्याला ना आगा ना पिछा;...त्याच्याच आसऱ्याला तो दुसरा अवलीयाहि राहावा, यांत कसलं आश्चर्य नव्हतं !

तोंच लगबगीनें पुजारी परत आला; माझ्याइतकाच तोहि सारं सांगायला उत्सुक होता.

आणि मग, त्या गांवच्या वेशीपाशीं तटस्थपणें वर्षानुवर्ष बसलेल्या, त्या अनुभवी, गंभीर पण बोलक्या म्हाताऱ्याच्या तोंडून, त्या वेशीवरल्या देवळांत बसूनच, त्या गांवाचा मी परिचय करून घेत होतों—

"त्या आगीचं म्हणजे असं झालं बघा—" म्हाताऱ्यानें मला सांगायला सुरवात केली—

---

# लळलळत्या ज्वाळा ! १

## १

त्यारात्रीं आमची वाडकरमंडळी, आपापल्या सुखदुःखांत आनंदांत तळमळत, नेहमींप्रमाणें निद्रादेवीच्या आधीन झालीं होतीं. इतक्यांतच, मध्यरात्रींच्या सुमारास सारीं एकाच धसक्यानें एकाएकीं जागीं झालीं !... एकदम चौफेर ओरडा झाला— 'आग !— आग !!'

ज्वाला बेफामच भडकत-लळलळत होत्या; लखपतींच्याच बंगलीला आगीनें चोहोंबाजूनें घेरलं होतं. कोणालाहि थांगपत्ता लागू न देतां, अग्निनारायणानें एक भयंकर काम अंगावर घेतलं होतं... 'लखपतीसकट लखपतीच्या बंगल्याची राख करायची; त्याला जमिनदोस्त करायचं !'...

अग्निदेवाच्या त्या कटांत, आमच्या वाडकरांपैकीं कोणीएक–चिटपाखरूंसुद्धां-सामील नव्हतं !— तरी, ती दुष्कृत्यांची जणुं तिजोरीच, तशी सर्वांच्या डोळ्यादेखत वितळत होती !...

मात्र, वाडकरांपैकीं कोणालाच कसलं दुःख वाटण्याचंहि कारण नव्हतं!- इतकी जीवाची आग आग करणारीं त्या साऱ्यांचीं जिवंत दुःखंच... त्या बंगलीभोंवतीं व त्या बंगलींत कायमचीं पिचत पडलीं होतीं;— हजारांचे तळतळाट नि शिव्याशाप, त्या बंगलीभोंवतीं, जणुं अहोरात्र घिरट्या घालीत होते !—त्या बंगलीला न् तिच्या मालकाला, ते अदृश्य शाप, आजपर्यंत ओरडून ओरडून सांगत आले होते... "तूं पापाचं आगर—पापाचं जळतं कोठार आहेस !—"

आणि त्याच पापाच्या जळत्या कोठाराचा, कोणाची कल्पना–अपेक्षा नसतांना, आज असा भडका उडाला होता !—

२

पण आमचे वाडकर झाले, तरी तीं माणसंच!-स्वतःचीं दुःख, खाजगी हेवेदावे,.. सारंसारं, प्रसंगाच्या वेळीं साफ विसरून जाणं, यांतच ना मानवता सांठवलेली असते? या माणुसकीच्या नैसर्गिक नियमामुळेंच, सारे लहानथोर तत्काळ तिकडे धांवले होते...

वास्तविक, लखपतींच्या कठोर करणीमुळेंच ते स्वतः जन्मभर भाजले-पोळलेले!—तरी पण तो जळता बंगला नि त्यांतला तो लखपतीचा जळता संसार,.. तो एका माणसाचाहि होताच कीं! तेव्हां, ती आग विझविण्यासाठीं, आपल्या मनांतील सारा माणुसकीचा झरा... नि आपल्या घरांतलि हंड्या-घागऱ्यांतला पाण्याचा उरला-सुरला टिपूस...लगबगीनें घेऊन, ते सारे तिकडे दबदबा धावले!—

तरी पण...फाटलेल्या आकाशाला ठिगळ लावणं अशक्य!..पाण्याच्या माऱ्यावरहि, आगीच्या विजयी पताका अधिकच्च वर वर उसळून येत होत्या. आपल्या वेड्या मानवी प्रतिस्पर्ध्यांची कुवत, ( समान दृष्टीनें पहाणाऱ्या ) अग्नी-नारायणानें तत्काळ ओळखली!...मानवता आपल्या अस्तित्वाची पताका उंच करीत होती; पण तिथल्या त्या प्रलयाच्या पताका त्याहूनहि उंच सरल्या! निसर्ग-शक्तिच शेवटीं श्रेष्ठ ठरली!!—

३

तेवढ्यातच एक चमत्कार घडला!...

त्या जळत्या बंगलीच्या वरल्या मजल्यावरच्या एका खिडकीच्या चौकटीत सर्वांना मीरा दिसली. धुमसत्या धुरांतून पुन्हां पुन्हां प्रयासानें तोंड बाहेर काढीत, ती ओरडून ओरडून सांगत होती—“नका! विझवूं नका!... जमणार नाहीं आतां तुम्हाला तें!..”

तिचा चेहरा अगदी प्रशांत गंभीर!...वाडकरांना बाहेरूनही ती आग



भयंकर;.. पण त्यां भयंकर आगीतून बाहेर पाहाणारी ती मिरा मात्र शांत!... तोंच, पहातां पहातां, ती माडीवरली खिडकी त्या भडकत्या आगीत कोल-मंडली!– भिंती चारीबाजूंनीं कोसळल्या! पटकन् मिराच दिसेनाशी झाली!... राख...राख!...भोंवतीं सारा पिचल्या वस्तूंचा जमिनदोस्त खच...

पण रात्र अशीच उठाउठींत धांवपळींत गेली– त्या रात्रींच्या भयाण काळोखांत, प्रचंड राक्षसाच्या लुकलुकत्या डोळ्याप्रमाणें दिसणारी ती धुमसती आग!...सूर्य वर येतांच ती वरून साफ निस्तेज नि निरुपद्रवी दिसूं लागली! कुठं कुठं एकाद्या धुमसत्या भागांतून धुराचे लोट मात्र येत होते...

त्या बेचिराख बंगल्याभोंवतीं ठिकठिकाणीं आमचे वाडकर, कंपू करून नि हाः हाः कारानें भयभीत चेहरे करून, सुस्कारे टाकीत होते!...

कांही कुजबुजत होते “-अहो, आग लागली कसली म्हणतां? ती प्रत्यक्ष जागती आगच होती!...आतांपर्यंत तिनें उघड पेट घेतला नव्हता!– आज कुठं राख होतां होतां, ती साऱ्या जगाला प्रत्यक्ष दिसली,.. इतकंच!...”

४

‘आग विझवूं नका!’ असं मघां खिडकींत उभी राहून ओरडून सांगणारी मिरा, वारंवार एकाच दिशेकडे बोट दाखवून, जमलेल्या मंडळींना कांहीं तरी पाहायला सांगत होती.

सारं शांत झाल्यावर, आतां कुठं कांहीं मंडळींना तें आठवलं. सूर्य प्रकाशांत आतां लांबपर्यंतचं सारं स्पष्ट दिसत होतं. तेव्हां त्या दिशेनें ते पाहूं लागले...

त्यांना तेथें एक मोठी पेटी दिसली—

ती त्यांनीं जवळून पाहिली; तेव्हां ती सीलबंद असल्याचं त्यांना आढळलं. त्यावरच एका मोठ्या दगडाखालीं एक बंद पाकीट होतं.

इतकं होईपर्यंत गांवचे पोलिसपाटील–तात्या व गांवची इतर पंच मंडळी तिथं जमलीं होतीं; आणि त्याबद्दल बोलणं होत आहे, नाहीं, तोंपर्यंत,

फिरतीवर असलेले त्या टापूचे मामलेदारहि त्या बातमीनें अस्वस्थ होऊन, तांतडीनें तेथपर्यंत येऊन पोहोंचले होते.

शेवटीं, पंच, पोलीस–पाटील, वाडकर, सर्वांच्या देखत मामलेदारांनीं ती चिठ्ठी उघडली व जमलेल्या मंडळींना सांगितलं—"झालं हें फारच वाईट झालं! लखपती शेट काल रात्रीं एकाएकीं वारले; आणि मिराबेनेन आपण होऊनच, त्यांच्याबरोबर सती गेली आहे. तिनेंच स्वतः गांवकर मंडळीसाठीं ती सीलबंद पेटी...चिठी ठेवलीय्! तिनंच शेटजी व स्वतःसकट बंगल्याला आग लावलीय्! समजलं?– बरं जा... मंडळी, आतां आपल्या कामाला लागा. योग्य वेळीं याबद्दल आपण आणखी बोलूं,... त्याचवेळीं मिराबेनची ही सीलबंद पेटी आपण उघडूं!..."

## धुमसती आग २

५

तुम्हालाच काय, ऐकणाऱ्या कोणालाही कुतूहल वाटेल–"मिरानें हें असं सारं कां केलं?"

आणि त्याच्यामागें खरोखरच पुष्कळ मोठा इतिहासहि होता! या लळलळत्या ज्वाळांमागें गावांतली कित्येक दिवसांची धुमसती आग होती!–

लखपतीशेठ कित्येक वर्षांपूर्वी आमच्या वाडकरांत रहायला आले. तेव्हां ते नुसतेच नावांचे लखपती होते. लोटा–चिमटा घेऊनच ते प्रथम इकडे आले. त्यावेळी ते एका बेवारसी पडक्या घरांत एकटेच भुतासारखे



रहात! हळूहळू त्यानीं गांवांत आपलं बस्तान बसवलं!– लोटा-चिमटा घेऊन आलेला हा मारवाडी,... गरिबांच्या पोटाला चिमटा घेऊं लागला. हां हां म्हणतां, आपल्या रुपेरी चिमट्याच्या पकडीत धरून, त्यांना ऋणाच्या दारुण खाईंत लोटणारा, तो एक अट्टल राक्षस झाला! ज्यानें ज्यानें लखपतीशीं एकदां देण्याघेण्याचा व्यवहार केला, तो त्या सावकारी पाशांतून कधींच मुक्त झाला नाहीं!

तसं जगांत देणं नसतं कोणाला?...पण, 'अज्ञान खेडुतांस पाठीराख्या-सारखी आपण मदत करतों' असा सुरवातीला आव आणून, मग...लखपती त्यांची जन्मभर पाठ पुरवीत असे!...

गरीब असले तरी गांवकरी इभ्रतदार व पापभीरु! "कोर्टाची पायरी चढावी कुणी?...आणि चढायची म्हटली तरी पैसे आहेत कोणाकडे?... पुन्हां तेवढ्यासाठीं आणखी नव्या कर्जाच्या खाईंत लोळण्याचीच पाळी!" असल्या विचारांमुळें, अर्थातच, सर्वांना लखपती काय सांगेल तें मान्य!—

उलट, लखपती मात्र गांवकऱ्यांच्या या परभाजिणी पापभीरूपणाचा फायदा घेऊन–'याद राख!– कोर्टांत खेंचीन! घरादारावर नांगर फिरवीन! बेचिराख करीन!!...' अशी–मुजोरीपणाची दमदाटी करी. सारे बिचारे मान वांकवीत; असहाय्यपणें अपमान गिळून, ते माना टाकीत!—

तेव्हां, अशी गांवाला चिकटलेली ती जळू, अर्थातच, हळूहळू गांवाचं रक्त पिऊंन पिऊन,...चांगली तट्ट फुगली होती! गांवकऱ्यांनीं काबाडकष्ट करून मिळविलेला पैसा, त्यांच्या तोंडचा घांस, गरिबांच्या पोराबाळांचा शेर, घर-धनिणींचं किडुकमिडुक, शेतकऱ्यांच्या गुराढोरांची दाणावैरण, शेतांतले नांगर–बैल,... सर्व लुबाडून, लखपती आपलं घर भरत होता. हो,... लख-पतीच्या त्या घरांत,. गांवकऱ्यांचे सारे श्रम, घाम आणि प्राण कुजत होते!—

गांवकरी जागे होत नसत, असं नव्हे; पण असले ग्रामकीटक गांवाला चिकटले, कीं, मोठी चमत्कारीक परिस्थिति होते. या कीटकांत नि खरजेच्या जंतूंत कितीतरी साम्य! खाज उठली, कीं, आपण तिच्या आहारीं जाऊन

नबळे होतों; तिथं जोरजोरानें खाजवतो; स्वतः रक्तबंबाळ होतों; मग आपल्याला भगभगतं; आपल्याला तापुरता पश्चाताप होतो!– पण पुन्हां खाज येते!– आणि हें असंच पुढें चालतं!!

—गरीब शेतकरी नि त्यांना 'तारणारे' हे धनकोशेटजी, यांचे सबंधहि असेच असतात,...नाहीं कां?...

६

आणि असल्याच संबंधांतून, हे नामधारी लखपती आतां खरे लखपती झाले होते. त्यांचा स्वतःचा बंगला झाला होता. त्यांच्या दोंदिलाबरोबरच त्यांचं गांवातलं प्रस्थ वाढलं होतं. पण तरी ते आपल्या घरांत एकटेच! ते लखपती झाले होते; त्यांची पत वाढली होती; पण ते पति कुठं झाले होते?

शेवटीं मग, एके दिवशीं, एकाएकीं ते मुलखाला गेले; आणि परत येतांना, तोंडावर ओढणी घेतलेली एक तरुणशीच पोरगी बरोबर घेऊन आले. शेटजीचं वय नि तिचं वय पाहून, गांवकऱ्यांना वाटलं–'ती त्यांची मुलगी असेल!..' पण नव्हे! ते लग्न करून बायकोलाच घेऊन परतले होते.

अशी मिरा लखपतीच्या घरांत आली; पैशाच्या बळावर उतार वयांतही लखपतीनें पत्नी मिळविली!..पण प्रेम?–तें पैशानें थोडंच मिळतं? ते श्रीमंतीत थोडंच साठविलेलं असतं? रुपये–आणे–पैच्या व्यापाराहून प्रेमाचा व्यापार साफ भिन्न असतो. ' प्रीति मिळेल ना हो बाजारीं!'...

असे दिवसामागून दिवस गेले. मिरा हिंदु स्त्री होती. म्हाताऱ्या नवऱ्याकडेसुद्धां ती आदरानें पाही. पण आदरानें प्रेम वाढतं थोडंच?— शिवाय, लखपतीच्या दररोजच्या दुष्कृतींच्या डोंगरांनीं, मिराचा जीव तर अधिकाधिकच दडपत जात होता!

लखपतींना ' आपल्या घरांत मिरा आहे; आपली ती घरकरीण आहे.' याबद्दल आनंद-समाधान होई!– पण मिराला तेंच घर दिवसेंदिवस दुःखाची खाई वाटूं लागलं होतं!!–



उघडच आहे.!.. केवळ धनानें मानवाला सुख–समाधान मिळत नसतं जगांत!– प्रेम ही दैवी भावना आहे! ती हृदयांतच स्फुरते!!...

# सतीची आग ३

७

अशीं आणखींहि कांहीं वर्षे लोटलीं!...या नवीन वातावरणांतहि मिरा आतां पुरी मुरली होती. शेटजींचे..तारण, खोटे कागद, अफरातफर, जप्ती,... असले अमानुष दुष्कृत्यांचे प्रकार मागील अंकावरून पुढें चालूच होते.

त्यांचा काड्या–चिमट्याचा खोटा तकलादी संसार मोठा झाला होता. संसारावर स्वतःच्या मालकीच्या घराचं छत्र होतं. मिरा मालकीण म्हणून घरांत वांवरत होती. पण घराला घर म्हणण्यापेक्षां-मिराच्या जीवाला तरी–ती घरघर लावणारीच एक जागा झाली होती. आपल्या कर्मांची लखपती-शेटजींना तरी कसलीच खंत वाटत नसे.पण मिरा मात्र दिवसेंदिवस अधिकच खंतावत गेली. पतीच्या असल्या पापांमुळेंच आपण माता होत नाहीं, असंच मिराला नेहमीं वाटे.

आणि ते ती त्यांच्याकडे कधींकधीं रागारागानें बोलूनही दाखवी. पण त्याचा काय उपयोग? शेटजींना बायकोमुलापेक्षां पैसाच अधिक प्रिय होता! बिचारी दिवसेंदिवस देवभजनीं लागूं लागली; ' मिराके प्रभु गिरिधर नागर ' असं म्हणत, ती तासन् तास मिरेप्रमाणेंच चिपळ्या वाजवीत बसे. त्यावेळीं तिला कशाचीच शुद्ध नसे.

शेटजी एकदां वसुलीला बाहेरगांवीं गेले, कीं, आपलीं हजारों झेंगटं पुरीं करतां करतां, आठ आठ दिवस बाहेर नि बाहेरच असत. आणि आल्यावर, आपण किती पैसे मिळविले, एवढंच मोठ्या अभिमानानें मिराला सांगत! त्यावर ती फक्त खिन्नपणें म्हणे–'पैसे कशाला मिळवितां हे?–आनंद मिळवा! समाधान मिळवा! लोकांचं प्रेम—लोकांचे शुभाशीर्वाद मिळवा!'

पण त्यावर शेटजी उलट फक्त चिडत;.. खसकन् ओरडून तिच्या अंगावर धावून जात!—

८

शेवटच्या दिवशींहि असंच झालं होतं!

ते बऱ्याच रात्रीं, आठदहा दिवसांनीं बाहेरगांवाहून वसुली करून आले होते. त्यांनीं आपलं घोडं दारांत बांधलं व नेहमींच्या पद्धतीप्रमाणेंच गांव–गावड्याहून ओरबडून आणलेलं सारं धन त्यांनीं स्वतःच्या हातानें आपल्या तिजोरीत भरलं!–

मिरा मात्र अतिशयच खिन्न झाली होती. गेले दोन चार दिवस ती जेवलीहि नव्हती; श्रीकृष्णजीच्या तसबिरीपुढें नीरांजन नि उदबत्या लावून सारखी जप–भजन करीत होती.

पण शेठजींनीं तिला हांक मारली; ती कर्तव्य म्हणून गेली;...नेहमींप्रमाणेंच बोलणं झालं; शद्वानें शद्व वाढला;...शेटजी खूपच चिडले-ओरडले. पण तेवढ्यांतच,...ते एकदम छाती घट्ट दाबत म्हणाले– 'मरी गयो! मारा बाप...मरी गयो!'

दचकून मिरा जवळ गेली. शेटजींच्या छातींत जोराची कळ आली होती; मिरा गोंधळली!...तिनें त्यांची छाती घट्ट दाबून धरली.

"कोणाला आतां बोलवावं मदतीला?...सारेच शेठजींचे वैरी!–" असं ती आपल्याशींच मनांत म्हणत आहे, इतक्यांत, शेठजी कोलमंडले; त्यांनीं मान टाकली; अगदीं अखेरची मान टाकली...



–आणि आपल्या साऱ्या धनांतील एक पैही बरोबर न घेतां, बघतां बघतां,... शेठजी निघून गेले होते!

९

पण या प्रत्यक्ष समोर घडलेल्या प्रसंगानें मात्र मिरा अधिकच खंबीर झाली.

'शेटजी गेल्यानें कोणालाही दुःख होणार नाहीं!.. आपल्या जगण्यांतहि आतां कांहींच अर्थ नाहीं!' या दोन्ही गोष्टी मनांत आणून, तिनें तत्काळ एक निराळाच निश्चय केला.

शेटजींना तसंच खाटेवर टाकून, तिनें लगबगीनें तिजोरी उघडली; सारे कागदपत्र, सारे दागिने, अगदीं झाडून बाहेर काढले. ते एका पेटींत घातले व ती सीलबंद केली. बराच वेळ बसून, तिनें आपल्या मोडक्या तोडक्या भाषेंत गांवच्या पंचांना एक चिठ्ठीही लिहिली.

आणि एखाद्या वेडीप्रमाणें–डोक्याच्या झिज्या वाऱ्यावर सैरावैरा उडत होत्या...तरी–ती धांवत धांवत लांबच्या एका झाडाखालीं गेली. तेथें ती सीलबंद पेटी व ती चिठ्ठी सारं ठेवून, ती तशीच धांवत घरांत परत आली!

त्याच वेडाच्या झटक्यांत, –घरांत होतं नव्हतं तेवढं–डबा–दोन डबे घासलेट, त्या लांकडी बंगल्याच्या साऱ्या कोनाकोनांत तिनें शिंपडलं!...साऱ्या दारांना आंतून कड्या घातल्या!...आणि...आणि देवासमोरचं तें निरांजन घेऊन, 'मिराके प्रभु...मिराके प्रभु'...म्हणत, घराच्या कोपऱ्याकोपऱ्याला ज्योत लावून, ती वरच्या मजल्यावरील खिडकींत जाऊन उभी राहिली!—

हां हां म्हणतां मिरा, लखपती, लखपतीचा बंगला...साऱ्या नश्वर वस्तूंना.. अग्नीनें चोहोंबाजूनीं पुरेपूर घेरलं!!—

धुमसती आग भडकून उठली!...लळलळत्या ज्वाळा सळसळत उसळल्या!– त्या अक्राळ विक्राळ आगीत लखपतीच्या पापांच्या साऱ्या धुराव्यांची राखरांगोळी झाली!!—

# निसर्ग आणि मानव ४

## १०

ज्या गावांत ती आग पेटली, तें आमचं गांव...सुंदरगांव! नांव तसं गांव!- गांवाच्या नांवांतहि सुंदरपणा भरलेला! त्याची रचनाहि सुंदर!

एका बाजूला वाघीण ओढा; तीन बाजूला डोंगरांचा वेढा!- जणूं काय, आमच्या गांवचं वैभव एखादा लुटारू चोरून नेईल, म्हणून सृष्टि-देवीनें त्याचा असा कडकोट बंदोबस्तच केला होता.

सुंदर गांव म्हणजे छोटासा गांव !...त्याला शहराची सर कशी येणार? शहर म्हणजे सुखसाई-दारांत नळ, डोक्यावर विज, रस्त्यांत ट्राम, शेजारीं डॉक्टर, भोंवतीं सारी गजबज गजबज!...पण हें सारं कृत्रिम ! नळाला पाणी नाहीं, म्हणून गोंधळ! विजेचा फ्यूज उडाला,.. म्हणून काळोख! ट्राममध्यें जागा नाहीं, म्हणून पाय गळणार! डॉक्टरच्या दाराशींहि रांग लागणार !- असे सगळे हाऊच हाल!...बघावी तिकडे सोय-सोय; ...पण बघावं तिकडे 'हाय! हाय !!'

आमच्या सुंदर गांवांत असल्या सुखसोयी नव्हत्या खऱ्या; पण असली कृत्रिमताहि नव्हती!

खेड्यांत सुखसोयी माणसं तयार करतात. सुखसोयी निसर्ग देतो माण-सांना!...पण माणसाला आधीं मनगट मात्र पाहिजे. मग त्या मनगटांतून वाटेल तें तयार करतां येतं त्याला !—

साऱ्या गांवाच्या घरादारांना लागणारं लांकूड, शेतीला लागणारीं कवळं, कौलांना व हंड्या-मडक्यांना लागणारी चिकणमाती, गुरांना लागणारं गवत, जळणाला लागणारं सरपण, सारं सारं आम्हाला आमचा डोंगर पुरवी!- जणूं काय, आमचा दयाळू पोशिंदाच तो!!-

कधीं कोणी गरीब गांवकरी त्याच्या पायाशीं गेला, कीं, आपल्या पोटा-पुरतं कांहींतरी घेऊन आलाच तो, म्हणून समजावं!-पुराणांतल्या गोष्टींत



कामधेनु होत्या. त्या कामधेनु तरी आमच्या या डोंगरापेक्षां वाडकरांना जास्त काय देणार होत्या ?

जगांत, दुसऱ्याकडून कांहीं तरी घेण्यासाठीं माणसं नेहमी स्पर्धा करतात ! पण निसर्ग निराळा;...तो देण्यासाठींच स्पर्धा करतो !

डोंगर म्हणतो, ' मी देईन !' ओढा म्हणतो, 'मी देईन!'.. 'डोंगराची माती, उन्हाळी शेती, ओढ्याच्या हातीं !'—साऱ्या गांवाची खळमळ ओढा वाहून आणी; पुढें नदीकडे नेई; नदी ती घेई आणि समुद्राकडे देई; समुद्र सारी घाण—कचरा आपल्या विशाल उदरांत लपवून टाकी; गांव निर्मल करी; पण आपलं पाणी कितीहि गढूळ झालं, तरी स्वच्छ तेवढंच आकाशांत पाठवी; आकाशांतून ईश्वराच्या कृपेचा पाऊस पडे; आमचे शेतकरी नि त्यांचीं शेतं ' आ ' वासून आकाशाकडे पाहत; आकाशांतून पडणारे ते अमृतबिंदू टिपून घेत; आणखी आपल्या निढळाचे मोतीं त्यांत मिसळत; मग शेतं पिकत; कणसाला मोतीं लागत; घरांत-खळ्यांत हिऱ्या—माणकांची रास पडे!

घराघरांत असा अगदीं आनंदीआनंद होई !—

## --११--

पण हा झाला निसर्ग ! तरी त्याच निसर्गांतल्या सुंदर चंद्र-सूर्यावरसुद्धां डाग आहेतच कीं !!—

आमच्या गांवाला महारवाडा होता. दुसऱ्या अर्थानें प्रत्यक्ष आमच्या गांवांतसुद्धां महारवाडा होता.

वाघीण ओढा बाहेरील पानपाचोळा, घाणधूण दूर घेऊन जाई. पण शरीरांतलं नासलेलं रक्त बाहेरच्या मलमपट्ट्यांनीं शुद्ध होणार थोडंच ?

गांवांतली ही घाण ओढा नेई. पण खरी घाण ? दैन्य ! दारिद्र्य ! गुलामी !!... ही कोणी वाहून न्यावी ?... ही घाण वाहून नेणारा गांवांत कुठला ओढा नव्हता. उलट, या घाणीला वेढा घालून ती गांवांत तशीच टिकवून धरणारी मानवी समाजानें तयार केलेली तटबंदी मात्र होती तिथं.

आमच्या गांवाभोंवतीं निसर्गानें डोंगर केले होते! गांवांतही तसेच मोठमोठे डोंगर होते;...ते म्हणजे सावकार!!.. हे झाले मोठे डोंगर. लहान डोंगरही होते;...ते म्हणजे गोरगरिबांना नाडणारे व्यापारी!!... तशींच इकडे तिकडे आणखी डबकींहि होतीं,...अगदीं चिखलानें रबरबलेलीं!– तीं म्हणजे दारू, ताडी, माडीचीं दुकानं!

असा होता आमच्या गांवाचा नकाशा! त्यांतून फिरतांना आमच्या वाडकरांपैकीं कोणाचे पाय चिखलांत रुतावेत, कुणी दगड-धोंड्यावर आदळावं–खरचटावं, कोणाचा तर मोठमोठ्या डोंगरांच्या पायथ्याशीं कपाळ-मोक्ष व्हावा!—

अशी तिथल्या कांहीं मानव म्हणणाऱ्या दानवांची युक्ती!... 'अशी तिथल्या इतर साऱ्यांची नियति!!—

१२

मानव निसर्गावर मात करायला पहातो–नि करतो, ती अशीच!... गणपती करतां करतां मारुति-माकड होणंच जगांत शक्य असतं!...तेव्हां असा हा ग्रामचक्रव्यूहच आमच्या गांवाचा डाग!

वास्तविक गांव सूर्यासारखं तेजस्वी;..गांवांतले लोक चंद्रासारखे प्रशांत, सौम्य! पण गांवाला मात्र हे असले डाग!!– चंद्र–सूर्यांना ग्रासणारे राहू–केतू पदोपदीं कोनाकोनांत आपल्या ऐसपैस कक्षेंत भ्रमण करीत होते!!—

निसर्गाची रचना असते पवित्र, मनोहर! त्याचा व्यापार खुला... सगळ्यांसाठीं!!– त्यांच्याकडून कोणीहि सुखच घ्यावं!– तिथं दुजाभाव नाहीं; श्रीमंती-गरीबीचे तट नाहींत; त्याला खुशाल श्रीमंतांनीं लुटावं व गरीबांनींहि लुटावं; लहानथोर कोणीहि त्याचा आश्रय घ्यावा. दमलेल्यांनीं त्याच्या सान्निध्यांत ताजंतवानं व्हावं. दुःखितांनीं त्याच्या संगतीत उसासा टाकावा नी आनंदित व्हावं.

पण ही निसर्गाची रचना बाहेरची!– धन आणि धनीपणा यांनीं सोन्या-



सारख्या मानवी जगाची आंतून मात्र पोखरून–पोखरून माती केली आहे.

आमच्या गांवच्याहि आंतल्या रचनेचे धनी मानवच होते!— आणि मानवांचा व्यवहार नेहमींच सिधा नसतो- "सहाय्य ओठीं, विरोध पोटीं!..."

# धनाची किमया ५

१३

आमच्या गांवच्या एका बाजूला सुंदर कौलारूं घरं नि छोटेखानी बंगले होते. श्रीमंतांच्या वैभव–मेरूंची शिखरंच तीं!... दुसऱ्या बाजूला दारिद्र्याच्या चौफेर मारानें जर्जर झालेलीं-डोक्यावर अर्धवट शाकारसुद्धां सावरून धरतां न येणारीं–खोपटीं होतीं; तीं दरिद्री-नारायणाचीं मूर्तिमंत प्रतिकंच! 'अक्काबाई 'चीं स्मारकंच!...

एका बाजूला त्या बंगल्यांची लक्ष्मीनगरी! तर दुसऱ्या बाजूला या उघड्याबोडक्या, एकमेकांला चिकटलेल्या खोपटांची दारिद्र्य पेठ! लक्ष्मी-नगरींतून हिंडणारे जीव लक्ष्मीपुत्र;... तर त्या दारिद्र्याच्या छोट्या छोट्या पिंजऱ्यातून बाहेर पडणारे, लज्जारक्षणापुरता कपडा अंगावर सांवरून, त्या-बरोबरच मानवताहि सांवरणारे उघडेबोडके जीव! तीं सामान्य माणसं!... निसर्गाच्या राज्यांतील आमच्या गांवचे तेच मूळ मानकरी!

पण जगांत मानाला किंमत नाहीं! मानाची मान खालीं! मान धनानेंच गेला; धन हीच किमया, जादू! ती मद आणणारी, मोह पाडणारी चीज! हवं ते करणारी व करावयास लावणारी शक्ति तिच्यांत!...

याच शक्तीनें निसर्गाच्या राज्यांत ती लक्ष्मी–नगरी उठली !... याच शक्तीनें त्या गांवकरी मानकऱ्यांच्या सुंदर गांवठणाची दारिद्र्य–पेठ बनली !–

धन गेलं कीं धनीपणा,..धनिकपणा जातो! मात्र तो धनिकपणा गेला, कीं, मनुष्य नुसता निर्धन होतो, असं नाहीं;...तो हलुहलु गुलाम होतो !!–

पण मग ही करणी कोणाची ? निसर्गाची नव्हे ! मानवाचीच ! 'नेंरच केला हीन किती नर !' मानवाचं हें,...तर निसर्ग उलट म्हणतो– 'सर्वांनीं आनंद करा !' पण मानव म्हणतो, ' मीच आनंदी होणार !'

बागेंतल्या झाडावर फुलं खुलून दिसावींत,...म्हणून निसर्ग हिरव्या हिरव्या पानांत विविध रंगांची बरसात करतो. पण मानव ती सगळी ओरबडून–मोजून आपल्या परडींत भरतो. त्यातलं वाटेल तें आपल्या डोक्यावर धारण करतो; वाटेल तें कुस्करून टाकतो; कुठलं तरी मढ्यावर घालतो;...नि कुठलं तरी देवाच्या मस्तकावर वाहतो.

एकाला खुलवायचं; एकाला झुलवायचं; एकाला हसवायचं; एकाला रडवायचं;..हें काम निसर्गाचं नव्हे !...हें काम मी मी म्हणणाऱ्या मानवाचं! धनानें मत्त झालेल्या धानिक मानवाचं !!—

हेंच तें धनिकतेचं जीवनसूत्र !

आपलं वैभव खुलुन दिसावं म्हणूनच आमच्या सुंदर गांवच्या धनिकांनीं आपले बंगले त्या मोडक्यातोडक्या खोपटांपुढें बांधले होते! पण थोडीशीहि माणुसकी ज्याच्या हृदयांत वसत असेल, त्याला तें दृश्य पाहातांना या चिपाड झालेल्या अंधाऱ्या काळवंडलेल्या जीर्ण झोंपड्यांतील तेजच या झगझगत्या चकचकित बंगल्यांनीं शोषून घेतलं आहे, याची मनोमय खात्री पटली असती!...या बंगल्याभोंवतालच्या आवारांत खुलणारीं कमळं, त्या जीर्ण झोपड्यांच्या भोंवतालच्या चिखलांतच रुजलीं आहेत, त्यांतील जीवनरसावरच यांना टवटवी आली आहे, असं त्याला वाटलं असतं.

धनिकातेचा महिमा हा असा पंकज असतो !—

एका सावकराच्या कानांतील मिकबाळी, भिकेला लागलेल्या नि संसाराची पुरी राखरांगोळी झालेल्या शेंकडों दुर्दैव्यांच्या टपोऱ्या आसवांचीं



केलेली असते. एका शेठाणीच्या अंगावर सळसळणारा भरजरी शालू, शेतकऱ्यांच्या हजारों घरधनणींच्या अंगावर फडफडत असलेल्या अर्ध-वस्त्रांच्या उरल्या भागांच्या तंतूनीच केलेला असतो. शेठजींच्या एकेका लाडक्या पोराच्या पोटांत जाणारा एक एक गोडधोड घास,... त्या कामकऱ्यांच्या हजारों पोरांच्या पोटांत न जाणाऱ्या लाखो घासांचा बनलेला असतो !—

हाच तो धानिकतेचा महिमा !

पण तो यथार्थतेनें गायला दारिद्र्यांत खिचपत पडलेला एखादा दरिद्री शाहीरच योग्य !– साध्यासुध्याचं तें काम नव्हे.

# देव आणि मानव ६

## १४

म्हणूनच तर, आमच्या सुंदर गांवचा देव या विषमतेपासून फार लांब लांब रहात होता !—

वेशींतून आंत शिरतांना प्रत्येकाला प्रथमच देवाचं दर्शन घडे! आंत रहाणाऱ्या मंडळींना मात्र देवाचं दर्शन घ्यायला गांवाच्या वेशीजवळ तंगड्या तोडत यावं लागे !—

गांवांतल्या रोजच्या व्यवहारांत देवाचं अस्तित्व दिसलं नाहीं, कीं उतार वयाची गांवकरी मंडळी-विरंगुळा म्हणून-दररोज संध्याकाळीं, या वेशीजवळच्या मूर्तिमंत देवाच्या आश्रयाला येत. घंटानाद, नामोच्चार नि देवदर्शन झालं, कीं, देवळाच्या ओसरीवर, देवाच्या दारीं, चार क्षण बैठक मारीत, आपापल्या शेती-

भातीच्या, पोराबाळांच्या, गुराढोरांच्या, सुखदुःखाच्या गोष्टी इथं अगदीं मोकळ्या मनानें चालू होतं-आणि त्या दिलखुलास गप्पा गोष्टींत दिवसभराचे सारे काबाडकष्ट, धनिकांची सारी अरेरावी, सारा अन्याय, ते हां हां म्हणतां कसेबसे विसरून जात !

कांहीं तर-तशा गप्पा मारतां मारतां, तिथंच देवाच्या दारीं, निश्चिंतपणें आडवे होत;...त्यांचा बोलतां बोलतां क्षणभर डोळा लागे.

शेवटीं, पुन्हा एकदां नामोच्चार झाला, घंटानाद झाला, कीं, सारे घराकडे,...त्या आपल्या गांवाकडे परतत.

–आणि त्या घंटानादाबरोबरच त्यांच्या जीवन-नाटकाचीहि मागील अंकावरून पुढें तशीच सुरुवात होई.

कधीं कधीं या प्रकारांत फरक पडे. गप्पा ऐन रंगात येत; नि त्याच वेळीं धोतरवजा स्वच्छ पंचा नसलेले, अंगावर उपरणं पेहेरलेले, हातांत काठी घेतलेले, एक मध्यम वयाचे गृहस्थ तिथं अवतीर्ण होत...

मग लागलीच नेत्रपल्लवी होई;..उसासे सुरू होत; गप्पांना एकदम खंड पडे; चिडीमिडी चुप होई !—

ते लांब असतांनाच एखादा वयस्क, औपचारिकपणें,...मुख्यतः सर्वांना पण वरवर त्यांच्याकडे पहात, त्यांनाच उद्देशून जरा कृत्रिम हसत मोठ्यानें म्हणे...'या तात्या !– अरे ए ! तात्या आले रेऽ !... '

तात्या म्हणजे आमच्या गांवचे पोलीस–पाटील !...हो, तात्या म्हणजे मानवी राज्य;...तात्या म्हणजे सत्ता !!

तात्या आले, कीं– आतांपर्यंत देवाच्या देवळांत सुरू असलेलं मोकळं देवाचं राज्य...एकदम लोपे!- देवाच्या देवळांतहि मानवाचंच राज्य सुरू होई! गांवकरी देवाप्रमाणें,...अगदी दगडाप्रमाणें, बोलतां बोलतां स्तब्ध होत !

पुराणांत रामाच्या पादस्पर्शानें आहिल्या-शिळेला मानवता आली म्हणे!- पण मग, चालू कलियुगांतहि, तात्यांच्या वाऱ्यानें गांवकरी मानवांचे एका क्षणांत दगड होत !...



कशांत होती ही अजब शक्ति ?...ती शक्ति तात्यांच्या पैशांत होती;... सावकारींत होती;...पाटिलकींत होती !—

गांवांत होणाऱ्या प्रत्येक घटनेमागली कर्तुंमकर्तुंम् शक्ति तात्यांच्या त्या स्थूल देहांत, त्यांच्या त्या बेरक्या डोळ्यांत, त्यांच्या त्या आंकडेबाज मिशींत, लफडेबाज उपरण्यांत, हातांतल्या नागमोडी गांठीगांठीच्या काठींत होती;... आणि हें गांवकऱ्यांना माहित होतं !...

गांवकरी गरिबीच्या दुखांःतल्या विरंगुळ्यासाठीं पुण्य मिळवायला देवाच्या दारीं येत;...देवाचं दर्शन घेत !...

...तात्या श्रीमंतीच्या दुःखांत विरंगुळा वाटावा, आपलीं कांहीं पापं तरी नष्ट व्हावींत, म्हणून देवाच्या दारीं येत;-- देवाचं दर्शन घेत !

गांवकऱ्यांच्या आनंदाचा तात्यांचा तसल्या येण्यानें असा अनेकदां प्रत्यक्ष देवासमक्षच विरस होई !—

आणि तरी,...तो दगडाचा देव,...अनेकदां तें तसं अगदीं निश्चल दृष्टीनें, निमूटपणें पाही. आपला एखादा हातही हलवीत नसे; कीं तोंडांतून एखादा चकार शब्दहि काढीत नसे !—

## मदोन्मत्त हत्ती !— ७

१५

तात्या म्हणजे आमच्या गांवांतले लहानसहान प्राणी नव्हत;–तेव्हां त्यांच्याबद्दल आणखी थोडं सांगितलं पाहिजे—

चिखलांत कमळ, निवडुंगांत केळ, कोळशांत हिरा, ही निसर्ग चमत्कृति! –हे आपले खेळ पाहून, आपल्या सान्निध्यांतल्या रानटी मानवानें देवमाणूस व्हावं, शहाणं व्हावं, शोधक व्हावं, ही त्यांची शिकवण!—पण माणसाला दिसणार तुळसेंत भांग!...त्याला हवा असणार कमळांत चिखल!!–तिथं बिचारा निसर्ग काय करणार?

आमच्या सुंदर गांवांतलं तात्यांचं राज्य असंच होतं!...तात्यांच्या घरीं तर आपल्याला हे जगांतले दोन्ही ध्रुव दिसत!—

एक ध्रुव तात्या!— दुसरा ध्रुव माई!

या दोन ध्रुवांत अंतरहि अगदीं अफाट! पण त्या ध्रुवांच्या आंसावरच तात्यांचं घर–तात्यांचं जग फिरत होतं!—

तात्या ऐसपैस देहाचे...तसंच त्यांचं घर ऐसपैस चार खणी!–पावसाळ्याखेरीज नऊ महिने दारांत मांडव, मांडवाखालीं विस्तीर्ण अंगण; तें छानदार सारवून त्यावर मध्यें बैठकी टाकलेल्या; मांडवाच्या मध्यभागीं टांगलेला झोपाळा; तो सदा झुलता... पण सदा कुरकुरणारा!—

हेंच तें तात्यांचं सिंहासन— आपल्या या सिंहासनाआसपास तात्या सदा दिसणार;...त्यावरच बसणार–झुलणार!– एका बाजूस चंची, दुसऱ्या बाजूस पिकदाणी,...मध्यें तात्या!– तात्यांच्या कमरेला चाव्यांचा भला मोठा जुडगा! असा सारा थाट! कधीं बैठकीवर अगर बैठकीजवळ बसलेल्या कोणाबरोबर बोलायचं झालं,...तर तात्या त्या आपल्या सिंहासनावर बसून,... वैभवाच्या झोक्यांत,...अगदीं झोकांत बोलणार!...दुपारच्या वामकुक्षीच्या वेळीं तेवढा तो झोपाळा स्थिर असे. एरवीं त्याची करकर व तात्यांची कुरकुर नि बडबड चालू असे;...तें सिंहासन सदा डुलतं असे.

१६

त्या हालत्या–झुलत्या सिंहासनावरून निघणारे शद्ब कित्येक लोकांना हालवीत–झुलवीत; कित्येकांना मुसंड्या मारून जमिनीवर लोळवीत; कित्येक, ते शद्ब ऐकून निःशद्ब होत; कित्येक, त्यांच्या तीक्ष्ण धारेनें चरकन् कापून जात; कित्येक तर, त्यांतल्या अग्नीनें होरपळत,..पोळत!–तिथं येणारेहि विविध! ...कोणी गरजू कर्ज काढायला येत; कुणी प्रामाणिक व्याज मागावयाला येत; कोणी वेडे कर्ज फेडायला येऊन त्या सिंहासनाला आवळीत;...त्याच्या खालच्या पायरीवर डोकीं घासत!–तात्यांची त्यांच्याशीं वागण्याची तऱ्हा मात्र एकच नि ठराविक!...वसू सुटलेल्या पोळाची!– मदोन्मत्त हत्तीची!...

गरिबीच्या चिखलांतच देव सचोटीचीं कमळं तयार करतो. पण श्रीमंतीचे असले मदोन्मत्त हत्ती तीं जाणतेपणीं पायाखालीं तुडवतात; चिखलच कालवतात; त्या चिखलांत खेळूनच आपल्या जीवाची मौज करतात!... आणि...आणि... म्हणूनच,...जगालाच काय, प्रत्यक्ष देवालाही तीं सुंदर कमळं लाभत नाहींत!...

असलं होतं हें पुढल्या अंगणांतलं तात्यांचं सिंहासन; त्याची अबाधित, अमानुष सत्ता!—



## माईचं वृंदावन !– ८

१७

पण तात्यांच्या घराच्या मागल्या अंगणांत माईचंहि एक सिंहासन होतं. माई त्यावर बसत मात्र नसत; त्याच्या निकट उभ्या रहात.–अगदीं अदबीनें त्याच्या जवळ तासन् तास उभ्या रहात—

त्याचं तें सिंहासन म्हणजे तुळशीवृंदावन!—

या मागल्या अंगणांत...तात्यांची सत्ता नव्हती!– किंबहुना अगदीं माईंचीहि नव्हती...सत्ता असलचि तर होती त्या तुळशीवृंदावनाची !– माई नुसत्या नाममात्र!—

पुढल्या अंगणांतल्या सिंहासनावर बसून तात्यांचं स्तोत्र सुरू झालं, कीं, गरीब मानवांचीं हृदयं हालत–हादरत;...तर मागल्या सिंहासनाजवळ बसून माई स्तोत्र म्हणूं लागल्या...कीं, प्रत्यक्ष सिंहासनच डुलूं लागे;... ऐकणाऱ्यांच्या हृदयाचं पाणी पाणी होऊन, तें त्यांच्या डोळ्यांतून ओसरूं लागे! पुढल्या दारीं तात्या रौद्ररसानें जिवंत जीवांना जाळीत;...तर मागल्या दारीं माई भक्तिरसानें तुलसीवृंदावनावर अश्रू ढाळीत. पुढल्या दारीं ज्वालामुखी होता;...त्याच्या भोंवतीं राखरांगोळी पडलेली दिसे! मागल्या दारीं बर्फाच्छादित हिमालय होता;—त्याच्या भोंवतीं जीवनाचे शीतल झरे वहात असत. पुढल्या दारीं यमयातना, तर मागल्या दारीं रामराज्य! पुढल्या दारीं वेताळ;...तर मागल्या दारीं अन्नपूर्णा देवी !...पुढल्या दारीं मानवाचे दगड बनविण्याचा अजस्र कारखाना;...तर मागील दारीं दगडाला देव बनविण्याची अजब कारागिरी!– कारण? कारण उघडं होतं–पुढल्या दारीं मायावी राक्षस तात्या!...मागल्या दारीं माईंची माया!—

१८

आपल्या समाजाची गंमत आहे ती हीच — चिखलांत कमळ, निवडुंगांत केळ, कोळशांत माणिक म्हणतात,... तें असं!—

तात्यांच्याच घरांत माई होती !– माई आई होती,— लक्ष्मी होती–– देवता होती !– तिला मन होतं– माणुसकी होती !– तिला देव कळे;...मानव कळे;...माणसाचं मन कळे!...

पण एवढं सर्व करून अखेर परमेश्वरच भ्याला! त्यानें माईला जगन्माता केलं होतं;...पण 'माता' केलं नव्हतं!... कां? कदाचित्... इतक्या प्रेमळ मातेच्या मांडीवर तिच्या पदराखालीं निश्चिंत झोपणारं मूल निष्पापपणें चुकून



दुडदुडत, पुढल्यादारच्या रुक्ष वाळवंटांत जायचं, तिथं तें होरपळायचं, म्हणूनच कीं काय—इतक्या गोड माईंना 'आई' म्हणून हकाची हांक मारणारा 'जीव' निर्माण करायला, देव शेवटीं अजूनही घाबरला होता. त्यानें त्याला त्या घरांत अजून धाडलं नव्हतं!—

## गरिबाचं घरकुल ९

१९

"लबाडी? माझ्याशीं लबाडी!– ही हरामखोरी मी चालूं देणार नाहीं!"... उद्गार कडकडून बाहेर पडले; पुढल्या अंगणभर दुमदुमले! तात्या झुलत्या सिंहासनावर बसले होते;...मधूनमधून मनांतली तुच्छता दाखवण्यासाठींच कीं काय, कोण जाणे, त्या उद्गारांबरोबरच जवळच्या पिकदाणींत तात्या पिचकाऱ्या टाकत होते. तोंडांतली लाललाल आग तशी जणूं वितळूनच बाहेर पडत होती!–

– आणि तात्यांच्या सिंहासनासमोर सदू आदबीनें उभा होता.

तात्या झुलते अस्थिर होते; सदू बिचारा त्यांच्यासमोर एका खांबाला ओडगून स्थिर उभा होता. तात्यांची नजर झोपाळ्याच्या झोक्यांबरोबर झोके खात होती; सदू जमिनीवर ओशाळेपणें उभा राहून, आपल्या डोळ्यांत सारा जीव आणून, तात्यांकडे दीनवाणी टक लावून पहात होता. प्रतिपक्षाला चीत करून जीत मिळवणाऱ्या विजयी वीराचं शौर्य तात्यांच्या चढेल डोळ्यांत तरंगत होतं; तर लाचारी, ओशाळेपणा, आगतिकपणा, यांनीं बधिर झालेली सदूची नजर त्याच्या जीवाप्रमाणेंच सारखी खालीं-वर होत होती.

"कायरे, गुलामा? पैसे नेतांना मारे पदर पसरलास;— पदरांत घ्या म्हणालास!—आणि आतां?— साफ विसरलास नाहीं कां तें?—लेका, वचनाला जरा जाग; अशी माझ्याशीं वचनभ्रष्टता? जवळ जवळ साडेतीन वर्षे झालीं पैसे नेऊन!—पण देण्याची दानत आहे कुठं?"

## २०

तात्यांचे ते हेटाळणीचे शद्ब त्याच्या काळजाला भिडले. क्षणभर त्याचे डोळे तरारले...त्याच्याही मनांत वेडेवांकडे विचार...वेडे वांकडे शद्ब आले.

पण शेवटीं त्याला मृत कारभारणीची आठवण झाली. ती मरतांना त्याला म्हणाली होती— "आवंदाला तात्या सावकाराचं करज फेडा बर कां? ... न् मंगच मंजूला उजवा!..."

त्या स्मृतीनेंच सदूनें आपले तिरमिरीचे शद्ब पोटांतल्या पोटांत ढकलले. त्यानें त्याच ओशाळ्या मनानें तात्यांकडे एक चोरटा दृष्टिक्षेप टाकला.

आपल्या घामावर नि बायकोच्या श्रमावर सदूला कसंबसं अन्नानें जगतां येई; पण ती आजारी झाली;...एक वाहता झरा आटला; जणूं डावा हात तुटला!—दोन झऱ्यांनी जेमतेम भरणारी तळी एकानें का भरणार? एका हातानें गरिबाचा संसार कसा चालणार?...मग तर बायको अत्यवस्थच झाली. माणसाचं मन तें;...सदू कामावर नेमानें जाऊं शकेना. तेव्हां दुसरा उरला झरा अधूनमधून बंद होऊं लागला. उजव्या हाताच्या कामाचीहि कांकूं सुरूं झाली. त्यांतच संसारासाठीं, औषधासाठीं कर्ज झालं...कर्ज वाढलं!—

शेतकऱ्याचा मरूं नये बैल...आणि कामकऱ्याची मरूं नये बायको;...पण अखेर होऊं नये तेंच सारं घडलं!— त्या संकटपरंपरेचा कळस झाला. त्याच्या पदरांत अकरा वर्षांच्या मंजीला टाकून, अखेर सदूची घरधनीण निघूनच गेली. गरीबाच्या संसार—घरांतली अन्नपूर्णा—लक्ष्मी एका—एकीं एका फटक्यांत काळानें ओढून नेली. सदूवर तर आकाशच फाटलं.



पण सदू धीराचा होता. उद्योग करणारा घरांतला तो एकटाच;— तरीहि तात्यांचं व्याज तो दरमहाच्या दरमहाला—अवसेला—नेऊन देई. पण यालाच तर जग म्हणतात!...इतकी सचोटी दाखवूनहि, तात्यांचे ते उद्गार आज सदू निमूट ऐकत होता!...

## २१

ते शद्ब बोलतांना तात्या लाल झाले होते—(एखाद्या नाटकांतल्या रंगलेल्या नटासारखे!) ते शद्ब ऐकतांना सदूहि लाल झाला होता (खऱ्याखुऱ्या मनस्वी संतापानें!...)।

पण हे तात्यांचे शद्ब ऐकत असतांनाच आपल्या बायकोचे मरतांनाचे ते शद्बहि पुन्हां त्याच्या कानांत दुमदुमले— "आवंदां फेडाच बरं का, तात्या सावकाराचं करज! आन् मंगच मंजीला उजवा!"

प्रतिकाराबाबत हतबल झालेल्या मनाच्या त्या गोंधळामुळेंच शेवटीं सदूच्या डोळ्यांवाटे गंगा—यमुना वाहूं लागल्या;...साहजिकच होतं तें सारं कांहीं!— मानवी मनांतल्या मनस्वी संतापाचा आविष्कार असा सात्त्विकतेनें करतांना अपयश आलं तरी त्या बाजूला शेवटीं पवित्र गंगा-यमुना निदान येऊन मिळायच्याच!

सदूचे तापट विचार त्याच्याच डोळ्यांतल्या पाण्यानें थंड झाले! आणि तोंवर तात्यांचं नाटकहि ओसरलं!—पिकदाणींत एकदोन पिचकाऱ्या मारून त्यांनी दाखवलं, कीं, आपल्या मुखांतून क्षणापूर्वी सदूवर बरसणारा अग्नि—त्याच्या त्या दाहक ज्वाला—आतां निदान वितळलेल्या आहेत; त्या दिवसापुरतं तरी सदूला तात्यांनी अभय दिलं आहे!— म्हणूनच अखेर समेट करण्याच्या आवाजांत ते सदूला म्हणाले—"हं, जा आतां जा तूं! आजपासूनच प्रयत्नाला लाग!—पैसे लौकर घेऊन ये!...काय? मला बांकड्यांत पाय टाकायला लावूं नकोस!—"

पण तरी तसा खालीं पहात, नि अश्रू टिपत, त्या खांबाला चिकटूनच क्षणभर सुन्नपणें सदू उभा होता!—

# पोरीचे अश्रू १०

२२

माई वृंदावनाजवळ नीरांजन पेटवून तुळशीला प्रदक्षिणा घालीत होत्या; इतक्यांत मागल्या अंगणाच्या फाटकांतून मंजी धांवत धांवत आली. पण माईंना तसं डोळे मिटून उभ्या असलेल्या पाहातांच ती थबकली; नि भोंवतीं कावरीबावरी पहात माईंच्या मागें निमूट उभी राहिली.

तोंच, डोळे उघडून माईंनीं सूर्यनारायणाला नमस्कार केला,...नि त्या प्रदक्षिणा घालूं लागल्या; अर्धी प्रदक्षिणा होतांच कावरी बावरी उभी असलेली मंजी माईंच्या दृष्टीस पडली. प्रदक्षिणा घालतां घालतां, मध्येंच थबकून त्यांनीं विचारलं, " कां ग, मंजे, काय पाहिजे ?"

"माझा 'दा' आलाय कावं हिकडं ?" ती रडकुंडी चेहेऱ्यानें माईकडे पहात म्हणाली.

२३

"तुझा दा ?– सदू होय ?– असा गेलाय कुठं बाई ?" प्रदक्षिणा पुरी करून मंजीच्या बाजूला वळत माई म्हणाल्या.

"जेवायची वेळ टळली आन् आजून घरींच नाय आला बगा कामा-वरन् !...कुटं गेलाय कोन जान् !."

"जेवलीस तूं, मंजे ?"

"नाय बा !- भात-कोरड्यास, आन् नागलीच्या च्यार भाकऱ्या केल्यात; पन दाबीन् मी कशी वो ज्येवूं ?.."

"काय ग चिमुरडे, कित्ती लाघवी बोलतेस ?– खरंच !... आया लहानपणींच सोडून गेल्या, कीं, पोरक्यांना थोरांची बुद्धी येते म्हणतात !-" माई अर्धवट मंजीला व अर्धवट आपल्यालाच उद्देशून म्हणाल्या. नि पुढं



मंजीला आस्थेनें म्हणाल्या, " मंजे, पोरी, थोडा भात जेव इथं !... नि घरीं पण घेऊन जा जातांना !-"

" नको, माई–" मंजी लगबगीनें चालूं लागत म्हणाली, " आदी 'दा' हाय कां बगून येते मी.."

२४

दबकत दबकतच, ती पुढल्या अंगणाशीं गेली; भिंतीला चिकटून पागोळ्याखालीं उभी राहिली; आणि हळूंच पुढं मान करून तिनें डोकावून पाहिलं. खांबाला टेकून, खालीं मान घालून, डोळ्यांतून पाणी काढीत तिचा 'दा' तिथं होता.

मंजी दचकली; तिला भडभडून आलं; इंगळी डसल्यासारखी ती तशीच आल्यापावलीं परतली. नि तुळशीवृंदावनाशीं माईजवळ उभी राहून रडत रडत म्हणाली– " माई, माई !– काय वो झालं ?– माझा 'दा' रडतोय्, सावकाराफुडं उबा ऱ्हाऊन..."

तें ऐकून माईंनाहि वाईट वाटलं...पण त्या काय करणार तिथं ?— आपल्याशींच चरफडत त्या म्हणाल्या, " आईविना पोर...कां तिला रडवलं देवानं भर दुपारीं ?—"

नि मग, क्षणांतच माईंचं सोवळं संपलं;...त्या पुढे झाल्या; नि मंजीला जवळ घेत म्हणाल्या– " उगीऽ पोरीऽ, तुझा 'दा' इथं माझ्याकडे आल्या-शिवाय नाहीं हं जायचा !—"

माईंचा हात पाठीवर फिरतांच मंजीनें हळूंच डोळे पुसले. ते दोन्ही जीव असल्या परस्पर प्रेमाला भुकेलेलेच होते. अखेर माई आपल्या मनांतच पुटपुटल्या–" असल्या निष्ठुर घराच्या आवारांत वेलीला सुद्धां फळंफुलं नाहीं येणार ! !— "

## २५

आणि मग हळूंच त्या पोरक्या पोरीला कुरवाळत त्या म्हणाल्या—"मंजे, आतां जाऊं नकोस तूं पुढल्या अंगणांत पुन्हां! मी तुला जेऊं घालतें तें जेव गपचुप!-भर दुपारीं कोणीं दिलेलं अन्न—त्याला नाहीं म्हणूं नये हो कधीं!—अंड?...'दा' याच वाटेनें जाईल—"

माईंनीं दोन केळीचीं पानं पुसलीं नि स्वयंपाक खोलीच्या दाराजवळ मांडलीं. मंजी मंत्रमुग्धाप्रमाणें एका पानाजवळ बसली. एकावर माईंनीं वाढलं; दुसरं पान जवळच सदूची वाट पहात बसलं होतं...

मंजीचा चेहरा पुनवेच्या चांदव्यासारखा फुलला होता. तिच्या पाठीवरून आज फारा दिवसांनीं मायेचा हात फिरला होता...माईचा... अगदीं...आईचाच!...पोटालाहि सुग्रास मिळाला होता आईच्या हातचा... गाईच्या आचळांना पाण्याचा ओलावा लागला कीं पान्हा फुटतो; माईंचे डोळे तसेच पाण्यानें भरले होते. मंजी जेवतां जेवतां माईकडे पाहून वांसरासारखी मुरकत होती!—गालांतल्या गालांत हसत होती.

## २६

इतक्यांत गोरामोरा चेहरा घेऊन सदू तिथं आला;... पण मंजीला जेवतांना समोर पाहून सदूचा चेहरा पटकन् खुलला.

तेवढ्यांत माई सस्मित चेहेऱ्यानें म्हणाल्या—"सदू, पोर तुझी वाट पाहून नुकतीच जेवायला बसली बरं! चल... हातपाय धुवून तूं पण बस!—"

दुःखाला लागून सुख, उन्हाला लागून सांवली, अंधाराजवळ उजेड!-पुढल्या तात्यांच्या अंगणाजवळच माईंचं हें मागलं अंगण! त्या चमत्कारानें स्तिमित होऊनच, सदू मुकाट्यानें जेवत होता. नि जेवतां जेवतां आपल्या पोरींकडे तोंडांतल्या तोंडांत स्मित करीत तो कौतुकानें पहात होता.

माई चुलीजवळ बसून त्या बापलेकींच्या आनंदित चेहेऱ्यांचं गुपचुपच निरीक्षण करीत होत्या. तात्यांच्या घरांत माई आई झाल्या नव्हत्या!... पण वाडकरांतल्या बऱ्याच जणांना मात्र त्या आपल्या प्रत्यक्ष आईच वाटत!—

# मंतरलेला बुडकुला ११

## २७

माई!...खरंच, गांवच्या सगळ्यांच्याच त्या आई!—

मंजीच्या आईला—सखूलाहि—माईंची माया होती...आपल्या छोट्या छोकरीसह सखू रोज माईकडे यायची; माईंचीं वरकामं करायची; सखू-मंजी बहुतेक वेळ माईंच्याच मायेत...त्यांच्या प्रेमळ सावलींत...

— पण सखू गेल्यावर, जवळजवळ दीड वर्षानें, मंजी आज माईकडे आली होती;...माईंनीहि तें टाळलंच होतं; त्यांना वाटे—"पोरीनें आईच्या आठवणीनें हंबरडा फोडला,...तर आपण कशी समजूत घालणार?—आपण स्वतः आई आहों थोडयाच?— आईच्या सरावलेल्या हातांलाच पोराची समजूत घालतां यायची!—"

सखू होती तोंपर्यंत ती माईंच्या मागल्या अंगणांतच वांवरायची... घरांतलं सारं उरलं सुरलं, कणीकोंडा, झांकणमांकण त्या तिलाच देत. ती त्या कोंड्याचा सुग्रणपणें मांडा करी. ती, तिचे पति—लेकरूं कृतज्ञतेचे ढेकर देत तें सारं खात. माईंना दुवा देत...नि दिवस तसेच गरीबींत पण आनंदानें घालवीत.

पण जगांतल्या आनंदाची चढण, बहुधा दुःखाच्या अचानक आडवाटांनीं...एकदम निराशेच्या कड्यावरून खालीं तुटते...शेपटाकडून निरुपद्रवी दिसणारा साप दुसऱ्या टोंकानें यमसदन दाखवतो;...असं आहे संसाराचं नि एकंदरींत मानवी जीवनाचं!

सखूच्या संसाराचं तसंच झालं!...ती तडकाफडकी पटकन् उठून गेली;...तिचं जीवन संपलं; सदूचं संसार-नाटक संपलं; तो विधुर झाला; त्याची लक्ष्मी गेली;...मंजी तर पोरकी झाली;...पोरीचं माहेरचं छत्र पोरपणींच उडालं!...

त्या घटनेनें माईंहि दुःखी झाल्या; त्यांच्या राज्यांतला हरकामी मदतगार उठाउठी गेला. सखूला माई म्हणत–' सखे!'...आणि मराठमोळा असली तरी सखू माईंना खरोखरच सख्ख्या बहिणीसारखी,... सखीसारखीच भासे!...

२८

शेवटीं शेवटीं, सखू काम करतां करतां विचारांत पिचत पडलेली दिसायची; तिचं पूर्वीचं मनमोकळं बडबडणं थांबलं होतं...

एके दिवशीं भरल्या डोळ्यांनीच तिला काम करतांना पाहून माई म्हणाल्या—"झालंय् काय तुला?—कुठं दुखतं खुपतंय्?–उपाशीं का आहेस, सखू?–अंऽ?..."

मग सखूच्या मनच्या लोंढ्याला तोंड फुटलं—

दहा वर्षांचा पोर मंजी...एकटी एक...गांवकीप्रमाणें घरांत मोठी पोर कशी ठेवायची?. लगीन करायचं पण पोरीचं व्याज घेऊन तिला जणुं विकायची कशी? पोटच्या गोळ्याचा पैसा का करायचा? पण घरांतहि इकडे ठणठणाट!...सदूला कर्ज झालेलं;...पुन्हा तें हळू हळू वाढत गेलेलं; या सगळ्याचीच सखूला रुखरुख लागली होती. अखेर ती म्हणाली होती– "काय हाय् देवाच्या मनांत कोन् जान्!"

तेव्हां माईंनीं तिची समजूत घातली–"वेडे...देव कोणाला नाहीं टाकत बरं!.. माणसंच माणसांना टाकतात. पोरीच्या नशिबाला देवानेंच ठेवला असेल नवरा–त्याची तुला ग कां काळजी?"

पण मग माई पटकन् घरांत गेल्या. नि त्या परत आल्या तेव्हां एक बुडकुला होता त्यांच्या हातांत! त्याच्या तोंडाला फडक्याचा दादरा बांधला होता. त्याच्यासह माई वृंदावनासमोर बसल्या—त्यांनीं देवाचं ध्यान केलं;... बुडकुल्यावर हळदकुंकू वाहिलं;...एक स्तोत्र म्हणाल्या कसलंसं—



२९

सखू तें सारं पहात होती. शेवटीं तिच्या हातीं तो बंद बुडकुला देऊन माई गंभीरपणें म्हणाल्या– "सखू, आयुष्यांत दुःखं येतात–पण तीं आपणच सारीं सोसायचीं ना? अगदीं असह्य झालं तरच देवाचा आधार! पण आधीं आपला भाव हवा हो देवावर!–हं,...आतां हा घे देवाचा बुडकुला!–"

सखू मंत्रमुग्ध होऊन भाविकपणें माईंकडे पाहात होती. तिनें त्यांच्या हाताकडे पाहात पाहातच तो बुडकुला हातीं घेतला.

तेवढ्यांत माई म्हणाली—"उघडूं नकोस बरं कधीं हा!... यांत राधाकृष्ण, लक्ष्मीदेवी,...साऱ्यांच्या नांवाचे मंत्र लिहून ठेविले आहेत मी!... अगदीं भयंकरच संकट आलं तर तूं किंवा सदूनें तो उघडावा;...देवाचं ध्यान करून, डोळे मिटून, आंत हात घालावा;.आणि मग देव सुचवील, बुद्धी देईल तसं वागावं—"

सखूनें तो मंतरलेला बुडकुडा आपल्या हृदयाशीं धरला. माईंनीं पुन्हां तिला निक्षून सांगितलं— "पण पहा हो सखू— विनाकारण उघडशील तर सारा घात होईल!...सदूला अगदीं सांगूं नको बातलं. कुठं तरी अडचणींच्या वेळींच त्याला हात लाव. नशिबांतले कष्ट नि हाल कधीं सुटत नाहींत, माणसाच्या! पण देवाच्या दयेची आशा मात्र ठेवावी प्रत्येकानें! समजलं? आपण चांगलं वागत असतांना संकट आलं तर देवहि धांवून येतो त्या मागोमागच!... विश्वास मात्र ठेव... जा आतां–"

नव्या उत्साहानें सखू घरीं गेली होती. पुढें आपल्या आयुष्यांत तिनें कधीं तो उघडला नव्हता. आवसेपौर्णिमेला ती त्याची पूजा मात्र करी.

अगदीं मरतांना तिनें शेवटीं सदूला हांक मारून, ठिकाण सांगून, म्हटलं होतं– "माईंचा तो मंतरलेला बुडकुला अगदीं भयंकर प्रसंग येईल तेव्हांच उघडा!"

# बुडकुल्याचं गुपित— १२

३०

— आणि सदूनेंहि त्यानंतर आपल्या हाडांचीं एवढीं काडं केलीं; पण चुकून देखील त्या मंतरलेल्या पवित्र बुडकुल्याला कधीं हात लावला नाहीं.

आज मात्र सदू अगदीं डगमगला होता–'तात्यांचं कर्ज दोन दिवसांत फेडायचं ?... नाहीं तर ते घरादारावर नांगर फिरवणार ? त्यांत मंजीच्या लग्नाचा पुन्हां गळ्यांत फांस !–आपण तर एकटे...'

असल्या विचारांनीं त्याचं मन आज सुन्न झालं होतं. नुकत्याच माईंनी घातलेल्या पोटभर जेवणामुळें आज त्याला त्या गुपित बुडकुल्याची पुन्हां एकदम आठवण झाली होती.

सारी रात्रभर तो तसा तळमळला–त्याला सारखं सारखं वाटूं लागलं– "हाच तो भयंकर प्रसंग...आज...आतांच...तो उघडला तरी सखूच्या आशेंतच असेन मी !—"

"आईऽ आई गोऽ ! माईंनी आज जवळ घेतलं गोऽ मला !!–" शेजारीं झोंपलेल्या मंजीची झोपेंत बडबड चालली होती.

"आई मरो–माई जगो !—" सदू स्वतःशींच म्हणाला नि जागचा उठला. त्याचा जीव आज बेचैनीनें कांहीं केल्या उगीच राही ना !–

३१

अखेर सदूनें घासलेटचं डबडं पेटवलं; एका निश्चयानें तो हळूंच माळ्यावर चढला; भुतासारखा इकडे तिकडे फिरला; आढ्याला वर बांधलेला तो बुडकुला आदरपूर्वक आपल्या हातांत घेऊन सदू खालीं उतरला.

मग रामपंचायतनासमोर बसून, देवाला नमस्कार करीत, बुडकुल्याचा दादरा सोडतां सोडतां तो म्हणाला—"देवा, तूंच माजा तारता–मारता !-तूंच माजं संकट टाळता !—"



आणि अगदीं धडधडत्या छातीनें त्यानें आंत हात घातला; केवढ्यानें चपापला तो—दचकूनच त्यानें हात मागं घेतला.

पण होतं तरी काय असं त्या माईंच्या मंतरलेल्या बुडकुल्यांत ?— लक्ष्मीदेवाच्या मंत्राचे कागद ? ?

—हो,...त्यांत होत्या दहादहाच्या दहा नोटा–तेच ते लक्ष्मीच्या मंत्राचे कागद !—

सदू दचकला—माईंचा मंत्र असा मानवी व्यवहारावर आधारलेला असेल याची त्याला कल्पनाहि नव्हती. आणि मग मात्र सदूच्या भांबावल्या मनाला वाटलं—"हा माईंचा मंत्र !—माईच आमच्या लक्ष्मीदेवी ! तात्यांच्या कर्जातून त्याच मला आज वांचवणार !"

तात्यांचे सारे पंचायशींच रुपये द्यायचे होते उरलेले ! सदू वळकुटीवर अंग टाकतां टाकतां स्वतःशींच समाधानानें म्हणाला— "सकाळीं उठलं कीं पहिलं तें काम !—"

# श्रृंखला तुटल्या ! १३

३२

स्नान करून, सूर्यनारायणाला नमस्कार करून, रात्रीं ठरल्याप्रमाणें, सदू सकाळींच तात्यांच्या अंगणाकडे वळला नि त्यांच्या त्या सिंहासनाच्या पायथ्याशीं जाऊन उभा राहिला.

समोर झुलते तात्या सदूला पाहून झुलतझुलतच किंचित हसले.

"कामधंदा टाकून सकाळींच इकडे रे कुठन्, सदू?" क्षणभरानें त्यानीं सदूची हजेरी घेण्याच्या हेतूनें अर्धवट गुर्मीतच विचारलं.

पण सदू जरा स्वाभिमानी स्वरांत चटकन् म्हणाला– "म्हनलं आज रामपहारींच आपलं दर्शन घ्यावं! सावकार आपले मायबाप...देव दयाळू"

तात्या चपापले...पण याचा लघळपणा चालवूं द्यायचा नाही असं ठरवून, ते म्हणाले– "हें पहा..समजला तुझा कावा...मुदत वाढवायचं-बिढवायचं हळूच सांगणार असशील; पण तें कांहीं जमणार नाहीं बरं का? सांगून ठेवतों...तुला स्पष्ट;...मी काल सांगितलं तेंच अखेरचं! दोन दिवसांची मुदत म्हणजे दोन दिवसांची..."

"नाय नाय–धनी, मुदत वाडवून घ्यायला नव्हं–आजच कर्ज भागवायला आलोंय, समदं!" सदू विनम्रपणें म्हणाला.

तात्या पुन्हा एकदां चपापले–तरी पण तीव्र शद्बांतच चटकन् त्याला म्हणाले–बघ, अर्धं मुर्धं नाहीं आतां चालायचं! तुझी लाडी गोडी नको मला!. सगळे पंचायशीच्या पंचायशी पुरे कर;...नाहीतर तुझ्या जमिनीचं खरेदीखत तरी करून दे!"

"कागद करायचा नाहीं कसला मला!— आधीं केलाय् तो गहाणाचा कागद काडा...तोच फाडून टाकायचाय् धनी!" सदूनें तसं संथपणें म्हटलं नि खिशांत हात घालीत तो म्हणाला–"पैन् पै बाकी चुकवायला आलोंय आज!"

## ३३

तात्यांच्या आयुष्यांत असला अद्भूत प्रसंग कधींच आला नव्हता. केवढ्यानें दचकले ते?...अगदीं निखाऱ्यावर पाय पडावा त्याप्रमाणें त्यांनी अंग काढलं!–"चोवीस तासांत एक नाहीं, दोन नाहीं, दहा नाहीं, पुरी पंचाऐंशीं रुपयांची सव्याज बाकी उभी करून, एकाच दमांत ती चुकती करणारा खेडवळ ऋणको?...हा सद्या??"



छे! त्यांना खरंच वाटेना तें!!

पण तेवढ्यांत सदूनें नोटा बाहेरहि काढल्या. नि तो त्या मोजूंहि लागला. त्याच्या त्या निमूट हालचालींकडे, दांतखिळी बसल्यागत होऊन, आश्चर्यानें नि तारवाटलेल्या डोळ्यांनीं तात्या पहातच राहिले...

तोंच, एक नोट काढून घेऊन नऊ पुढं करीत, सदू एकदम म्हणाला– "हे घ्या मोजून!–आन् पांच रुपय परत द्या, धनी!— नि तो मागला कागद काडा!...फाडाया हवा..."

त्या त्याच्या व्यवहारी पण साध्या शद्बांनी तर तात्या अधिकच चिडले; आणि एकदम मानावर येऊन, त्याच्यावर अधिकारवाणीनें गरजले— "काय रे हरामखोरा?— काल पैसे नव्हते म्हणून रडलास! नि आज या नोटा मोजतोहेस! काय?...एका रात्रींच्या रात्रींत असं सगळं एकदम बदलायला काय दरोडा–डल्ला मारलास कोणाच्या घरावर?...मोठी बेवकूफच जात रे तुमची!–"

"धनी... रामपारीं असली शिवीगाळ कशाला उगीच? पैसे आणले आहेत ते घ्या!...व्यवहार पुरा करा.." सदू तरी पण शांतपणेंच म्हणाला.

त्या त्याच्या थंडवृत्तीनें नि रोख पैशानेंहि तात्या मनांत संतापले. –पण नरमलेहि; नोटा नाइलाज होऊन लगेच हातांत घेत, ते हळूच बेरक्यां कुतुहलानें म्हणाले– "सांगं तरी बरीं रे आणतां?...काय– दुसरा कोणी सावकार पाहिलास-केलास कीं काय?—"

"छे!—माझा मोठ्यांत मोठा सावकार, देव!–" तरी किंचितहि न चिडतां सदू तात्यांना आदबीनें म्हणाला.

गत्यंतर न उरून, कागदपत्र काढतां काढतां, तात्या मागें वळले नि खवचंट हंसत त्याला म्हणाले— "अस्संऽ? मग पैसे नेतांना रे कुठं होता तो तुझा मोठा देव?–"

सदू कांहींच बोलला नाहीं त्यावर...

नाइलाजानें गहाणाचा कागद फाडतां फाडतां, तात्या शेवटीं म्हणाले–
"कांहीं का असतना तुझी झेंगटं !–लेकाच्यांनों,...नाक दाबलं...कीं तोड उघडतं तुम्हा लोकांचं...तें असं !—समजलं ?—"

पण तरीहि सदू कांहीं न बोलतां उठला; खालीं पडलेले कागदाचे तुकडे तेवढे उचलून तो जाण्यासाठीं वळत म्हणाला—"बरं !—झालं तर सारं !...आतां जातों, धनी !—कृपा ठेवा !–"

## ३४

सदूच्या त्या शद्बांतील नि एकूणच आजच्या त्याच्या स्वाभिमानी बेदरकारपणानें...तात्या मनांतल्या मनांत फारच अस्वस्थ झाले होते; पण त्यांचा कांही इलाज नव्हता—

तरी...कसं तरी सदूला नरम आणून ठेवावं, असा विचार मनांत पुन्हा झटकन् येऊन, तात्या त्याला एकदम म्हणाले—"अरे हो...थांब इं, सदू !-कालपासून तुला सांगेन सांगेन म्हणतोंय्–"

सदू जातां जातां थबकला नि गोंधळल्या नजरेनें तात्यांकडे पाहूं लागला.

तोंच, तात्या बेरक्या नजरेनें त्याच्याकडे पाहात पुढं म्हणाले—
"असं बघ...तुझ्या-माझ्या जमिनीच्या सीमेवर तें मोठं आंब्याचं झाड आहे,... 'अंबाईचं झाड' म्हणतात ना ? तेंच !–तें पूर्वीच्या नकाशांत आमच्या शेतांत असल्याचं दाखवलंय्-अगदीं जुन्या नकाशांत पण आहे तें आमच्याच हद्दींत.. तुझ्या बापानें वई-कुंपण खुशाल वाढवलंय् !...तेव्हां म्हटलं;...तें एकदां तुझ्या कानावर घालून ठेवावं !—जागेची केव्हां तरी नवी मापणी बिन-बोभाट करून टाकायला हवीय् !...काय ? समजलं ना ?—"

"अस्सं॒ व्हय् !–मग झाड आपलं असलं तर आपलं...त्याचं आजच कशाला हें, धनी ?—" सदू जरा रंजीस होऊन जायला पुन्हां दाराकडे वळून म्हणाला—"मला म्हणाल तर दुसऱ्याचं कांय् येक नकोय्—"



पण त्याला ठाऊक होतं...आपलं कांहीं खरं असलंहि, तरी असल्या बाबतींत सर्वाधिकारी तात्याच !..तेव्हां उगीच आजच वाद कशाला वाढवा?-

तरी, कर्जांतून सुटल्याचं समाधानच मनांत घेऊन, सदूनें तात्यांसमोरून काढता पाय घेतला...

# देवीचा प्रसाद १४

## ३५

त्या क्षणीं, आपल्या छातीवरची मोठी थोरली धोंड बाजूला काढून ठेवल्यासारखं सदूला वाटत होतं;...आणि या साऱ्याला कारण ?. माई !–आपल्या माई ! !—

कर्ज-मुक्ततेची जणूं फलश्रुति करण्यासाठींच माईंचं पवित्र दर्शन घ्यावं, या हेतूनें, सदू लगबगीनें मागल्या अंगणाकडे वळला—

वृंदावनासमोर माई पूजा करीत होत्या. सदू पुढें झाला...गुडघे टेंकून, वृंदावन नि माई दोघांना एकाच वेळीं नमस्कार करून, तो तसाच स्तब्ध बसून राहिला.

"अरे, अरे, हें रे काय ?. सदू, सकाळींच कुठं इकडं ?-" माई आश्चर्यानें त्याच्याकडे पाहात म्हणाल्या.

"माई, माई, ! तुम्ही आमच्या आई आहात !" सदू अश्रुभरित नेत्रांनी गद्गद स्वरांत म्हणाला– "आजपासून सदू म्होरल्या दारचा गुलाम नाय म्हायला !– आतां मागल्या दारचाच, आपला, जन्माचा गुलाम !– अंगाचे जोडे करून बी उपकार नाय् फिटणार. तुमूच, माई..."

"माझे? ते रे कसे, वेड्या?" सारं ध्यानीं येऊन, माई चमकल्याच मनांतल्या मनांत...

"सखीला तुमी दिलेला बुडकुला काल सोडला मी, माई !-" सदू हळूच म्हणाला;...नि मग इकडे तिकडे पाहात कुजबुजला— "पुडल्या दारचं तात्यासावकाराचं माजं करज...मागल्या दारच्या माईदेवीन् आज फेडलं !—"

"चल् !—सखूच्या देवानें सखूला दिलं!—तुमचा दोघांचा भोळाभावच तुला वेळेवर पावला!—"माई प्रसन्न चेहऱ्यानें हसून म्हणाल्या—"आतां मात्र पुन्हा जोरानें उद्योगाला लाग बरं, सदू !—कोणाच्या कर्जांत नको पडूं फिरून-"

माईंना भरल्या अंत:करणानें हात जोडून सदू उठला. त्या डोळ्यांत, चेहऱ्यावर, रोमारोमांत कृतज्ञता थबथबत होती !...तेवढ्यांत माई म्हणाल्या, —"थांब हं, सदू ! झालीच माझी पूजा !—आतां देवाचा प्रसाद घेऊनच जा घरीं—"

माईंनीं आपला प्रसाद सदूला आधींच दिला होता; सदू माईंच देवाचा प्रसाद घ्यायला आतां थांबला; आणि त्या दिवसापासून माईंच्या मायेच्या ऋणांत मात्र सदू कायमचाच गुरफटला !—

## गोड सपन १५

### ३६

त्याला दिलेले दहीपोहे तिथंच खाऊन नि केळीच्या फाळक्यांत मंजीसाठीं दिलेले बरोबर घेऊन, सदू अगदीं हसत हसतच घरीं पोहोंचला. मंजी



चटकन् दारांत सामोरी आली. आई गेल्यापासून आपला 'दा' इतका आनंदी तिनं कधींच पाहिला नव्हता.

दिलेले पोहे तोंडांत घालतां घालतां, हसून बापाला लाडानें बिलगत मंजी म्हणाली—"काय रे 'दा'? काय झालं आज?-कसला हा प्रसाद?"

"अग पोरी, आपला देव आपल्याला पावला— नव्हं...आपली देवीच आपल्याला पावली !-" सदू मंजीला प्रेमानें कुरवाळीत, उत्साहानें भरभर म्हणाला— "हा माईदेवींचा प्रसाद !— त्यांच्या आशीर्वादानेंच आपन आज तात्यासावकाराच्या करजातून पुर सुटलों !"

मंजीला सदूच्या आनंदाचा नकळतच संसर्ग झाला; नि तीहि हसत गडबडीनें म्हणाली—"खरंच, 'दा'!... माई आईच आहेत... त्यांनीं मला आईसारखं काल जवळ घेतलं-"

### ३७

तिच्या त्या शद्बांनीं सदूच्या मनांत एकदम आलं—"माई...आई !— पण...पण मग...जीवाची किती तळमळ होते त्यांची? त्या आई कधीच का नाहीं व्हायच्या?-"

तोंच मंजी अधीरपणें म्हणाली--"दाऽ, दाऽ रे, तुला एक गंमत सांगायची ऱ्हायली—"

सदू चमकला; बापाला मंजी उतावळ्या गडबड--घाईनें म्हणाली- "दाऽ! काल रातीं मला कनीऽ एक सपन पडलं रेऽ, दा !—माई सवळं नेसून वृंदावनाजवळ बसलेल्या; मी धांवत जाऊन त्यांना शिवलें--मिठी मारली आन् पुडं वाकून पायलं;..त् त्यांच्या मांडीवर एक गोडगोड गोरागोरा पान... बाळ !— किती किती छान !— गोरा गोरा पान...छोटे छोटे कान...इवलीशी मान--इवलेशे डोळे...गडांबद्धां लोळे;...मग माई म्हनल्या—'मंजे, हा बघ होऽ माझा बाळ...याला तूं संभाळ !—हाहि माझा...आन् तूंहि माझी !-"

सदू खुदकन् हसला...त्यानें मंजीला जवळ ओढलं...आणि तो म्हणाला–"साखर पडो गऽ तुझ्या तोंडांत, पोरी!—तुजं सपन खरं ठरो!—"

"खरं व्हईलच!–"मंजी हंसली–"पन् सपन कोन देवच पाडतो नाऽरे आपल्याला, दाऽ?–"

सदू हंसला...नि म्हणाला—"हो...हो...जा पाव्, आतां...जेवायला वाढ! आपण अगदीं पोटभर जेऊं आज!—"

# सिद्ध-साधकांची दुकल! १६

## ३८

"सदूनें आज एक रकमेंत सारं कर्ज भागवलं!" –तात्यांच्या जिवाला शल्य बोचत होतं!–" कर्ज-खत फाडावं लागलं—"

खरं म्हणजे, काल सदूला दमांत घेऊन, तात्यांनी त्याच्या घराखालीं एक मोठा सुरुंग भरला होता. चार आठ दिवसांत त्याला बत्ती द्यायची... महिन्याभरानें तो भडकून उडवायचा-तसा तो सुरुंग उडाला कीं त्यांत सदूचं घरदार, शेतवाडी, कांहीं ना कांहीं जमीनदोस्त व्हायचंच; नि आपल्या वैभवाच्या ढिगऱ्यांत त्याची भर पडायची; हा तात्यांचा होरा होता...अनुभव होता!-

पण आजच्या आपल्या अघटित करणीनें सदूनें तो तात्यांचा गुप्त सुरुंग फुसका ठरवला!–तो जागच्या जागीं विझला. नि पुन्हा सदू मोठ्या दिमाखानें त्यांच्यासमोरूनच हातोहात शिरसलामत निघून-निसटूनहि गेला!



"या भिकारड्याकडे आले कुठले पैसे?—दिले कोणी ते त्याला?- नि पुन्हां हा तात्या या सुंदरगांवांत जिवंत असतांना??—" तात्या आपल्याशींच चुटपुटून म्हणत होते.

तेवढ्यांतच, त्यांचा पिरत्या त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला—

त्याला समोर पाहातांच तर तात्यांना अधिकच चेव आला; पिरत्याहि तेवढ्यांत त्यांना हळूंच म्हणाला—"धनी, सदऱ्या हितनं निगून गेला!—का? आज सकाळचसा?-काय...म्हनत काय व्हता?–सदाचीच ना रड?–बरं...दावा कवा लावायचा त्याच्यावर, धनी?—"

पिरत्याच्या तसल्या प्रश्नांनी, तोहि जणूं आपल्याला टिवल्याबावल्याच करीत आहे असं वाटून, तात्या अधिकच संतापले; नि वड्याचं तेल वांग्यावर काढल्यासारखं ते पिरत्यावरच ओरडले..."गप बस, पिरत्या! सद्या रडला नाही आज!–हसत हसत गेला माझ्यासमोरून!...अगदीं छाती पुढें काढून गेला!"

"म्हंजी?" पिरत्याचे आश्चर्योद्गार आले. त्यांत तात्यांइतकंच दुःखहि भरलं होतं—

## ३९

साऱ्या सुंदरगांवांत, तात्यांशीं जीवाभावाचं सख्य ठेऊन, त्यांच्या व्यवहारांशीं पुरी समरस झालेली एकटीच ही व्यक्ती—पिरत्या!—

स्वार्थासाठीं दुसऱ्याचं वाईट झालेलं तात्यांना चालत असे. पिरत्या गावांतल्या अनेकांच्या वाईटावरच होता...दोघांत असं साम्य, असं सख्य होतं!–म्हणूनच पिरत्या तात्यांचा उजवा हात झाला होता!

गांवच्या साऱ्या अंड्यापिल्लयांची खित्त-बातमी पिरत्याकडे; त्याचा इत्थंभूत वृत्तांत त्याच्याकडूनच तात्यांना सादर व्हायचा. इतरांशीं नि तात्यांशीं बोलतांना तात्यांचा गौरव नि इतरांची हेटाळणी करणं, हा त्याचा

खाक्या !—हीच त्याची मुख्य कामगिरी नि कर्तबगारी—नि हाच त्याचा उदरनिर्वाहाचा मार्ग !...

तात्या पण धूर्त;...पिरत्याची किंमत त्यांनाच खरी माहीत !...नाहीं तरी तात्यांना त्यांच्यापाठीं कोणींच चांगलं म्हणत नसे. तेव्हां त्यांचं प्रचार-कार्य, जाहिरात करणारं एकमेव पात्र म्हणजे हा पिरत्या !...गांवांतलं सारं तात्यांकडे नि तात्यांचा मोठेपणा गांवाकडे अक्कलहुशारीनें पसवणारं एक चालतं बोलतं बुलेटिनच होतं तें !—असला स्वस्त पण वाकबगार हेरहि तात्यांना पंचखंडांत शोधून मिळता ना !—

अशी ही तात्या-पिरत्यांची सिद्ध-साधक दुक्कल सुंदरगांवांत जमली होती!-

## ४०

गांवचे बहुतेक गांवकर मात्र पिरत्याला एखाद्या महारोग्यासारखे टाळीत. तरी देखील, तो लोंचट त्यांच्यांत जाऊन बसे; तेव्हां मग मात्र त्यांचा त्या समर्थांघरच्या श्वानापुढें नाइलाज होई.

देवळाच्या नाक्यावर तात्यांची जुनी ऋणको कुळं गांठून तात्यांचे निरोप नि त्यांचा दम त्यांना द्यावा; गरजूंपुढें तात्यांचे स्तुतिपाठ गाऊन नवीं कुळं जाळ्यांत गांठावीत; तिथं होईल तें नि गांवांत घडेल तें सारं येऊन तात्यांना सांगावं;— असा त्याचा नित्याचाच कार्यक्रम !...

आणि त्याचं तात्यांकडेहि चीज होई. पिरत्याचं पोट असं बरं जळे ! अगदीं कसलंच काम नसेल तेव्हां तात्यांतर्फे त्यांचा प्रतिनिधी म्हणून तो गावोगांव दादागिरी करीत त्यांची वसूली करीत फिरे !...

असा हा तात्यांचा उजवा हात!...रोज सांजसकाळ तात्यांच्या दरबारांत, त्यांच्या त्या सिंहासनाजवळपास, एखाद्या आघाडीच्या मानकऱ्या-सारखा पिरत्या फिरे...बसे—



## ४१

पण म्हणूनच तर, माईच्या राज्यांत त्याला स्थान नव्हतं; त्याची तिकडे फिरकायची, त्याचा वारा तिकडे लावूं देण्याची प्राज्ञाच नव्हती !–

—कारण, पुढल्या अंगणांतलं राजकारण हिंसेचं, तर मागलं अहिंसेचं; पुढलं भीतीचं, तर मागलं प्रेमाचं; पुढलं घरावर नांगर फिरवण्याचं, तर मागलं घरकुलांतल्या देवाजवळ समई तेवत ठेवण्याचं !— मग पुढल्या अंगणांतल्या दरबारांतला हा मुरब्बी मानकरी मागल्या! सिंहासनापुढें जिवंत तरी उभा कसा राहणार?–पण पुढची बिनीवाल्याची जागा सोडून मागल्या राज्यांतल्या पिछाडीचा शिलेदार होण्याची पिरत्याला इच्छाहि नव्हती—जरूरीहि नव्हती!

अलीअलीकडे सदू मागल्या अंगणांत पुष्कळदां वांवरतांना दिसे; तें पाहून मात्र पिरत्यानें सदूबद्दल तात्यांचे कान फुंकायला सुरवात केली होती. —सदूचा कांटा काढून त्याला तात्यांच्या सिंहासनासमोर जमिनीवर लोळ-वणं, हा पिरत्याचा चालू डाव, चालू महत्वाकांक्षा ! —त्या त्याच्या भडक लावालावीनेंच, सदूच्या कर्जाचं प्रकरण मनावर घेऊन, तात्यांनी काल तसा सदूच्या घराखालीं सुरुंग भरला होता...तें पिरत्यालाहि ठाऊक होतं !–

— आणि त्या आपल्या कलाकृतीच्या शेवट आतां कसा काय लागणार, याचा अंदाज घ्यायलाच पिरत्या आज सकाळीं तात्याकडे मोठ्या उत्सुकतेनें आला होता.

पण तात्यांनीं जें सांगितलं, पिरत्यानं जें ऐकलं, तें तर सारंच विपरीत!... "सदू आनंदानं गेला; कर्ज फेडून गेला; छाती पुढें काढून गेला !"

मग कां बरं चमकणार नाहीं पिरत्या ?

## ४२

शेवटीं, नाइलाजानं, तात्यांनीं घडलेलं सारं पिरत्याला सांगितलं !

त्यावर पिरत्या धोरणानें म्हणाला—" दोन दिसांत या साऱ्या भान-

गडीचा तलास लावतों मी, तात्यासावकार ! पन् काल म्हनलं तें त्याचं आंब्याचं झाड ! ठेवलात का देऊन त्याला दम ? त्या दुसऱ्या मागानूच आपन आनूं त्याला वठणीवर ! पळणार कुटं हरामखोर ?

“ हो...पण तो न भांडता...वाद न करतां गेला निघून-” तात्या नाराजीनें पुन्हां म्हणाले.

“ हां हां तर !-सद्या म्हंजी धरमाचा अवतारूंच !-पन्...तात्या...” पिरत्यानें बोलतां बोलतां हळूंच नवा डाव टाकला-“ करज फेडलं असलं त्या सतीच्या आगींत परवा डल्ला मारून—लखपतीचा सत्यानास झाला तवा हा होता ना मदतगार गांवकर !-भंवती भंवतीं घागरी घेऊन फिरत व्हता, बेटा !- लागलं असल तवाच हाताला येखादं नोटांचं भिंडोळं !- आन् आतां अशी छाती पुडं काडतो काय ?- मागून पिरत्याची लाथ बसल कंबरड्यांत तवा आपसूक कोलमडल, बेटा !”

तात्या आपल्याच विचारात होते; त्यांनीं तें ऐकलं; पण कांहींच बोलले नाहींत त्यावर !—

## ४३

तेवढ्यांत पिरत्यानें नवा विषय काढला- “ सबा हाय् ना, धनी, आज त्या मामलेदाराची ?- सतीची सीलबंद पेटी उघडणार हाईत मामलदारसाइब सर्वांसमक्ष-समदे गांवकर सानचे जमणार !- ”

“ अरे होऽ खरंच कीं”...तात्यांना तें आठवून जरा रागानेंचं ते म्हणाले- “त्या देवाला नाहीं उद्योग !-ही असली तरणीं तरणीं पोरं अंमलदार होऊन आलीं कीं असंच घ्यायचं हें !-हेच ठेवणार असे या गांवकर मेंढरांना डोक्यावर चढवून !- ते जातील आपल्या घरी...नि मग इथं राहाणाऱ्या आम्हाला मात्र सारा त्रास !...”

तात्या बोलतां बोलतां अंघोळीस म्हणून उठले; तेव्हां पिरत्या त्यांचा निरोप घेऊन निघत म्हणाला—“ हं...देवांची सबा...”

# देवांची सभा



## ४४

लखपतींची बंगली पेटल्याला नि मिरा सती गेल्याला आतां पंधरा दिवस झाले होते—वास्तविक, देव दुसऱ्याच दिवशीं सभा भरवणार होते...पण दुसऱ्या एका गांवीं त्यांचे मधले कांहीं दिवस गेले. मग तालुक्याच्या गांवची त्यांची हजेरी; पुन्हां त्या दुसऱ्या गांवीं चौकशी— असा मधला पंधरवडा गेला होता.

त्या शेजारच्या दुसऱ्या गांवीं तर दिवसा ढवळ्या मोठा दरोडा पडला होता; अर्थात्, तिथला पंचनामा, चौकशी बंदोबस्त; तें सारं झाल्यावर, शेवटीं, आज कुठं मोकळं होऊन, सुंदरगांवला येऊन, देवांनी ही सभा घेतली होती.

“ जळलेल्या बंगलीभोंवतीं गांवच्या सगळ्या जाणत्या माणसांची संध्याकाळीं जमावं; सतीची सीलबंद पेटी सर्वांसमक्ष उघडायची आहे–” अशी गांवांत दवंडी पिटली होती. तात्यांना केवळ नाइलाजानें त्यांत भाग घ्यावा लागणार होता. पण त्यांना मनांत वाटलं-“ अंमलदाराशीं उगीच वाकडं नको-”; नि म्हणूनच, त्यांनीं चार ग्यासच्या बत्त्या लावल्या; एक टेबल शृंगारलं; नि चार खुर्च्याहि मांडल्या...

तात्यांच्या साऱ्या हयातींत, साऱ्या कारकीर्दींत, कोणा अंमलदारानें असला ‘अव्यापारेषु व्यापार’ केला नव्हता. सभा भरवून लोकांपुढें सारे डाव खुले करायचे म्हणजे माकडांहातींच कोलीत देणं ! “ हा कोण तरणा पोर ! –देव म्हणे तो ! तेवढाच जणूं आज आकाशांतून पडला.’... त्यांना मनस्वी राग येत होता; पण सत्तेपुढें शहाणपण नसतं, म्हणतात. म्हणूनच, त्यांनी परिस्थितीपुढं निमूट मान वांकवली होती.

## ४५

साऱ्या उत्सुक वाडकरांनी सभा अगदीं गजबजली होती. देव मोटरींतून उतरले; टेबलाशीं गेले. तिथंच सतीची सीलबंद पेटी होती.

क्षणभरानें उठून देव बोलूं लागले– "गांवकरी मित्रांनों, ही सभा आधींच व्हायला हवी होती; पण नाइलाजानें पुढें ढकलावी लागली. कारण– तुमच्याच शेजारच्या तीस मैलावरच्या भैरवगांवीं...अगदी दिवसाढवळ्या दरोडा पडला; त्याच्या तलासांत मी गुंतलों होतों.

"काय गंमत आहे पहा–जगांत स्वर्ग नि नरक जवळ जवळच पाहायला मिळतात!–कारण, स्वर्ग काय, नरक काय आपणच तयार करतों, नाहीं का, शेवटीं?–स्वतः मिरा सतीचीच माहिती सांगते—कीं, तुमच्या गांवच्या लखपतीमुळें तुम्ही त्रास सोसलात;...दारिद्र्यांत लोळलांत!–पण मग, तुम्ही नव्हे...तिनं स्वतःच्याच हातानें स्वतःची होळी करून घेतली;–त्या मार्गानें तुम्हाला कर्जमुक्त केलं!...स्वत: होऊन तुम्हाला कांही वैभव ठेवलं नि ती गेली—

"उलट, भैरवगांवीं तिथल्या शेठजींच्या घरावर दिवसाढवळ्या दरोडा...सारं वैभव ओरबडून नेणं,...त्या शेठजींचा खून पडणं...असं सारं विपरीत घडलं!...पण आश्चर्य पहा–दरोडखोर कोण, आले कुठून, गेले कुठं...याचा अजून खरा थांगपत्ताहि लागत नाही!—त्या गांवकऱ्यांना यांतलं कांहीं एक माहीत नाही, म्हणे!! त्या दरोडखोरांनी त्या शेठजींचे सारे कागदपत्र, त्यांच्या बंगल्यासमोर ढीग करून जाळले;... हा अपराध पुरव्यानिशीं उघडकीस येईल, तेव्हां कित्येकांना न्यायाला धरून मोठमोठ्या शिक्षा होतील...त्यांतले कांही गांवकर त्यांत नक्कीच असतील...

"पण उलट तुमच्या गांवात होती एक सती!.. तिनेंच पतीच्या मृत्यूनंतर विचार करून स्वतःच्या हातानें शेठजी, शेठजींचे कागद नि स्वतः सारं बंगल्यासकट जाळून घेतलं...आपल्या त्या आत्महत्त्येच्या अघोर अपराधाला सुद्धां स्वतःबरोबरच कायमचं जाळून टाकलं—

"त्यांत गंमत ही, की तुमच्यांतला कोणी या भयंकर प्रकाराला जबाबदार नाही; उलट, तुम्ही तो हाः हाःकार विझवायचाच प्रयत्न



केलांत!– ह्या धडपडीत, तुमच्यांतल्या चार चौघांना दुखापतीहि झाल्या... हें आम्हाला माहीत आहे!– तुमच्या गांवच्या गांवकऱ्यांच्या या माणुसकीबद्दल सरकार तुमचं अभिनंदन करील...अशी माझी खात्री आहे, कीं तुमचं हें सुंदर गांव सुंदर माणसांनींच भरलेलं आहे!–"

जमलेल्या स्वाभिमानी वाडकरांकडून एकदम टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांचे चेहरे प्रफुल्ल झालेले पाहून, दव मामलेदारांनींहि प्रसन्न स्मित केलं. उलट, तात्यांचा चेहरा मात्र एकदम पालटला-पडला!–

## ४६

तोंच क्षणभरानें देव पुढें बोलूं लागले—"तुमच्या चांगुलपणाची जाणीव होती म्हणूनच कीं काय, मिरा सती आपलं सारं पावित्र्य, आपलं सारं वैभव, तुमच्या गांवाच्या ताब्यांत देऊन गेलीय्–या पेटींत काय आहे तें पाहायला माझ्या इतकेच तुम्हीहि सारे उत्सुक असाल; सतीचीच इच्छा आहे–कीं सर्वांसमक्ष ती उघडली जावी—ती पुरी करायलाच आज आपण जमलों आहों सारे!—"

क्षणकाळ देव थांबले; नि आपल्या कारकुनाकरवीं त्यांनी ती पेटी उघडली. सभेंत चटकन् सामसूम झाली–जमलेले सारे उत्सुक डोळे देवांकडे लागले होते—

देवांनी शिसवी झांकण उघडलं नि आंत हात घातला.–आंत बरेच लहानमोठे सोन्याचांदीचे दागिने, नोटांचीं कांहीं भेंडोळीं, नि रोख नाणीं होतीं!— वरतीच एक चिठी होती...

देव मनांतल्या मनांत ती वाचत असतां, सभेंत एक सूक्ष्म कुजबुज झाली–

क्षणभरानें, समाधानी चेहरा करून, पुन्हां सर्वांना उद्देशून देव म्हणाले–"मिरा सती यांत म्हणते आहे—आपल्या माहितींतले हे दागिने, दिलेल्या यादीप्रमाणें ज्यांचे त्यांना द्या!– रोख रुपये नि नोटा आहेत, त्या मात्र साऱ्या गांवकऱ्यांच्या मालकीच्या...त्यांनी त्याचा उपयोग सर्वांच्या हितासाठीं करावा.

या बंगल्याच्या जागीं एक छोटंसं देऊळ, शेजारीं धर्मशाळा नि तिच्या जवळच मग एक विहीर बांधावी !—सर्व साऱ्या गांवकऱ्यांच्याच मालकीचं असावं..."

देव थांबले...सारे वाडकर क्षणभर स्तब्ध-निःशब्द झाले...मग पुन्हां कुजबुज सुरू झाली...

कित्येकांचे कृतज्ञ डोळे आसवांनी भरले होते-कित्येक थरथरत्या ओठांनी म्हणत होते-" मिरा माय मोठ्या मनाची !—" " देव तारी त्याला कोण मारी !-" " सुंदर गांवाचं नशीब आतां फिरलं-सुंदर ठरलं !-"

## ४७

गांवकऱ्यांच्या आनंदाला आलेला लोंढा वाहून जायला क्षणभर अवसर दिल्यावर, मग देव पुन्हा म्हणाले—"सभा संपल्यावर ही यादी वाचूं;-माझ्यासमक्ष, प्रत्येकानें आपला ऐवज, पावती देऊन, घेऊन जावा;...रोख रक्कम सारी होईल ती आंतच मोजून कळविली जाईल; नि एक पंचमंडळ निवडून त्यांच्याच ताब्यांत ती दिली जाईल !-"

मग देवांनी सर्वांसमक्ष ते पैसे कांही वेळ मोजले; रक्कम दहा हजार एकशें एकवीस नि कांहीं आणे अशी भरली—देव पुन्हा उठले नि गांवकऱ्यांना म्हणाले- "निवडलेल्या पंचमंडळाकडे ही रक्कम दिली जाईल...सतीचीच ती इच्छा आहे !—"

'एवढीं मोठी रक्कम, साऱ्या गांवकऱ्यांची'या आनंदानें कित्येक वेडेच झाले जणूं;-त्यांचा तो उत्स्फूर्त आनंद !—पण तात्यांच्या मनाला तर तो कुरतडूनच जात होता.

तेवढ्यांत, देव पुन्हा हात वर करून सर्वांना शांत करीत म्हणाले- " एवढ्यानें सारं होत नाही !—सतीच्या या महान् धर्माला तुम्ही गांवकरांनी हातभार नको का लावायला?-तुम्हा साऱ्यांच्या सुखाची मला सुचतेय ती कल्पना आतां सांगतों मी—"



ही देवांची नवी कल्पना कोणती हें ऐकायला सारे एकदम तटस्थ झाले. तात्याहि आश्चर्यचकित मुद्रेनें देवांकडे भांबावून चमकून पाहूं लागले—पण त्यांना मनांत वाटत होतं-"आतां कांहीं तरी अगदीं विपरीतच होणार !"

# दरिद्री कर्ण! १८

## ४८

खरंच ! अधिकार ही एक जगांतली न्यारीच चीज आहे !—

मातीचा नुसता चिखल कालवून दुसऱ्याच्या अंगावर फेकतां येतो... त्याची टर उडालेली पाहून आपल्याला सहजासहजीं हसतां येतं!-पण चाकावर फिरवून तिचींच निरनिराळ्या आकारांचीं मडकीं करतां येतात. कलावंताच्या हातांत तर त्या मातीचीच सुंदर मूर्ती होते. तिची अखेर गणपति म्हणून स्थापना होऊन पूजा नि आरतीहि होते !...

चांगल्या गोष्टीला वाईट नि वाईट गोष्टीला चांगलं करणं माणसा-च्याच हातीं असतं !- अधिकार हीहि चीज एक अशीच न्यारी आहे !-

अधिकारानें चिखल माखवतां येतो;— अधिकाराला देवपणही आणतां येतं !—अधिकाराच्या मदानें मदन्मस्त होता येतं !-पण अधिकारा-च्या भारानें स्वतःच विनम्र होऊन वाकतांहि येतं !- आपल्या रयतेचं आपल्या मुलाप्रमाणें पालनपोषण करतां येतं!...उलट अधिकाराच्या बळावर, रयतेची

पोळी सुळावर चढवून, त्यांच्या जिवाची होळी करतां येते...किंवा त्याच शक्तीच्या पाठिंब्यानें प्रजेला कोंड्याचा मांडा करूनहि खायला घालतां येतो !..

पुन्हां कोणी म्हणतं, म्हणे- ‘ नांवांत काय आहे ? ’...पण नांवांतच सारं काय तें भरलेलं आहे !...लक्ष्मीबायनें गवऱ्या वेचल्या; अमरचंद मरून गेला;..सोनूबाईच्या हातांत कथलाचा वाळा आला;...म्हणून तेवढ्याच पुराव्यावर नांवांत कांही नाहीं म्हणण्यांत कांहीं अर्थ नाही. नशिबानें असंहि होतं !- पण म्हणून लक्ष्मीनें लक्ष्मी होण्याचा,..अमरचंदानें अमर होण्याचा,...अगर सोनूबाईनें खरंखुरं सोनूबाई होण्याचा प्रयत्न कां करूं नये ?...आपल्या नांवाला आपणच किंमत देणं नि तसं होणं, हें आपल्याच हातांत जास्त असतं !-त्या गोष्टींतला ठणठणपाळ बिचारा फसला तो इथंच !...

देव मामलेदारांची देवासारखी वागणूक झाली होती ती या समजुतदारपणामुळेंच !...नांवावरून त्यांची वागणूक कीं त्यांच्या वागणुकीवरून त्यांचं नांव पडलं होतं...हेंच उलट साऱ्यांना कोडं पडलं होतं !...

आतां,...देवांचं नांव नि वागणूक दोन्ही तात्यांना आवडत नव्हतं, नि दोन्ही गोष्टी पसंतहि नव्हत्या...ही गोष्ट निराळी !...

## ४९

देव पुन्हा बोलायला उठले तेव्हां वांडकरांतल्या प्रत्येकाच्या जिवाचे कान त्यांच्या साऱ्या शद्बांकडे लागले होते !...याचं कारण हेंच. मामलेदार म्हणजे शेंदीडशें गांवचा राजा !...त्या अधिकाराचा देवांकरवीं होणारा तो उपयोग सर्वांनाच संमत होता, प्रिय होता. सतीनें स्वतःचा होम केला; देणगी दिली. देवांनीं आपल्या अधिकाराचा उपयोग करून त्यांतून सर्वांना विसांवा निर्माण करण्याची नवी कल्पना दिली—

ते म्हणाले—अगदीं गंभीरपणें म्हणाले—“ हे पैसे आपल्याकडे आहेत...पण लखपतींची जागा साऱ्या गोष्टी एकत्र आणायला फार अपुरी पडते आहे !—गांवाच्या मध्यावर सर्वांची सोय हवी...इथंच एक



विहीर, इथंच धर्मशाळा, देऊळ, नि इथंच पुढेंमागें जमली तर शाळा... सारं सारं व्हावं—असं मला तरी वाटतं !...पण मग, एवढ्याशा जागेच्या चौकटींत हें सारं कसं जमणार ?—म्हणूनच तर तुमचं साऱ्यांचं सहकार्य हवंय् मला !–”

एक दोन वयोवृद्ध गांवकर पटकन् उठून म्हणाले—“ रावसाहेब,– आमच्या हिताचंच आपण सारं करणार !...मग सांगा ना आम्ही काय करावं तें !–होईल तें आमच्या हातचं आम्ही नक्कीच करूं !—”

देव स्मित करून म्हणाले–“ बरं तर,–असं पहा—ही सतीची जमीन–याच्या उजव्या बाजूला ही जमीन कोणाची ?–मला वाटतं, तात्या पाटलांची—आणि ही डाव्या बाजूला नि मागपर्यंत विस्तारत तात्यांच्या जमिनीला येऊन मिळणारी ही जमीन कोणाची ?—”

“ माझी ती, धनी !...” सदू आदबीनें उठून म्हणाला. सदूकडे क्षणभर पाहात राहून देव पुढें म्हणाले--“ तर मग माझी तात्यापाटलांनाच एक विनन्ति आहे—त्यांनीं आपल्या या सतीच्या जमिनीला लागूनच्या जमिनींतली एक एकर दीड एकर गांवाला द्यावी !–ती सतीच्या जागेला जोडली कीं झटकन् साऱ्या गांवाच्या साऱ्या सोयी होतील ! ”

## ५०

सारी मंडळी तात्यांकडे आशेनें पाहूं लागली. देवहि एकदां हळूंच तात्यांकडे पाहून साऱ्या सभेकडे चौफेर पाहूं लागले.

फिरून चौफेर सामसूम झालं—गप्प बसलेल्या तात्यांकडे सारे अधून-मधून पाहात होते...पण तात्या कांही न बोलतांच एकदां खालीं मान घालून बसले ते बसलेच !...ते सर्वांची–देवांची सुद्धा–दृष्टी प्रयासानें चुकवीत होते.

“माझी मागणी फारच लहान आहे!” क्षणभरानें देव म्हणाले–“ साऱ्या गांवाच्या सोयीपुढें तर ती कांहींच नाही !– आज गांवांतल्या तुमच्या आया-

बहिणी भरदुपारीं आडवाटा-शेऱ्या तुडवीत काट्याकुट्यांतून मैलभर लांब-गांवाबाहेरच्या नदीवर जातात !...त्या ऐवजीं इथं मध्यावर मोठी विहीर... शेजारीं धर्मशाळा झाली-जवळ देऊळ झालं...आहाहा ! काय आराम होईल साऱ्यांना ?—सती दयावंत...तिनें गांवाला देणगी दिली...ती देणगी-तिचं तें धार्मिक पावित्र्य-शिरावर कायमचं वाहण्यासाठीं भूमीदान कोण करतो, सांगा ?—सतीच्या शेजारानें जागा होऊन, गांवकऱ्यांच्या जीवनाला जागा देणारा...दान करणारा, कोणी कर्ण तुमच्या गावांत नाहीं कां ?—"

या शद्बासरशीं पटकन् उठून तात्या जागा देतील अशी देवांची कल्पना—पण असल्या केवळ कल्पनेस हृदयांतहि जागा द्यायला तात्यांचं हृदय त्यावेळीं जागं होईना !-

एकमेकांकडे नि तात्यांकडे पाहात सारे स्तब्ध बसले. देवहि बरेच हिरमुसले झाले !- पण...

## ५१

इतक्यांत, त्या शांततेचा भंग झाला; —कोणीसं दूरच्या कोंपऱ्यांतून ओरडलं—"सरकार-" देवांसकट सारे तिकडे पाहूं लागले—सदूच होता तो !-आदबीनें उठून चांचरल्या स्वरांत तो म्हणाला-"ल्हान तोंडीं मोटा घांस नाय् ना व्हायचा ?-मी गरीब, दरिद्री !...सतीपाशींच माजी सारी दोनच एकर जमीन;...पन...पन...मी देतों कीं, त्यांतली येक एकर... सतीच्या पंचांच्या ताब्यांत ! -त्या आंब्यालगतची जागा-ती बगा...आमच्या कुळाची आंबाई ती !...तिच्या तळापाशीं गांवची हीर बांधतां येईल;... सतीच्या जागेंत धरमशाळा नि उरल्या जागीं पुडंमागं गांवची शाळा..."

सर्वांनीं टाळ्यांचा एकदम कडकडाट केला; सर्व जण आनंद-आदरानें सदूकडे पाहात म्हणाले..."वा...सदबा !—तुमी आज तुमच्या कुळाचं नि आमच्या गांवाचं नांव राखलं !"



तोंच देवहि सस्मित चेहऱ्यानें उठले व स्वत:च टाळ्या वाजवीत म्हणाले- "हं, आतां कुठं समाधान वाटलं,...माझ्या मनाला !- गरीब असले तरी तुमच्यातले सदबा हे महन् कर्ण आहेत !...असेच सारे गुण्या-गोविंदानें रहा;...एकमेकांच्या सुखासाठीं साऱ्यांनीं असंच झटावं !-मी-मी,... माझं-माझं ही आपली माणसांची भाषा नव्हे;...साऱ्यांसाठीं एकानें नि एकासाठीं साऱ्यांनीं नेहमीं झटलं पाहिजे !—आपले सदबा माणूस आहेत;...ते शिकलेले नसले तरी त्यांना माणुसकीचा उदारपणा कळतो;- तेव्हां याच बैठकींत, मी त्यांचंच नांव सतीचे एक पंच म्हणून प्रथम सुचवतों...तुमची आहे ना सर्वांची संमती ?—"

सर्वांनीं 'हो हो !' म्हणत आनंदानें टाळ्या वाजवून रुकार दिला—

## ५२

तात्यांचा चेहरा साफ पडला होता. ते तसेच खालीं पाहात होते. देवांच्या भाषणांतील खोंच त्यांना झोंबण्यापेक्षां ( साऱ्या गांवकर-मामलेदारांनीं मिळून प्रेमानें केलेला ) तो सदूचा अनपेक्षित गौरवच त्यांच्या हृदयांत बोंचत गेला; चरचरां कापत गेला !—

—"आपण गांवचे पाटील !—सदू म्हणजे कालपर्यंतचं आपल्याच पाशांतलं घुंगुरटं !-त्याच भिकारड्या सदबाचं सर्वांसमक्ष आज असं देवांकडून कौतुक !- एवढा मोठा गौरव ! !-हें...काय म्हणे...कर्ण !- पण मी त्याला पुरून उरणारा अर्जुन आहे अर्जुन, म्हणावं !!- हाच काय पण स्वर्गांतला जरी देव उतरला,...तरी या कर्णाच्या तंगड्या ओढायला, अखेर हा अर्जुन कमी करणार नाही,...म्हणावं !-"

तात्यांचे असले विचार मनांत चालले असतांनाच सभेनें सतीचे पंच निवडले. सदबा सरपंच झाला—सभा संपली नि देवांनीं त्याच बैठकींत दागिन्यांची सतीच्या यादीबरहुकुम वांटणी सुरुं केली—

# अमृताचा झरा- १९

## ५३

कां कोण जाणें, सती-समितीच्या त्या पंच-मंडळांत तात्या पाटलांचा समावेश नव्हता. आणि, त्यामुळें तर तात्यांच्या हृदयाला अगदीं मिरच्याच भगभगल्या !...

सुंदरगांव सोडून आपल्या मुख्य कचेरीकडे जाण्यापूर्वी, पंचमंडळाच्या हातींच सतीची सारी रक्कम देऊन देव म्हणाले—"घ्या, हें सतीचं वैभव ! आतां गांवचेच मजूर गांवच्या कामाला लावा. विहीर दीड दोन महिन्यांत,-धर्म--शाळा चार पांच महिन्यांत...पतपेढी वर्षाभरांत झाली पाहिजे-असं सारं झालं तरच तुमचे सावकारी पाश थांबतील ! धान्य-खजिना करून त्यांत गांवचं सारं अवांतर शिल्लक धान्य ठेवा. तशी ठेव ठेवणाऱ्यांना धान्य-रूपानें व्याजहि द्या !- सती-समितीतर्फें बाजार-खरेदी-विक्रीची दलाली करा. बघूं काय काय करतां तें !- सतीच्या रूपानें तुम्हाला आतां देवच पावलाय् !-पण देव सारं करत नाही-तो प्रयत्न करणाऱ्यालाच मार्ग काय तो दाखवतो; चांगलं करतो तें सारं माणूसच !..चिखलांत रुतलेली गाडी, कपाळावर हात घेऊन देवाचा धांवा केला,..म्हणून एकदम पुढं चालू लागणार नाही. चाकाला नेटानें खांद्या मारला पाहिजे स्वतः !..मगच देव पाठीमागून सहाय्य करतो ! हें ध्यानांत ठेवा.."

'शुभस्य शीघ्रम्' म्हणून साऱ्या गांवाची त्याच दिवशीं सभा भरली; सदूच्या जागेंत एक मोठं थोरलं अफाट वर्तुळ मारून देवांनीच विहिरीची पहिली पहार मध्यभागीं मारली. साऱ्या गांवकर पोरासोरांनीं आनंदानें टाळ्या वाजवल्या !—

-नादुरुस्त प्रकृतीच्या सबबीवर, तात्या मात्र त्या मुहूर्त समारंभाला हजर नव्हते; ओशाळं अपराधीं मन नेहमीं असंच वागतं !—



## ५४

आणि त्या दिवसापासून सुंदरगांवांत नवी नवाई...नवा उत्साह सुरू झाला. मजूर, गवंडी, सुतार,, आसपासचे विट-कारखानदार,...दगड-चुना -रेतीचे व्यापारी,..साऱ्यांनीं माफक दर लावले;-त्या साऱ्यांना तें नवं सहकार्य नवाच उत्साह आणीत होतं !...

विहिरीचं काम तर अगदीं रात्रंदिवस चाललं होतं.— पहिला झुळझुळता झरा जेव्हां फुटला तेव्हां अगदीं मध्यरात्रीं सारीं कामकरी मंडळीं मोठ्या आनंदानें ओरडलीं—"जय सती माई !— जय अंबाई !!.."

सारा गांव एकदम खडबडून जागा झाला; विहिरीभोंवतीं जमला. मग तेवढ्या रात्रींच सतीच्या पंचमंडळींनी साऱ्या गांवाला साखर वांटली.

तात्या तिथं हजर नव्हते. म्हणून सदू साखर घेऊन स्वतःच मुद्दाम ह्यांच्या घरीं गेला.

माई दारांतच उभ्या होत्या. त्यांच्याकडे उत्साही चेहेऱ्यानें व प्रेमळ नजरेनें पहात, सदू आनंदी स्वरांत म्हणाला-"माई, माई ! सतीच्या हिरीला मनगटागत झरा फुटलाय् पान्याचा !... तात्या सावकार कुठं ?.. ते न्हाईं उटलं ?— "

—पण गांवांत एवढी गडबड चालू होती—तरी तात्यांनाच तेवढी गाढ झोंप लागली होती. सतीचा शेजार असूनही तात्या झोंपले होते...

सदू हिरमुसला होऊनच, माईंच्या हातीं साखरेची पुडी देऊन गेला.

## ५५

पुढले तीन महिने कसे गेले तें गांवकऱ्यांना समजलं सुद्धां नाहीं !— सदू तर रात्रंदिवस सरपंच म्हणून त्याच कामांत गर्क होता.

सारे गांवकर धर्मशाळेच्या बांधकामासाठीं दगड-विटा-चुना यांच्या पाट्या शिस्तीनें वाहतांना, ठेक्यात गाणं म्हणत होते-

या दगडी भिंती गानं गाती !—इमारती मर्दांच्या हातीं !...
अर् धनीपनापुरतिच शिरमंती !...इमारती पर् मर्दांहातीं !...
ह्यों पोट बिगाऱ्याचं हातांत ! भाकर बुडलि र् या घामांत !...
पर् जोर बगा ह्यो या दंडांत !...मुई कशी पन् केली चीत !...
आर बामन करतो घरांत मोती ! शेतकऱ्याच्या तोंडीं माती...
पर् दगडी भिंती गानं गाती—'इमारती मर्दांच्या हातीं !'
हाय् दुनियेमंदी दानत खोटी—मर्दांच्या हातांत नरोटी !—
पग् पैशापायीं लय अंधेरी !— काम करुन बी ये अंधेरी
पर् दगडी भिंती गानं गाती —'इमारती मर्दांच्या हातीं !'
—सदू म्होरक्या म्हणून त्यांना गाण्यांत सांथ देत होता—

हळूहळू विहिरीचं मोठं थोरलं बोकल उभं झालं होतं; नि भोंवतीं कपडे धुवायचं वर्तुळाकार बांधकामहि झालं होतं...त्याला सिमेंटचा गुळगुळीत गिलावा चालला होता...आठ मोठे राहाट लावून त्यांना रंग दिला जात होता. धर्मशाळेचं काम पुरं होऊन त्यावर मंगलोरी कौलं चढत होतीं...

५६

शेवटीं, विहीर साऱ्या गांवाला मोकळी करण्याचा मोठा समारंभ पंचायतीमार्फत ठरला; आणि त्यासाठीं देवांनाच सदूनें बोलावून आणलं.

देवांनीं स्वत: रहाटानें विहिरीचं घागरभर पाणी काढलं...नि त्यांतलं ओंजळभर स्वतः पिऊन, ते सस्मित म्हणाले—"अमृत !... हेंच तुमच्या गांवचं पवित्र जीवन !...आज हें सारं कांहीं पाहून माझ्या डोळ्यांचं पारणं फिटलं !— तुमच्यांत एकी आहे—मनांत आणलं तर तुम्ही वाटेल तें कराल !— सहा महिन्यांपूर्वी याच जागीं लखपतीच्या बंगलीची राखरांगोळी झाली— तिथेंच आज साऱ्यांना निर्मल जीवन देणारी ही विहीर...नि साऱ्यांना सांवली करणारी ही प्रशस्त सुंदर धर्मशाळा झालीय्...हें सतीनें जातां जातां



नुसतं ठरवलं;...पण तुम्हीच स्वतः केलंत !—म्हणूनच तें झटकन् झालं ! व्हा ! असेच पुढें व्हा !...असेच पुढें व्हा !— पुढें व्हा !!—"

सारे आनंदले; त्यांचे चेहरे कमळासारखे फुलून आले. तोंच, देव पुन्हां म्हणाले—"हीच तीं माणसांची एकी ! मातीमधें अमृत, उन्हामध्यें छाया—हा सारा तिचाच प्रभाव असतो !— आतां माझी एक तुम्हाला विनन्ति आहे—प्रत्येक वेळीं बाहेरचा माझ्यासारखा माणूस कशाला हवा ?— तुमचं सुख...तुमचं दुःख...तुमच्या हातीं—तुमच्यासाठीं !—तुमच्यांतली आपापसांतील दुही, हेवेदावे...तंटे—मतभेद—तुमचे तुम्हीच सोडवायचे;..तुमचीं सुखं तुम्हीच निर्माण करून भोगायचीं !—एक लक्षांत ठेवा;...एकी असली तर दुष्टाला दुष्ट व्हायलाहि लाज वाटते !...सुष्ट तर अधिकच सुष्ट होतो..."

तात्या खटल्याच्या कामाची सबब सांगून, त्या दिवशीं तालुक्याच्या गांवीं गेले होते.

देवांना हार घातला..तात्या हजर असते तर त्यांनाहि कदाचित् 'गाढ्वाबरोबर नळ्याची यात्रा' म्हणून दुसरा हार पडला असता..तो तसा पडतां, तर सापाचं वेटोळंच गळ्यांत पडल्यासारखं दचकण्याची त्यांच्यावर पाळी येती..जणूं, या साऱ्या पुढील परंपरेच्या भीतीमुळेंच तात्या त्या दिवशीं गांवांत हजर राहिले नव्हते !—

## देव—दानवांची कुस्ती २०

५७

जळत्या आगीनें सुंदर गांवांतले लखपती, त्यांचीं रक्ताळ जाळीं नि... सारीं पापं जळालीं; त्या राखेंत उभी राहिली सतीची पुण्याई; आपलं जीवन

अर्पून तिनें गांवाला जीवन-दिलं;- तिच्या धर्मानें वाडकरांना...साऱ्यांच्या हक्का-मालकीची धर्मशाळा लाभली;..सदबा कर्णाची करणी-म्हणून विहिरींत निर्मल पाणी;.. त्याचा आम्रतरू...आपल्या शाखाविस्तारानें साऱ्या गांवालाच लागला छाया करूं!—

— हें सारं घडल्यालाहि आतां तीन महिने झाले होते—सारा गांव नव्या उत्साहानें, नव्या जीवनानें, नव्या छायेनें ताजातवाना झाला होता!—

ती सतीची सत्कृति नि उदार कर्णाची कमाल करामत मूर्त स्वरूपांत पाहून, एखादा मानेनें नन्ना करणारा जरठ सुद्धां सदबा सरपंचाला कृतज्ञतेनें म्हणे—"आमच्या आयुष्यांची होळी करून लखपतींनी पोळी पिकविली, सदबा!—मिरा सतीनें त्याची...त्या पापाची...होळी करून, तिथल्या अधर्म-भूमीवरच ही धर्मशाळा उभारली!...नि तुझ्या घामाच्या धरणीचा हा आधार...गांवाला आतां अखंड लाभो!- देव साऱ्यांचं भलं करो!-"

सदू त्यावर विनयानें हळूच हसे; नि मग ते दोघे तिथल्या त्या नव्या आनंदसागराकडे समाधानी दृष्टीनें टक लावून पाहात.

भर दुपारीं तर तिथं अतिशय गजबज असे; पांदणीपांदणीतून गांवच्या आयाबाया सतीच्या विहिरीकडे आपापसांत बोलत-हसत जात-येत; रहाटांचे गडगड आवाज;..धुण्यांच्या फारांची ठेक्यांत चाललेली सरबत्ती;..त्या विहिरीवर निर्माण झालेला तो नवा जीवनसागर क्षणभर थबकून पहायला मौजच वाटे...

—सदू तर त्या दृष्यांत आनंदानें अगदीं तल्लीनच होऊन जाई.

## ५८

पण असल्या गोंधळांत, वामकुक्षीच्या वेळीं, तात्यांचा डोळ्याला डोळा लागणार कसा?...साऱ्यांच्या जाण्यायेण्याचा तो रास्ता;...तात्यांच्या तर तो घरावरूनच जात होता. त्या गजबज-गडबडीपेक्षां तात्यांच्या मनांतल्या निखाऱ्यांनींच ते दचकून उठत!-क्षणाक्षणाला आपलं नाक ठेंचल्याचा भास तात्यांना त्यावेळीं तर सारखा सारखा होई.



"या साऱ्याच अनर्थाला कारण...तो हरामखोर...सद्या!" पिकदाणींत पिचकारी मारीत तात्या आजहि चरफडत म्हणाले.

त्यांच्या सिंहासनासमोर त्यांचा पिरत्या पटकूर टाकून बसला होता. तात्यांचं सारं धोरण चटकन् हेरून तो म्हणाला—"दुसरं काय, धनी?- आपन झाला आपल्या संसारातून कायमचा मोकळा!-न् त्या फकीराचा तुमच्या सारक्या गिरस्तांना हा तरास!...पन् मी म्हनतों...परवां परवांपर्यंत या घरचा लाचार गुलाम व्हता तो!...हवा कशाला हा टेंभा त्याचा?...झाला केव्हां एवढा मोटा?—उदार कर्नऽ नाय का तो?..."

..."आणि तो देव?...तो मोठा धर्म!!..." पिरत्याचा धोरणी सुरुंग तात्यांच्या त्या तुटक शद्वांतून भडकून उठला. नव्या पानाच्या शिरा काढीत, तोंडांतला चघळलेला चोथा फेंकण्यासाठीं उठत तात्या ओरडले... "मी विसरलेलों नाहीं, पिरत्या,...ती त्या देवाची शिताफी!...कर्ण...हः...कर्ण!—बरोबर मोका येऊं दे...मग घेतों काढून कर्णाची कवच--कुडलंच!!"

"पन् इतका अपमान तुमास्नी सहन तरी कसा व्हतो,.. राम जानं!" पिरत्यानें त्यांना हळूच खिजवलं..."अन् आतां तू सद्याची येसन बी गेली!- समदं करज फेडून बी मोकळा झाला तो!-आतां पाखरूं कायमचं जाळ्यातनं उडालं, धनी!..."

"चूप!-" तात्या संतापले; त्यांना क्षणभर तंबाखूचा ठसका लागून उबळ आली;... पुन्हां स्थिर होऊन ते पुढें म्हणाले—"पाखरूं उडालं म्हणे!—अरे, अजूनहि या ना त्याप्रकारें, चक्रवाढ व्याज करणार मी वसूल;...पाहाच आतां तूं!—"

"म्हनतां खरं!- पऽन्.... पन् तें जमनार कसं?" तरी पिरत्यानें तात्यांच्या संतापल्या दुखावल्या मनाची पाठ सोडली नाहीं. तात्यांचं खरं पित्त उसळल्याशिवाय यापुढें रंग चढणार नाहीं, कांहीं होणार नाहीं, हें तो अनुभवानें पक्कं जाणत होता. "पन् मोटा काफर,.. सद्या!... चोवीस तासांत पैसऽतयार!- हातातन् उडाला पक्षी, धनी!- आन् आतां तू त्याला देवाच्या कारवाइनं ध्येवपन आलंय्!-"

"देवपण ?...अरे सोड...हां हां म्हणतां उतरवतों बघ तें!" तात्या पुन्हा ज्वालामुखीसारखे कडकडले—"माझ्या पिढिजाद गजांत लक्ष्मीला जें नाहीं जमलं...तें भूमीदान त्या भिकारड्या कर्जबाजाऱ्याला जमतं?—अरे, नुसता दगड तो!—दगडाचे देव माणसं बनवतात!— नि देवाचे दगडहि माणसंच बनवतात!—आतां बघ माझी कारवाई;— म्हारांचांभारांचा देवपणा मिळवलेल्या या दगडाची, कशी खेटरानें मी पूजा करतों ती!—असल्या देवा-बरोबर आपण दानव!— होईल कुस्ती!!—होऊंच दें एकदां!"

५९

गंमतच असते जगाची!— तात्या विडा उचलीत होते— 'कारवाई करण्याचा';...कोणती कारवाई ?— सदूला देवाचा दगड बनविण्याची!— कां?— तर त्यानें तात्या देत नव्हते तें भूमिदान, स्वतःच्या पोटाला चिमटा काढून, गांवाला वेळींच केलं!— सतीचे सारे बेत पार पाडून गांवची पुरी खराखुरी सोय केली!— म्हणून..!!—

कां वाटावं तात्यांना सदूबद्दल एवढं कठोर वितुष्ट?...कोणतं घोडं मारलं होतं त्यानें तात्यांचं?—किती चव्वल खाल्ले होते त्यानें तात्यांचे??—उलट, तात्यांनींच मुद्दलाच्या सव्वापट व्याज सदूकडून पुरं वसूल केलं होतं!— नि अखेर उरलं सुरलं व्याज-मुद्दल, ऋणमुक्त होण्यासाठीं, सदूनें त्यांना चुकतं केलं होतं. त्यांनीं तें खाल्लं होतं!—

पण वैभवाच्या ऊब—छायेनेंच अशी अधिकार—मदनमस्त—पणाची, गांवगुंडगिरीची भाषा स्फुरते, हात फुरफुरतात!...म्हणूनच, पतीनें जाळलेलं, सतीनें आगीच्या भडक्यांतच क्षाळलेलं नि गरीब सदूनें आपल्या छायेनें पाळलेलं, नवं सुंदरगांव तात्यांना क्षणभरहि पाहवत नव्हतं!- आणि... आणि...सैतानाचा शेवटचा आधार म्हणूनच...आंब्याच्या छायेबद्दलची एक भयंकर कल्पना तात्यांच्या डोक्यांत गेले कित्येक दिवस भयानक थैमान घालीत होती!...



— तात्यांच्या अंगांतला देवांनी जागा केलेला तो 'अर्जुन'-बिचाऱ्या सरळमनस्क सदूच्या अंगांतल्या स्वयंस्फूर्त कर्णाला एवढ्याच आधारावर लोळवणार होता!!—

## वांकडा पेंच! २१

६०

कर्ज फिटलं; छातीवरचं ओझं उतरलं;...म्हणून तेव्हांपासून सदूला हल्लीं शांत झोंप लागे. 'आपल्या या साऱ्या सुखाला कारण—माई!' हा विचार मात्र झोंपेत सुद्धां सदूला जागा करी. त्याच्या आयुष्यांतून तात्यांचं पुढलं रणांगण गेलं; पण म्हणूनच दिवसांतले चार दोन तास तो हल्लीं माईंच्या वृंदावन-देवांगणांत शांतपणें नि सानंद घालवी. म्हणूनच...माई नको नको म्हणत असतां त्याची लाकडं फोड, मागील घर-स्वयंपाकघराची झाटलोट कर; धान्य-गोट्याची व्यवस्था कर;...असं त्याचं-मर्जीचं माईंकडे कांहीं ना कांहीं सारखं चाललंच असे!— माईंचं सोवळं-ओवळं फार होतं म्हणून;...नाहीतर चुलीजवळहि त्यांना मदत करायला त्या दोघांनी कमी केलं नसतं!—

आपलं पोट मारूनहि, दरमहा पुनवेच्या पुनवेला तात्यांच व्याज-कर्ज नेमानें फेडणारा सदू!-माईंच तें गुप्त-दान परतायची त्याला जाणीव नव्हती, असं थोडंच आहे?— पण तें तडकाफडकीं फेडून त्यांचा अपमान त्याला करवत नसे; त्या लक्ष्मीदेवीच्या अमृततुल्य ऋणांत जन्मभर राहावयचंच

त्यानें शेवटीं ठरवलं होत. तिची होईल ती चाकरी करणं हेंच त्याला आजहि मोठ भूषण वाटे.

सदू म्हणजे हल्लीं फारच कामाचा !– सतीचा नेमलेला सरपंच; विहिर –धर्मशाळेच्या खोदकाम–बांधकामाचा मुखत्यार व्यवस्थापक;... तेव्हां एकट्या जिवाला दिवसभर तें काम पुरे, त्यांत तो रंगूनहि जाई. त्यांतच, माईच्या राज्यांतली सुखद कर्तव्यांची लहानमोठी कामगिरी !... नि मग उरलासुरला वेळ आपल्या एकुलता एक वाढत्या मंजीबरोबर सुखदुःखाच्या साध्यासुध्या पोरकट गप्पागोष्टी करण्यांत अगदीं उठाउठीं निघून जाई.

त्यामुळेंच उलट एक प्रकारें आपण अगदीं स्वर्गांत असल्यासारखंच सदूला वाटे. अशा उमद्या मनःस्थितींत स्वर्गालागूनच्या नरकांतल्या घडामोडींची त्याला बिंचाऱ्याला कशी कल्पना असणार ??...

## ६१

नुकताच घरीं परतून, हातपाय धुवून, मंजीनें त्याच्यापुढं ठेवलेल्या ताटांसमोर तो आज बसला होता; तिच्याबरोबर हंसतबोलत जेवूं लागला होता...

तोंच दारांत हांक आली—" सदबाऽ!...हाइत् का सदबा घरांत ?–"

तात्यांच्या पिरत्याचा परिचित आवाज तो !...सदूचा चेहरा खर्कन् पालटला. मंजी दाराशीं जाण्यापूर्वींच, दार ढकलून पिरत्या आंत शिरला होता. सदूनें त्याच्याकडे न बोलतांच नुसतं पाहिलं; नि नवा घांस तोंडांत घातला.

पिरत्या हसत म्हणाला—" सांगाया आलों व्हतों...तात्या सावकारांन् दोनपारीं तुमाला बोलावलंय् !—"

" मला ?–कशाला बा ?" तोंडांतला घांस तोंडांतच ठेऊन थबकत सदूनें म्हटलं नि तो पिरत्याकडे पाहूं लागला.

पिरत्या उभा होता; सदू गपचूप जेवत होता–त्याच्या मनांत आलं— " कां बोलावणं पाठवलं आज तात्यांनी ? हा कसला नवा डाव ?– नाय्



तरी सतीच्या आगीनंतर गांवावर तात्या जळताहेतच!–नि सगळ्यांत अधिक त्यांच्या डोळ्यांत खुपणारा मीच !—"

" भाकर खाल्ल्याबरबरच या बर् का, सदबा !– जाव् न् मी ?..." त्या शब्दांनी सदू पुन्हां भानावर आला; तेवढ्यांत पिरत्या दारांत पोंचला होता.

" हां—येतोंच् कीं;...पन् ..." किंचित् घुटमळून सदू म्हणाला— " कशाला बोलवलं ?:..काय येनंपेनं त् नाय् उरलंलं..."

" वा वा ! गांवाचऽ कर्नंऽ तुमी, सदबा !...तुमचं कसलं देनंघेनं असनार् ? " पिरत्या जरा खवचट हसून पुढं म्हणाला—" तात्या शेटलाच काय तुमाकड् कसली अर्जी करायची असल् !..."

त्या बोंचक हेटाळणीनें सदू क्षणकाळ रागावला;...तरी पण मन आंवरून तो कांहीं बोलला नाहीं. पण पिरत्याहि धूर्त; तोहि कांहीं न बोलतांच निघून गेला—

# रणभेरी ! २२

## ६२

डोक्याला फडकं बांधत सदू जेवल्याबरोबर दाराकडे वळलेला पाहून भेदरल्या नजरेनें मंजीनें बापाला विचारलं–" दाऽकशाला रे तुला बोलावलं असल तात्यासावकान् ?"

वहाणा चढवून दारांतून बाहेर पडतां पडतां तो सचितपणें तिला म्हणाला–" कोण जानं !– सत्रा झेंगटं तात्या सावकाराची !–"

पण चालतां चालतां सदूच्या डोक्यांत एकदम विचार आला-" डाव ?-सतीच्या हीरी-धर्मशाळेबद्दलचाच नसल ना हा डाव ?-"

कर्ज फेडलं त्या दिवशीं, तात्या चावत चावत कांहींतरी आपल्या आंब्याच्या झाडाबद्दलच आपल्याकडे बोलले होते;-सदूला तें एकदम आठवलं... नि त्याच्या मनांत एकदम चर्र्र् झालं...

सदू बंगल्याच्या अंगणांत पोहोंचला तेव्हां तात्या वामकुक्षी संपवून नुकतेच आपल्या झुलत्या सिंहासनावर पान खात बसले होते. खालीं पहात पहिल्या बोटानें टवटवीत पानांच्या जोडीला चुना फासत होते.

कांहीं न बोलतांच, सदू त्यांच्याजवळ जाऊन उभा राहिला.

तात्या पानाची घडी तोंडांत सारून, अडकित्त्यांत सुपारीचा दोडा धरून तो कांतरूं लागले.

## ६३

क्षणभर वाट पाहून सदू एकदां मोठ्यानें खांकरला.

अगदीं साश्चर्य चमकल्यासारखं करून त्याच्याकडे वळून पाहात तात्या म्हणाले-"सदू ?—अरे तूं रे केव्हां आलास !-मी पाहिलंच नाहीं !-उभा रे कां ?-बस ना ! सतीचा सरपंच तूं..."

"लाजवूं नका, धनी !-" खालीं बसतां बसतां सदू म्हणाला—"पन् मुद्दाम कां बोलवलं मला आज, सावकार ?"

"मुद्दाम नव्हे रे;...सहजच !-" बेरक्या डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहून हसत हसत तात्या पुढं म्हणाले-"अरे ऽ तुझ्या त्या नव्या नव्या सत्रा कामांमधें असतो कुठं बरं हल्लीं तुला वेळ,...माझ्याकडे यायला ?—तेव्हां म्हटलं भेट घ्यावी तुझी...नि मागलं आपलं एक लहानसं काम राह्यलंय्...तें एकदां बोलून, स्पष्ट करून, संपवून टाकावं !—"

सदूनें मनाशीं लागलींच कसलं तें धोरण बांधलं; पण तात्यांच्या तोंडूनच तें वदवून घ्यायचं ठरवून तो म्हणाला—"मागलं ?-कसलं बोलनं, सावकार ?"



"तोऽ रेऽ—विहिरीवरचा आंबाऽ!... नव्हतों कां म्हणालों मी मागं?-कींऽ...माझा आहे तोऽ!" तात्या तुटक शद्बांत हळूच म्हणाले. असत्य, अप्रिय, अघोर गोष्टी नेहमीं तुटकच बोलाव्या लागतात, हें अनुभवी तत्व तात्या चांगलंच जाणत होते.

"हं हं... त्या आंब्याचं काय म्हणतां, धनी ?" सदू चांचरला.

"आंबा माझा...आजपर्यंत चुकून राहात आला तुझ्या हद्दींत !-आतां तर तूं ती जागाहि गांवाला बहाल करून टाकलीस !-" तात्या हळूहळू आवाज चढवीत शेवटीं रागानें म्हणाले-"तूं आहेस मोठा कर्ण, बाबा !- पण मला गरिबाला आपलं माझं झाड हवंय् !- काय करतोस त्याचं ?"

"मग होवू द्या ना आपल्या मनासारकं !...च्या कीं तुमी तें झाड तुमचं असल तर !-मी कुठं उरावर घेऊन जानार हाय तें ?. माजं नाय तात्या सावकाराचं आंबाईचं झाड !- मंग तु झालं ?-"

पण सदूच्या तसल्या शांत उत्तरावरहि तात्या जरा कुर्ऱ्यांतच म्हणाले-"हें बाकीं बरं बोललास !- ठीक तर !- झाड माझं...मी घेणार !- आतां घरांत चार दोन महिन्यांच्या सर्पणाची तरी माझी चांगली व्यवस्था होईल !-समजलं ?- "

एखादी इंगळी डसावी तशीच सदूची गत झाली; तात्यांच्या त्या अकल्पित नि भयानक कल्पनेनें क्षणभर त्याची दांतखिळी बसल्यासारखंच झालं—

## ६४

दुबळ्यानेंहि प्रतिकारासाठीं दुष्टाविरुद्ध केव्हां ना केव्हां तरी हात उगारणं प्राप्तच असतं !- सबळाचा तर तो जन्मसिद्ध हक्कच असतो.

पण सदूचा मार्ग वेगळा होता...

तेव्हां तसली अप्रिय गोष्ट खोटीच असेल असं ठरवण्याचा वेडा प्रयत्न करणाऱ्या आशाळू माणसासारखं सदू चांचरतच तात्यांना म्हणाला– "म्हंजी, ...सावकार ? ध्यानीं नाहीं आलं नीट माझ्या !"

" अरे, ध्यानीं न येण्यासारखं आहे रे काय त्यांत ?–" तात्या जरा दबकावणीच्या स्वरांत सदूवर ओरडून म्हणाले–" तें माझं झाड...मी चार दोन दिवसांत तोडणार आहे !–खालची जमीन जाऊं दे फार तर कर्णाच्या देणगीबरोबर गांवाच्या ताब्यांत !...त्याला नाहीं पाहिजे तर अटकाव करत, मी !...काय समजलं ?..."

सदूला तों सारंच असह्य झालं; अगदीं गहिंवरून तो तात्यांना मोठ्या अजीजीनें म्हणाला—" नकाऽ धनी, नकाऽ !– माझ्या हद्दींत असलां तरी आंबा तुमचाच;...खुशाल घ्या त्याचीं फळं तुमी !—एक तोर बी फुकट जाव् देनार् नाय् मी!...पन्–बगा...पोराबाळांची सांवली, गायगुरांची छाया;- साऱ्या गांवचा इसावा तो !–आंबाई देवीचा आंबा हाय् तो !—देवाचं ठाण,...सावकार, तें !--त्याला हात नका लावूं...बगाऽ, हात जोडतों मी !–"

"आला का परत तुझा देव?–" तात्या फिरून आवाज चढवीत म्हणाले– "झाड तुमचं–तुम्ही घ्या ! म्हणतोस;...नि फिरून तें तोडूं नका म्हणूनहि म्हणतोस !– काय नुसतं मला बघायला हवंय् होय...तें माझं झाड ?–नि पुन्हा 'झाड घ्या !–' म्हणून म्हणणारा तरी तूं रे कोण ?– ...माझ्याच मालकीचं आहे मुळीं तें !—तूं द्यायला नकोय् तें मला; हवं तेव्हां अस्सं हिसकावून घेणार मी !...तें कांहीं नाही, सदू !—हें बघ, मी उद्यांच तोडणार आहें तें झाड !–बरं कां ?–आणि तेवढं सांगायलाच मी फक्त तुला आज इथं बोलावलं होतं !—समजलं ?—जा आतां तूं..."

प्रेमळ, भाविक सदूच्या डोळ्यापुढें माईची मूर्ती...त्यांचा सौभाग्य-तिलक दिसूं लागला !...तात्यांच्या अंगांत असा एकाएकीं देवचार संचारलेला; पण त्यांच्या त्या पापाची झळ...त्या माई माउलीला;...सदू शेवटीं दुःखाच्या आवेगानें मोठ्यानें उद्गारला—" आंबाई !– आंबाई !–तात्यांची, गांवाची, साऱ्यांची तूंच तारती !!"



## ६५

कोणाच्या का मालकीचा असेना तो आंबा; आज मात्र त्याला सुंदर-गांवांत निराळंच स्वरूप आलं होतं;...–नव्याजुन्या खऱ्याखोट्या कायद्याचा, वहिवाटीचा, नकाशाचा,...नव्हताच तो प्रश्न !—तो प्रश्न आतां होता साऱ्या गांवाच्या भावनांचा !—

आज त्या सुधावृक्षाच्या अमृततुल्य छायेंत, पाणी भरायला येणाऱ्या गांवच्या लेकी–सुना सुखदुःखाच्या गोष्टी बोलत; पावसाळा सोडून बाकी आठ महिने, भरदुपारीं गांवचीं गायवासरं त्याच छायेंत बसून मिचमिच्या डोळ्यांनीं तळपत्या उन्हांकडे पाहात रोंथ रवंथ करीत —"चुकलं वासरूं धामपूरच्या तळ्यांत !.." तसंच...चुकलं वासरूं, चुकलं पोर, चुकली लेक-सून सतीच्या विहिरीजवळ,...सदबाच्या आंबाईच्या छायेखालीं सांपडायची !—

आणि असा तो छायाळ आम्रतरु खोत्या दमदाटीनें आपला म्हणून तर तात्या आधीं म्हणतच होते; पण आतां तर तो उन्मळून खालीं पाडणार, त्याचंच घरचं सर्पण करणार, अशी सदबापुढें, ते अरेराव घोषणा करीत होते !...

## ६६

आणि मग त्या कल्पनेनें देखील सदू कसा बरं बेचैन..नि घायाळ होणार नाहीं ?–त्याला खरोखरच घेरी आल्यासारखं झालं;...तीं पुढलीं सारीं चित्रं प्रयासानें पुन्हां पुसटून टाकत, तो तात्यांना अधिकच गयावया करून म्हणाला—" नका नका, धनीऽ!—असल्या बुऱ्या कामाला नड येईल !—"

" चूप, बरं कांऽ सद्याऽ !—" तात्या ओरडून झोंपाळ्यावरचे तटकन् उठत म्हणाले—" हा धर्माधर्मांचा नि भल्याबुऱ्याचा शहाणपणा तूं नको आहेस मला शिकवायला !– तूं गांवचा कर्ण असशील;...धर्म नव्हेस!...मला तुला जें सांगायचं होतं तुला, तें मी सांगितलं;...जा आतां तूं !—"

केवळ अगतिक होऊन, खालच्या मानेनें नि दुःखी अंतःकरणानेंच सदू शेवटीं निघून गेला.

## देवळांत दानव ! २३

### ६७

दिवसभर, सदू बेचैनीनें त्या आंब्याभोंवतीं घुटमळला; नि शेवटीं संध्याकाळीं वेशीजवळच्या देवळांत गेला.

तिथं जमलेल्या गांवकऱ्यांना सदूनें सांगण्यापूर्वीच सारं समजलं होतं; ती दुष्ट बातमी फैलावण्याचं आपलं काम पिरत्यानें आधींच केलं होतं.

"तात्यांचा सदूवर पूर्वीपासून डूक !..." "-पण यांतून त्यांना मिळणार काय ?"— पुजारी व जमलेली मंडळी आपापसांत हळू हळू बोलत होती.

" पन् माज्या निमितान् गांवाचा कां नाश ?-" सदू पुढं होऊन कळवळ्यानें म्हणाला— "गांवाचा गारवा, मेळाव्याचा चव्हाटा;...तो छाटून कोनाचं बरं व्हईल !- मी वाईट त् माजं डोकं छाटा, हवं त्-"

त्याच्या त्या उद्गारांमुळें गहिंवरून सर्वजण सदूकडे प्रेमानें पाहात होते.

" होईल तें होवो, सदबा !- आम्ही तुमच्या पाठींशीं आहों सारे !- तात्यांना चांगली बुद्धि देईल देव... तर पाह्यचं ! नाहीं तर..."

### ६८

सैतानाची आठवण केली कीं, सैतान समोर येऊन उभा रहातो



म्हणतात. कर्मधर्मसंयोग म्हणा किंवा तात्यांची स्वतःचीच करणी म्हणा— त्याच वेळीं तात्या कांठी खांकेत मारून देवदर्शनाला आले.

पण दर्शन घेऊन तात्या परत फिरले. अगदीं कांहीं न बोलतांच फिरले-

जमलेले वाडकर पटकन् पुढें होऊन त्यांना म्हणाले-" तात्या सावकार, —नका हो तोडूं सदबाचा आंबा !- "

" सदबाचा आंबा ?— " तात्या एकदम रागांत गरजले-" कोण ?... देवासमक्ष गांवच्या देवाचे पुजारीच का बोलताहेत हें ?"

" नाय् नाय्-चुकले ते...झाड तुमचंड, धनीड !" सदू पड खाऊन म्हणाला-" पन तें आपन तोडूं नका अशेंच सांगने समद्यांचं..."

सूड भरलेल्या तात्यांच्या डोळ्यांपुढं, देवांची सभा, कर्णाची देणगी, त्याचा जयजयकार,...सारीं सारीं...चित्रं धांवत आलीं. त्यांनी तात्यांच्या हृदयाला केलेली ती अखंड वाहणारी जखम !... असल्या येड्या विनवण्यांनी एकदम भरून थोडीच येणार ?—

तात्या देवाच्या दारीं उभे होते; पण देवाच्या दारीं म्हणून काय झालं ? ...तात्यांना देवपण कसं येणार ?—केवळ दगडाचा देव नि दानवाचा मानव होणार तरी कसा एकदम ??—

### ६९

गांवकऱ्यांचा अजून भोंवतीं गराडा पाहून तात्या कायदेबाज भाषेंत बेफिकीरीनें म्हणाले—" हें पहा, तें झाड आहे माझं !...नि मी मला हवं तेव्हां तें तोडणार आहें !—तुम्ही कोण मला नको म्हणून सांगणारे ?..."

" आम्ही कोण ?—काय, तात्या ?? म्हणतां काय ?"

" आम्ही तुमचे वाडकर...गांवकर !—"

" आणि शेवटपर्यंत हेंच सांगणार आम्ही तुम्हाला...तात्या..."

" पण आतां प्रत्यक्ष देव आला तरी मी हा माझा बेत बदलणार नाही !-अगदीं उद्यांच सकाळीं तोडणार !- समजलं ?- " एवढं बोलून तात्या तडक जायला वळले.

सर्वच गांवकर, पण विशेषतः तरुण मंडळी त्यामुळें ज्यास्तच चिडली–

" बरं बरं !—कोण कुऱ्हाड हातांत घेतं तें तर पाहूं !– "

" शंभर रुपये दिलेत तरी असलं काम आम्ही कोणी करणार नाहीं!–"

एक दोन मजूर रागानें म्हणत होते. जागच्या जागीं चुळबुळत होते.

" अस्सं ऽ ?– ठीक !– पण काळजी नको बरं,...तुम्हाला कोणाला त्याची ! " तात्या साऱ्यांकडे तुच्छतेनें पाहून हसत म्हणाले–" आमचा पिरत्या आहे तोंपर्यंत मला नाही त्याची काळजी ! "

तात्या पुन्हां एकदां आव्हानादाखल हसले. नि त्यांना पाठमोरे होऊन चालूं लागले...

जाणाऱ्या तात्याकडे निमूटपणें पाहात, सदू, पुजारी यांच्यासकट साऱ्या जमलेल्या मंडळींनीं निराश मनानें देवाच्या दारीं बसकण घेतली.

# मानवांतला सैतान! २४

## ७०

रात्रीं मुद्दाम जाऊन माईंच्या मध्यस्थीनें रदबदली करण्याचा सदूनें प्रयत्न करून पाहिला—

माई कांहींसं अडखळत म्हणाल्या; पण तात्या त्यांच्यावर ओरडून म्हणाले– "गप्प !...तुझी अक्कल जातेय् चुलींत ! तेवढंच पुरे !... माझ्या व्यवहारांतलं तूं कांहीं सांगूं नकोस नि मी ऐकणारहि नाहीं या बाबतींत, तुझं कांहीं–"



...माईंचा खिन्न चेहरा पाहून सदूला वाईट वाटलं; आंबाई देवीची नजर फिरली तर तात्यांचा नाश !... नि मग माईंचंहि दुःख–संकट !... सुक्याबरोबर ओलंहि जळायचं !– या देवभोळ्या भाबड्या विचारानें, आधींच उदास झालेलं सदूचं हृदय पार पिळवटून आलं !—

फक्त रात्र तेवढीच अंगावर होती. तरी तेवढ्यांत कोणी 'देव–मामले-दारांना कळवून त्यांची मध्यस्ती करवावी'— असं सुचवलं; पण त्या गोष्टीला सदूनेंच विरोध केला. त्यानें सर्वांना आठवण करून दिली–देव परवांच म्हणाले होते–"तुमचीं भांडणं आतां यापुढं तुमचीं तुम्हींच सोडवा !–"

तेव्हां शेवटीं, पुजारी, गांवची तरुण मंडळी, सर्वांनीं मिळून एक बेत केला; नि भल्या पहांटेपासून ते सगळे विहिरीवर एकत्र जमून राहिले.

अर्थात त्या गोष्टीची कुणकुण पहाटेचं पाणी भरायला आलेल्या आया-बहिणींकरवीं गांवभर गेली; नि सूर्योदयापूर्वीच सारा गांव सतीच्या धर्मशाळे-पाशीं सदबाच्या आंब्याखालीं धडधडत्या छातीनें जमा झाला.

## ७१

पिरत्याकडून जेव्हां तात्यांना हें समजलं तेव्हां ते मोठमोठ्यानें हंसूं लागले. आपल्याला उलट, साऱ्या गांवासमक्ष सदूचं नाक ठेंचण्याचं समाधान आयतंच मिळणार—याचाच आनंद होता तो !–

शेवटीं, तात्या निघाले ! खून करायला निघाले;– एका निरुपद्रवी झाडाचा, सदबाचा, साऱ्यांच्याच भावनांचा खून होता तो !

तात्या, त्यांच्याबरोबर पिरत्या; नि पिरत्याच्या हातीं...चांगली धार काढलेली तळपती कुऱ्हाड !–तें लटांबर आंबाईवर चाल करून चाललं होतं-

तात्या सर्वांकडे वर मान करून पहात येत होते. पिरत्या त्यांच्या पावलावर पाऊल टाकत त्यांच्याच जोरावर हसत दांत दाखवित चालला होता.

जसजसे ते जवळ पोहोचत गेले, तसतसं तात्यांना एकदां वाटलं... 'जमलेली मंडळी आपल्याला अटकाव करणार;... आड येणार ! हरकत

कसली ?...आपल्या त्या क्षणींच्या पराक्रमाची तसली ती रंगतच एक... मला ती हवीच आहे—'.

पण तात्या जवळ येतांच, सगळे उलट जरा बाजूस सरकून, दुतर्फा झाले; त्यांनी सावकारांना आपल्यामधून आंब्याच्या झाडापर्यंत जायला वाट काढून दिली—

तात्या चमकले; क्षणभरच त्यांना वाटलं— 'कांहीं कारस्थान नसेल ना या मागें ?'— पण छे !...कोणाच्याच हातांत धोकादायक असं काहीं नव्हतं ! पुन्हां, अगदीं कोणी जागचं हललं नाहीं,...कीं, कोणी कांहीं बोललंहि नाही—

ती अनपेक्षित स्मशान-शांतता मात्र तात्यांना फारच भयानक,... भयंकर वाटली—

कां बरं ? त्या जमावाच्या तसल्या शांततेंत भीती ती कसली ?

## ७२

...ती भीती त्या जमावांत नव्हती !–त्या शांततेंत नव्हती !-पण मग, जगा–मनाविरूद्ध–जनतेविरुद्ध जाणून बुजून करायचं दुष्ट कृत्य करतांना आपलंच मन आपल्याला खातं !–जग असतं तसंच असतं,...तिथंच असतं;...पण तें आपल्याला मात्र, क्षणभर, निराळंच...भयंकरच भासतं !!

—तात्यांचं तसंच झालं !—

तात्यांना हवा होता प्रतिकार...गजबज–पण तिथं भोंवतीं होती सारी दुःखी स्मशान–शांतता !— सत्वशील शांततेंत दुष्ट मनांतला गुप्त राक्षस स्वतःच विराट स्वरूप धारण करून धिंगाणा घालूं लागतो; नि त्या मनाला आपणच भेडसावत राहतो !—

तेव्हां,... तात्यांच्या त्या वेळच्या विचलित मनाला तें सारं सहन कसं व्हावं ?– आणखी.. 'आतां कार्याला पुढं सुरवात तरी कशी करायची?'— हें तरी त्यांना त्याक्षणीं सुचावं कसं ??.



पण मग तात्यांच्या त्या मनाच्या भयंकर पेंचप्रसंगातून त्यांची एकदम सोडवणूक झाली ! पुजारी नि कांहीं वयोवृद्ध मंडळी चटकन् उठून तात्यांच्या पुढें झाली–नि विनम्रपणें हात जोडून त्यांना म्हणाली– " अजून विचार करा, तात्या सावकार !– झाड आपलं—वाडहि आपलीच !!. नाहक घाव नका घालूं वाडीच्या सांवलीवर !– असूं द्या ना उभं हें झाड !!–"

## ७३

क्रिया—प्रतिक्रिया...प्रतिक्रिया–क्रिया–असं त्रांगडं असतं जगातलं !– दरींतल्या प्रतिध्वनींनी भांबावलेला तो गुराखी मुलगा... अधिकाधिक ओरडूं लागला, शिव्या देऊं लागला;...पण कंटाळून नाईलाजानें तो शांत झाला, तेव्हां सारं शांत झालं;...त्यानें शेवटीं 'शाबास' म्हटलं. तेव्हां त्यालाहि शाबासकी मिळाली...तो शेवटीं गोड बोलूं लागला...त्याला गोड गोडच ऐकूं आलं... तेव्हां त्याला अखेर पटलं,... जग आपल्याइतकंच चांगलं नि आपल्याइतकंच वाईट असतं !—

चांगल्याला चांगलं, वाईटाला वाईट ही क्रिया–प्रतिक्रिया !– नि तिची असली चढती कमानहि मनाला पटते; तें व्यवहाराला जुळतं; माणसाला पेलतं. वाईटाला चांगलं ही प्रतिक्रिया,.. तें दिव्य देववण! तेंहीं मनावर ठसतं!- पण 'चांगल्याला वाईटच' ही क्रिया—प्रतिक्रिया ?...तिचीच चढती कमान ??– काय म्हणावं त्या परिस्थितीला ?... काय करावं त्याला ??– पण मग असंहि यात्र जगांत आढळतं, एवढं मात्र खरं !—

आज तात्यांसमोर सारे गांवकर वाईटाला चांगलं अशी दैवी प्रतिक्रिया करीत होते. पण आज तात्या चांगल्याला वाईट अशीच प्रतिक्रिया करून, तिची चढती कमान वाढवायचा, सूडबुद्धीनें विडाच उचलून आले होते.

## ७४

म्हणूनच ते खसकन् सर्वांवर ओरडून तावातावानें म्हणाले–" बस्स्

झालं तुमचं तत्वज्ञान;–व्हा आधीं बाजूला सारीं !– तुमची 'आंबाई' पडली तर फांद्या अंगावर येऊन पडतील तुमच्या !—"

तरी देखील कांहीं पोक्त मंडळी आर्जवानें म्हणाली—" एवढ्याशा बाठ्यांतल्या कोयीनें तप तप तपश्चर्या करून एवढा मोठा विस्तार केला तात्या !– पण तोडायला मात्र तास दोन तासहि पुरतील !— जरा विचार करा, पाटील ! तुम्ही या गांवचे राजे !– असं नका करूं !!–"

पण तात्या वज्रासारखे कठीण झाले होते. ते उलट त्यांनांच दरडावून ओरडले—"व्हा म्हणतों ना सारीं बाजूला !...माझं झाड,...मी तोडणार !... अगदीं सर्वांसमक्ष तोडणार !... माझ्या कायदेशीर हक्कावर गदा घालायला, माझ्या कामांत मला व्यत्यय आणायला देणार नाहीं मी !– व्हा बाजूला..."

आणि मग, विजयोन्मादाच्या पिसाटपणानें थरथरत, हुकमी शद्बांत तात्या म्हणाले–"हं..पिरत्या,..तूं चल ये पुढं !..यांचं हें लळीत कधींत संपायचं नाहीं !... आपल्या कामाला लागूं या आपण–"

साहजिकच, पुढें झालेलीं मंडळी हतबलपणें बाजूस जाऊन बसलीं.

## माणसकीच्या यातना ! २५

### ७५

तोंच माई स्वतः घाईघाईनें पुढें झाल्या—

तें पाहून...तात्या प्रथम चमकले;...पण पुन्हां अवसान आणून ते माईकडे रागानें रोंखून पाहूं लागले...



माईनीं आपल्या घरची दुफळी यापूर्वी अशी वेशीवर कधींच टांगली नव्हती;...पण आज तरी त्यांचा अगदीं नाइलाजच होता, त्याक्षणीं, आपल्या पतीला अखेरची विनन्ति केल्यावांचून त्यांच्यानें रहावेच ना !—

माई पुढं होऊन शांतपणेंच म्हणाल्या–" असं काय ?—ऐकावं ना या साऱ्यांचं !—साऱ्या वाडकरांचं सुख, ही आंब्याची छाया...राहूं द्या न त्यांची त्यांना !—ऐकावं माझं..."

तात्यांचं पित्त एकदम खळवलं; रुद्रावतार धारण करून ते माईवर ओरडले–" म्हणे वाडकरांचं सुख !—नि मग तुझं-माझं ?–चल् हो दूर–तुझ्या नादीं लागेन तर भर दुपारीं चौपदरीसह दारोदार हिंडावं लागेल मला!–उलटत्या अंबारींत बसशील तूं !!"

तात्यांची ती अचूक ग्राम-नीतीच होती;... " ज्याला चिरडतां येईल त्याला वेळींच चिरडावं; नाहीं तर तो डोकं वर काढील; डोकं धरील; कधीं नरडीचा घोंट घेईल !– मृत्यूचं दार दाखवील..."

"हा गांवचा कर्ण !.. उद्यां शिरजोर झाला तर मग संपलंच आपलं माहात्म्य !.." ही साधी गोष्ट तात्यांना कळत का नव्हती ? बायको झाली तरी असल्या बाबतींत लाड काय उपयोगी ??

"कायदाच बोलतोय् हें सारं !" ते रागारागानें सदूकडे व सर्वांकडे पाहात म्हणाले– "वृक्ष जसा विस्तारलाय्... तसाच खालीं येईल !– होईल कदाचित् विहिरीची त्यांत माती !– पण देवाच्या बापालाहि आतां माझ्या निश्चयांत रदबदली करतां येणार नाहीं !!"

नाइलाजानें माई बिचाऱ्या बाजूस सरल्या– आणि चौफेर पुन्हां अगदीं सामसूम झालं !...

### ७६

सूडाच्या परजत्या कुऱ्हाडीचं तात्यांच्या हृदयांत थैमान, तर साऱ्या गांवाच्या छायेवर घाव घालायला वखवखलेली चकाकती तळपती कुऱ्हाड त्यांच्या पिरत्याच्या पाठीवर विराजमान––

" पाहातोसे काय टकमकां ?– मार घाव ! " तात्या पिरत्यावर हुकमी आवाजांत कडाडले.

ते त्यांचे शब्द सर्वांचीं हृदयं कांपत गेले; मरणारा नाहीं का तंगड्या झाडत ?..तसंच,..सगळे बाजूस सरले,...तरी सरतां सरतां अजीजीनें म्हणाले– " तात्याऽ !– नका..."

पण तरी तात्यांनीं पुन्हा पिरत्याला खूण केली–" घाल घाव !! "

सारी चिपचाप; अगदीं सामसूम;..मध्येंच एखाद्या म्हाताऱ्याकोताऱ्याच्या खोंकण्याचाच तेवढा आवाज...

पिरत्या पुढें झाला; पण हजारों निःश्वास त्याच्या कानावर पडल्याचा त्याला भास झाला,..तो गोंधळला;...त्याला गरगरून आलं...

तेवढ्यांत, शांततेंतून एक आवाज आला— " लक्षांत ठेव, पिरत्या ! तूंहि एक वाडकरच आहेस!... साऱ्या गांवाच्या इच्छेविरुद्ध तूं या छायेवर घाव घालतोयस्!–देव भलं नाही करणार तुझं !... "

ते पुजाऱ्याचेच शब्द; पिरत्या कां कोण जाणे...दचकला ! जागच्या जागीं लटलट कापूं लागला. त्या विशाल वृक्षाकडे, साऱ्या वाडकरांकडे पाहात पहात, त्यानें हातांतली कुऱ्हाड जमिनीवर फेंकली; बसकण घेऊन तो घाबऱ्या आवाजांत म्हणाला– " नाहीं, धनीऽ! इतक्या जिवांचं नाहक हपाप माझ्यान् नाय् घेववनार !! माझ्या बाची बी छाती नाय् व्हनार–"



७७

पिरत्याच्या त्या शब्दांनीं नि अवसानघातानें तात्यांच्या अंगाचा मात्र भडकाच उडाला !–

कारण...साऱ्या गोष्टी मनासारख्या व्हायची नेहमीं सवंय असलेल्या त्यांच्या उद्धट मनाला आपला आधारच कोसळल्यासारखं वाटलं; पांच मिनिटांपूर्वींची गांवकऱ्यांसमोरची त्यांची ती वल्गना !...तात्यांच्या मनांतल्या सूडाच्या वृक्षावरच जणूं पिरत्यानें अंधारांत तसा घाव घातला होता !...आणि त्या त्वेषाच्या ज्वाला त्यांच्या तोंडातून बाहेर पडल्या— " निमकहराम !– बदमाश !!–"

ते तिरंमिरीनें स्वतः पुढें झाले नि ती जमिनीवर पडलेली कुऱ्हाड त्यांनीं उचलून घेत म्हटलं–"मी तरी मेलेलों नाहीं ना अजून ?–"

पुन्हां चौफेर सळसळ; पुन्हां लांबलांब सुस्कारे :— आयाबाया, तरुणवृद्ध, पोरंसारं, सारीं तात्यांकडे टवकारून निमूट पाहात होतीं...

तोंच, कुऱ्हाडीसह तात्या पिसाटासारखे पुढें धांवले..

" नका नका, तात्या ! " चारी बाजूंनीं हतबल चीत्कार आले.

" नका :काय ?– " तात्या अधिकच थरथरत म्हणाले —" आता पाहाच प्रत्यक्ष...तुम्हां साऱ्यांना मी एकटा पुरून उरतों किं नाहीं तें !–"

७८

आणि त्या तिरमिरींतच, त्यांनीं त्या गांवकऱ्यांच्या विशाल आम्रवृक्षाच्या बुंध्यावर एक जोराचा वार केला—

" आयायीऽ !– कसाब !! " एक दोन बायांचे अस्पष्ट चीत्कार ऐकूं आले. कांहीं पोरं रडूं लागलीं; तरुण पोरींनीं पदरानें आपले डोळे पुसले..

सदूच्या हृदयांत दुप्पट खोल जखम झाली!...

पिरत्याहि चटकन् पाठ करून उभा राहिला.

त्या कठोर कुऱ्हाडीनें तर आपलं तोंडच त्या आंबाईच्या पदरांत..त्या झाडाच्या बुंध्यांत लपवून धरलं; जणूं पुन्हां घाव करायला ती नाराजच होती.

विहिरीवर...विहिरीभोंवतीं... सारं गांव उभं होतं;...तरी पण त्या गांवांत,...त्या रामप्रहरीं अगदीं शांतता...स्मशान-शांतता नांदत होती.

साऱ्यांच्या शिव्याशापांनीं, हां हां म्हणतां त्या झाडाच्या, तात्यांनीं खांडोळ्या खांडोळ्या केल्या असत्या- पण...पण- 'इतकी मंडळी जमून आपल्याकडे टवकारून पाहात आहेत' हें नि ती भोंवतालची शांतता!..तात्यांना ती सहनच होत नव्हती...

तरी मोठ्या धीरानें तात्यांनीं आंब्याच्या बुंध्यांतून कुऱ्हाड बाहेर काढली; त्या जखमेंतून 'रक्त-स्राव' होऊं लागला--पण तरी देखील त्यांनीं पुन्हां कुऱ्हाड उगारलीच...

७९

आणि ते आतां दुसरा घाव करणार, तोंच सदू पुढें झाला नि ओरडला- "धनी, धनीऽ!- माझ्याच डोक्यांत कां नाहीं घालत ती ??"

तेवढ्यांत, पदर सांवरीत दुसऱ्या बाजूनें माईहि पुढें झाल्या; एका हातानें तात्यांच्या खांद्याला नि दुसऱ्या हातानें त्यांच्या हातच्या कुऱ्हाडीला धरून त्या म्हणाल्या-"हें वेड तरी कसलं?...ऐकावं, ऐकावं ना साऱ्यांचं!-"

अंगांत त्याक्षणीं आलेल्या चेवाच्या झटक्यांत तात्यांनीं दोघांना दोन बाजूला झटकलं नि ते वेड्यासारखेच ओरडले-" चला..व्हा चालते!- व्हा दूर...निघा म्हणतों ना- "

-आणि हातांतल्या उगारलेल्या कुऱ्हाडीसह ते पुन्हां झाडाकडे धांवले.

तोंच माई ओरडल्या—" हं...खबरदार!- हात आटपा!- तुम्हांला नसेल गांवकऱ्यांची किंमत;...पण मला आहे!- नवसासायासानें माझ्या



पोटांत याक्षणीं फिरत असलेल्या आपल्या बाळाची भी माता आहें!- मी सांगतें तें ऐकावं!-त्याला पुढं याच गांवाच्या आश्रयाला राहायचंय!...तुमच्या असल्या वेड्या सूडानें त्याच्या मार्गांत कां कांटे सांडतां? फिरा मागं!..फिरा म्हणतें ना?... "

" का—काऽऽय?" आश्चर्यचकित तात्यांच्या तोंडून अस्पष्ट उद्गार बाहेर पडले; नि त्यापुढं त्यांची दांतखिळीच बसली!...

८०

शेंकडों निरुपद्रवी बाडकरांच्या त्या स्तब्ध मेळाव्याची ती प्रखर इच्छा!...आपल्या धर्मपत्नीच्या तोंडून एकदम ऐकूं आलेली ती नवखी गोड गोष्ट!...त्यांनीं गोंधळलेली तात्यांसारख्या गृहस्थाची जागी झालेली माणुसकी नि तोंपर्यंतची त्यांची राक्षसी, महत्त्वाकांक्षी..सूडबुद्धि,...यांच्यात क्षणकाळ एकच एक प्रचंड कुस्ती झाली!...

आणि त्याचा शेवट असा झाला, कीं त्यांनीं फिरून घाव घालायला उचललेली ती चमकती तीक्ष्ण कुऱ्हाड, त्यांच्या हातून बोकडी तिकडी उडून...बाजूला पडली;...बुंधा आणखी थोडासा खरचटला, एवढंच...

—पण तात्यांचा स्वतःचा मात्र तोल एकदम गेला; नि त्या वृक्षा-ऐवजीं एखाद्या वृक्षासारखे ते स्वतःच धरणीवर कोसळून पडले!—

## शत्रूची मैत्री ! २७

८१

चार दोन क्षणांनंतरहि तात्या उठेनात; पडले होते तिथंच हालचाल न करतां निपचिप पडलेले...

तें पाहून, माईनीं हंबरडा फोडला; सदू पुढें धांवून गेला;.. पुजाऱ्यानें विहिरीची घागर तात्यांच्या अंगावर ओतली;...तोंडावर फिरफिरून पाणी शिंपडलं..

"आंबाई...आंबाई !...देव दूर नाहीं !. देवाचं झाड; भल्याबुऱ्याची त्यालाच चाड !–" एक म्हातारी तेवढ्यांतच पुटपुटली; पण इतर सारीं भोंवतीं जमून तात्यांना शुद्धीवर आणूं पाहात होतीं.

किती अनपेक्षित घडलं होतं तें सारं...

कर्णाला लोळवायला आलेला हा अर्जुन !– बघतां बघतां, तो स्वतःच धरणीवर कोसळला होता. पण त्यामुळें कर्ण मात्र सुखी झाला नव्हता !... त्याचं नैसर्गिक औदार्य कायमच होतं;.. बेशुद्ध तात्यांना सदूनें पाटकुळीला मारलं; नि ओक्साबोक्सीं रडणाऱ्या माईची समजूत करीत तो तात्यांच्या घराकडे झपझप पावलं टाकत चालूं लागला—

माई रडत रडत देवाचा, श्रीकृष्णाचा, धांवा करीत होत्या. आणि सदूच्या मुखानें कृष्ण त्यांना आश्वासन देत होता—" माई–माईऽ ! काळजी नका करूं !–तुमचं पुन्य मोटं...म्हनूनच तुमाला तुमचं सौभाग्य परत मिळतंय्–आंबाईन् तात्यांना वेळींच आवरलं !– आतां तीच त्यांना जीवदान देईल !!— "

८२

तात्यांना पूर्वीपासूनच नेहमीं पित्ताची व्यथा–कधीं कधीं त्यांना रक्ताचा दाबहि होई; नेहमींचीं वैद्याचीं चाटणं माईनीं तयार करून आणलीं; नि...



माजघरांतल्या पलंगावर अजून निपचितच पडलेल्या तात्यांना, सदूनें तीं आस्थेनें चाटवलीं...

त्यांच्या अंगात सडकून ताप भरला होता; मधून मधून, किंचित् भानावर येऊन, ते असंबद्ध बडबडत– "कोण म्हणतं नाहीं तोडायचं ?– तोडणार !– बस्स् तोडणार ! माझं झाड.. कोणाच्या बापाची मला भीती आहे ?... अंऽ...? तूं..तूं पण...तूं पण नको म्हणते आहेस ?...काय ?... तुझा...आपला बाळ ??– खऽऽ खऽरेंच ??... "

माई–सदू दोघंहि केविलवाणीं होऊन एकमेकांकडे पहात, त्यांना आंवरीत;...नि निःश्वास टाकीत;...भविष्यकाळ भयाण काळोखानेंच भरलेला दिसत होता त्यांना...

शेवटीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं कुठं ताप उतरूं लागला– साऱ्यांनाच हायसं वाटलं; नाहीं म्हटलं तरी, गांवकऱ्यांची–त्या अप्रिय भयानक प्रसंगानें कालवलेल्या बिथरलेल्या मनांतली–अपयशाची हुरहुर नि चिंता दूर झाली; माईचं हृदय आनंदलं; सदूला समाधान झालं !– आपला शत्रू बिनधोक झाला, त्याच्यावरलं मृत्यूचं गंडांतर गेलं म्हणून कोणाला आनंद होणं जगांत शक्य तरी आहे कां ?... पण सदूचं तें मनापासूनचं समाधान त्याचप्रकारचं असामान्य नि निस्पृह होतं...

## अंगावर उलटलं !— २८

८३

चार दिवसांनीं ताप साफ जाऊन तात्या शुद्धीवर आले;...आपल्या

भोंवतीं जमलेल्या साऱ्यांकडे पाहून त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू ओघळूं लागत—

त्यांच्या जिवाचा फिरून संताप होईल, म्हणून सदू दूर दूर-नि गप्पच राही;...बेचैनपणें माई त्यांच्या उशाशीं अश्रू ढाळीत;...काय करावं ते न समजून मंजी जवळच घुटमळे; इतर गांवकरी मधूनच जरा अपराधी मनानें पण माणूसकीच्या आस्थेनें निमूटपणें येऊन जात.

मग एकदम तात्या एकदां मोठ्यानें ओरडून म्हणाले—"सदू-ए ऽ सदू जा !—आधीं आपल्या घरीं निघून जा !... कशाला या दुष्टाची एवढी सेवा चाकरी करतोयस ??—मी राक्षस आहे राक्षस !-माणसाचं इथं काय काम ?-"

"नका धनी ऽ, ऐका !" सदू कळवळ्यानें त्यांची समजूत घालूं लागला- "... आदीं माजं ऐका- "

"आतां रे ऐकूं काय ? कपाऽळ !-" तात्या अश्रू ढाळीत त्राग्यानें म्हणाले, "कुणाचंच ऐकलं नाहीं मी आतांपर्यंत !- तुझा तर घातच करायला निघालों. पण तुम्हांला कोणाला कळत कसं नाहीं- सदूऽ?... माझाच पुरा घात झालाय् आतां जन्माचा !!-"

माई, सदू,... मंजी त्यांच्याकडे भांबावल्या चेहेऱ्यांनीं पाहूं लागलीं.

तोंच तात्या एक मोठा निःश्वास टाकून म्हणाले-"या उजव्या बाजूनें पुरा पांगळा झालोंय् आतां मी, सदू ! अरे रे ऽ.. आतां काय करूं मी ?-"

## ८४

—आणि सदूनें पाहिलं तों खरंच-तात्यांच्या त्या भयंकर तापाबरोबरच त्यांचं उजवं अंगहि गेलं होतं.

तेवढ्यांत,... तात्यांच्या डोळ्यांतल्या अश्रूंबरोबरच त्यांच्या तोंडून शद्ब आले—" आतां मला जगांत कुत्रादेखील विचारणार नाहीं ! —काय झालं हें अकल्पित-भयंकर...!!"

" नका धनी ! जिवाला असं लावून घेवूं नका !-" सदूहि डोळे पुसत म्हणाला- " माईसारक्या सती हाईत तुमच्या पाटीराक्या ! मी हाईच कीं



तुमचा नोकर !- असा धीर काय सोडतां ?"

माईंनीं प्रेमभरानें आपल्या पतीकडे नि सदूकडे पाहिलं;... नि मग त्या सदूला हळूच म्हणाल्या-"सदू, क्षमा कर बरं त्यांना, झाल्या-गेल्याची !- आतां तूंच बाबा तारता-पाठिराखा, आमचा !!"

"माई, माईऽ... असं बोलूं देनार नाय् मी तुमाला !—" सदू कृतज्ञतेनें गयावया करून त्यांना म्हणाला— "तुमाला तरास होऊन नाय् उपेगी— नवसासायासान् कुशींत आलाय्, त्या बाळदेवाचं ओझं अजून वागवायचंय् तुमाला !!..."

तात्यांनीं हळूच माईंकडे पाहिलं; नि आपली मान वळविली;... माई तात्यांकडे अनुकंपेनें पाहात होत्या—

क्षणकाळानें सदू म्हणाला- "तुमच्या पायांतली व्हान मी, माईऽ !... माझं कामच हाय् त्ये !...सदू हाय् तंवर तात्यांची अगदि काळजी नको !-"

कारण नसतां दुसऱ्यावर हात उगारून त्याला अपाय करणं कधींच चांगलं नव्हे !- आतां, अपकार करणाऱ्यांवर कोणी हात उचलला तर तें आश्चर्य नव्हे !- पण जाणून बुजून अपकार करायचा ठरलेला आपला डाव आपल्या अंगावर उलटला असतानां, तो शत्रूच पुढें होऊन आपल्यावर उपकार करूं लागला,...तर माणूस बोलणार काय त्यापुढें ??-तात्या ! सदू !!

त्या क्षणींच्या तात्यांच्या भावना बोलून दाखवायला त्यांच्याकडे शद्बच नव्हते; म्हणूनच त्यांनीं सदूकडे नुसतं निमूट पाहिलं फक्त !—

## ८५

दिवसांमागून दिवस येतात;... सुखाचे !-दुःखाचे !...कसेहि असले तरी ते गेल्यावाचून कधींच रहात नाहीत— पण त्या प्रत्येक दिवसांत माणूस जें कांहीं चांगलं-वाईट करतो, तेवढंच काय तें मागं रहातं, एवढं मात्र खरं !-

'सद्याला चांगलं नाचवायचं-नमवायचं...लोळवायचं!-' या सूडाच्या भावनेनें तात्यांनीं आंबाईचा डाव टाकला; पण त्या प्रसंगातूनच सारं गाडं पालटलं—तात्या स्वतःच बिछान्यांत लोळत पडले!—उजवं अंग अर्धांगानें लुळं झालेलं; अगतिकपणें, उठण्या-बसण्या-चालण्यावेळीं तात्यांना सदूच्या पावलावर पाऊल ठेऊनच आतां वागावं लागे!- क्षणोक्षणीं त्यांना आंत जांचणी होई. सदूच्या चांगुलपणामुळें तर तात्यांच्या मनाला...'मीं हें काय करून बसलों?' असल्या विचाराच्या लाख इंगळ्या लागूं लागल्या—

दोन महिने तसे गेले होते. पण झाल्या गोष्टीतलं कांहींही..तात्यांना हिणवण्यासाठीं उच्चरणं, त्याची वाच्यता करणं,..सदूच्या हातून कधींच घडलं नव्हतं!- तात्यांनीं तें साफ विसरावं, अशा धडपडीचीच त्याची सारी त्यांच्याशीं वागणूक असे!—

सकाळीं उठल्यावर त्यांच्यासमोर पिकदाणी धरण्यापासून तों रात्रीं त्यांच्या अंगावर पांघरुण घालीपर्यंत, दिवसभर सदूची तात्यांभोवतीं हालचाल चालू राही;...पण ती अगदीं निमूटपणें!- आपल्याला अंघोळ घालतांना, जेऊं भरवतांना, सदूकडे समोरासमोर दृष्टिभेट देऊन पाहाणंहि त्यांना मेल्याहून मेलं बनवी!-

दुसऱ्या घावावेळीं तात्या कोलमंडले; पण... पण त्या क्षणापासून सदूनें आपल्या तीव्र रागा-दुःखाच्या उत्कट भावना मनांतल्या मनांत सांवरल्या होत्या!-आणि...आतां सदूच्या तत्पर चाकरीमुळेंच जगणारे तात्या!- त्या आपल्या दुबळ्या परावलंबी जीवनाची जाणीव प्रतिक्षण होऊन, ते पडल्या पडल्या अंतर्मुख होत; आपल्या साऱ्या गतायुष्याचं सूक्ष्म सिंहावलोकन करीत; नि वारंवार आपल्या मुग्ध अश्रूंच्या साहाय्यानें, त्यांच्या जीवाच्या त्या जांचण्या,...त्यांचं तें सारं पूर्व पाप साफ धुवून टाकण्याचा प्रयत्न करीत!...

८६

माणसांतहि असा अंतर्बाह्य बदल होतो, तिथें निर्जीव स्थलाचं काय?-



तात्या माजघरांत...तेव्हां त्यांचं अंगणांतलं सिंहासन पोरकं-उघडं पडलेलं!...इतरांची हृदयं हदरविणारं पूर्वींच तें सिंहासन!—त्याला मुजरा करण्याची अलीकडे कोणावरच पाळी आली नव्हती!—ते झुलत नव्हतं; स्तब्धच होतं!-क्वचित् कधीं तें वाऱ्याच्या झुळकीनें हललं,...तर अनेक दिवसांच्या बिनवापरानें, तें जणूं नाराज होऊनच, कधींमधीं कुरकुर तेवढी करी!—

कोण हाल...त्या बिचाऱ्या हालत्या सिंहासनाचे!—कारण? कारण, त्या सिंहासनाचा राजा परावलंबीपणें माजघरांतल्या गादीवर लोळत पडल्या पडल्या तासचे तास विचार मालिकेनें तळमळे—"सदू एक महात्माच!—त्याच्याशीं कपट-नाटक खेळलों मी;...पण स्वतःच धरणी धरली; त्या उदार कर्णानें मात्र मला उलट जीवदान दिलं!—त्याच्या नांवाच्या नुसत्या उच्चारानेंहि माझ्या पायाची तिडिक मस्तकाला भिडे;..आणि आतां?-आतां.. त्याचं नांव घडीघडी उच्चारून, आपलंच मस्तक त्याच्या पायाशीं क्षणोक्षणीं भिडतंय्!-"

भुईला लोळवूं पाहणारे तात्या स्वतः भुईला लोळले तरी उलट त्यांना फिरून भुईवर उभं करायचीच सदूची सारी अहोरात्र खटपट होती!—आपल्या एकेका शब्दशरानें सदूला जिव्हारी जखम करून, तात्या त्याच्या तोंडचं पूर्वी पाणी पळवित;..त्याला जीव नकोसा करीत!- पण उलट, शरपंजरीं पडलेल्या तात्यांच्या तोंडांत गांवच्या सतीच्या विहिरीचं जीवन आतां स्वतःच्या ओंजळी ओंजळीनें पाजून, सदूच त्यांच्या दुबळ्या शरीरांत पुन्हा जीव आणण्याचा प्रयत्न करी!-काय ही परिस्थिति!..काय ही नियति..

—तात्यांचा बेत होता...कर्णाला लोळवणारा अर्जुन व्हायचं आपण!-पण सदू, उलट, हवालदील झालेल्या त्या अर्जुनाचं, क्षणोक्षणीं सारथ्य करणारा कृष्णसखा झाला होता!-

म्हणूनच,...माईसारख्या साध्वी द्रौपदीलाहि सदू अगदीं कृष्ण-सखाच वाटे!—

# ताताचा अवतार २९

८७

तात्या पडल्या पडल्या, सदू त्यांची सेवा करणार; आपल्या मंजुळ गावंढळ गाण्यांनीं मंजू त्यांची करमणूक करणार;...असे दिवस चालले होते.

—गोड मंजीच्या त्या सहवासामुळेंच, आतांपर्यंत केवळ 'पैसा पैसा' करीत आलेल्या तात्यांना—'लहान मूल घरांत असलं, कीं, त्याला कशी एकदम शोभा येते'–याचं नवं प्रत्यंतर येत चाललं होतं—

'मुलामुळें घर शोभतं !' हें तत्व...आपलं अर्धं वय नि अर्धं अंग गेल्यानंतरच तात्यांना असं यथार्थतेनें समजूं लागलं होतं; नि–त्यामुळें, त्यांच्याहि आयुष्यांत होऊं घातलेल्या माईच्या पोटच्या गुपिताबद्दल मोठ्या आशाकुतूहालानेंच ते आतां पाहूं लागले होते.

आपल्या मागल्या आयुष्यांतल्या या चमत्कारिक घटनांचं तात्यांना अनेकदां आश्चर्य वाटे–त्यांचं बिछान्याला खिळणं, नि त्याचवेळीं पंचे-चाळिशी उलटल्यावर घरांत पुत्रागमनाच्या पताका लागणं...एकेकदां सुख–दुःखानें, आनंदाश्चर्यानें अगदीं गोंधळूनच जात ते !–हो, मंजीच्या या अहोरात्र सहवासामुळेंच, आजपर्यंत पैशांतच गढलेलं तात्यांचं मन, आता त्या शुभ दिवसाच्या व आपल्या मुलाच्या आगमनाकडे डोळे लावून बसलं होतं...म्हणूनच, आतां पडल्या पडल्या त्यांना वाटे–" फुलाशिवाय बाग,... मुलाशिवाय आपलं घर–वैभव, एकूण भयाण...भकासच !–"

'लाथ मारीन तिथं पाणी काढीन !–' हा आजपर्यंतचा तात्यांचा नित्याचाच अहंमन्य अहंकार !...पण त्यांची लाथ लुली पडल्यापासूनच तो आतां साफ मावळला होता. त्यांची जगाकडे,..माणसांकडे;..स्वतःकडेहि पाहाण्याची दृष्टी, साफ...आमूलाग्रच पालटली होती!–नवी दृष्टि–नवी सृष्टि !– त्या नव्या दृष्टीमुळेंच, त्याच छपराखालीं राहूनहि, आतां तात्या एका नव्या सृष्टींत वावरत होते !–



८८

दुबळेपणामुळें माणसाच्या आयुष्यांत अशी भयंकर क्रान्ति होते !– दुबळ्या शरिरांतलाच आत्मा अधिक विचारी होतो. असंख्य दुबळ्या जीवांना भिवविणारे, रडविणारे, छळविणारे पूर्वीचे हलत्या सिंहासनावरचे डुलते राजे–तात्या !—त्यांचं तें आसुरी राजपद !...त्यांच्या आयुष्यांतल्या असल्या एका अजब घटनेनेंच तें नाहीसं झालं होतं;...त्यांना लाभलेलं एका दृष्टीनें तें असामान्य सद्भाग्यच !—म्हणूनच, मध्य वयांतच, ते गतगोष्टींचं सिंहावलोकन करूं शकले; म्हणूनच, चांगल्या गोष्टींची जाणीव होऊन त्यांच्यापुढें ते विनम्र होऊं शकले;...त्यापुढं तरी स्वतःचा तोल सांवरून स्वतःला ते सुधारूं शकले.

हो, असलं तें दुबळंपण तात्यांना लाभतं ना,...तर तात्यांच्या आयुष्याची भरधांव, बेदरकार, निष्ठुर गाडी...घसरत घसरत, एखाद्या खोल कड्यावरून कोठेतरी कोसळलीच असती खास !...तें लाभलं,...म्हणूनच–गतपापांचा आढावा घेतां घेतां, त्यांना मानसिक टोंचणी झाली; आपल्या आपणच आंतल्या आंत धुमसून प्रायश्चित घेत, ते कांहीं महिने जमिनीला असे खिळून पडले; नि म्हणूनच,—त्या पूर्वीच्या अनियंत्रित आसुरी राजाला ...आतां दुबळ्या हातापायांना सांवरीत बिछान्यावर पडण्याचं पश्चात्तापी विक्रमपद लाभलं !—

तात्या सावकारांच्या त्या भूतकालीन...बेअटक, भावनाशून्य वैभवाकांक्षेच्या भराऱ्यांचे असे पाय मोडतांक्षणींच मात्र, तात्यांचं प्रेमळ हृदय खडबडून जागं झालं !...त्यांचाच एक अगदीं नवा भावशील संसारी गृहस्थ झाला; तात्यांची स्वतः खरेखुरे तात होण्याची आतुरता म्हणूनच आतां अशी वाढूं लागली होती !—

# आनंदाचा प्रकाश ! ३०

८९

तात्यांनीं धरणी धरल्याला आतां सहा महिने झाले; सदू त्यांना मालिश, औषधोपचार, सारं कांहीं तत्परतेनें नि वक्तशीर करत आला होता; आणि त्याचा परिणाम म्हणूनच, मंजीचा पांगुळगाडा करून, तात्या आतां पुन्हां नव्या दमानें माजघर–ओटी हे प्रांत हलकें हलकें पादाक्रांत करूं लागले होते.

आतां अशी त्यांची दृष्टीच बदलली होती म्हणून, कीं, पायऱ्या उतरून जाणं त्यांच्या दुबळ्या पायांना जमत नव्हतं म्हणून,..कां कोण जाणें, तात्यांचा तो झुलता झोंपाळा—त्याचं तें पूर्वीचं सावकारी पाशाचं कठोर सिंहासन–कुऱ्हाड घेऊन ते स्वतःच्या पायानें घरांतून बाहेर पडले–त्या दिवसापासून, अगदीं आजतागायतहि तसंच ओस पडलं होतं !—

९०

अलीकडे अलीकडे, सदू–मंजू तात्यांचं–घरांतलं...कसलंच काम, माईंना करायला देत नसत. त्यांना तें आतां झेंपतहि नसे. हीं बाप–लेक दोघं रक्ताच्या संबंधीं माणसांहूनहि जास्त काळजीनें त्या तात्या—माईंच्या जोडप्याला जीवापलीकडे जपत असत.

आज सकाळपासून माई...दुपारपासून सदू...कोणीच तात्यांच्या बाजूस फिरकलं नव्हतं. घरांतल्या कामासाठीं मंजीची तेवढी लुडबुड चालली होती... त्यामुळें पडल्या पडल्या, तात्या थोडे बेचैन झाले होते.

तीन्ही सांजा झाल्या तशी मंजीनें नवी वात नि दिवेल तेल घालून तात्यांच्या उशाजवळची समई पेटवली.

"मंजे, सदू ग कुठं पळाला आज ?"

"माझा 'दा'ऽ होय ?...तो कनीऽऽ..."



"तुझाऽ 'दा' काय ?–नि तो आमचा कोणीच नाहीं वाटतं, अप्पलपोटे? बरं पण गेलाय् कुठं तो ?– नि ही पण दिवसभर नाहीं दिसली—"

" 'दा' कनीऽ गेलाय् गडबडीन् कुटं भाएर !– न् माईंना नाऽ...बरं नाय् आज—पडूनच हाएत सकाळपासनं—"

तोंच भांबावलेला सदू आंत शिरला.. तात्यांनीं त्याच्याकडे प्रश्नार्थक चेहेऱ्यानें पाहिलं..

"आज रामजन्म होनार, सावकार; सुईन आनलीय्.." सदू हसत तात्यांना म्हणाला.

९१

मग सुरूं झाली आंतली गडबड;...माईचं विव्हळणं...मंजीचं आंत-बाहेर सुडबुडणं...

तात्या तर नवऱ्या गोंधळल्या चेहऱ्यानेंच कान टवकारून पाहात —ऐकत होते सारं कांहीं...

शेवटीं, आंतून आवाज आला–'कॅह्यॅऽऽ'

सदू तात्यांपाशीं आला-खुदकन् हसला—तात्यांनीं नकळत त्याच्या खांद्यावर स्नेहानें हात टाकला. मोठ्या उत्साहानें ते जागेवर उठून बसले.

मंजी हंसत हंसत आंतून बाहेर आली.

"तात्याऽ,...दा..ऽएकलंऽ !..माईंना बाळ झाला !–" मंजी बालिशपणें नाचत म्हणाली.

तात्यांचे डोळे अश्रूंनीं भरून आले होते; सदूचा आनंद गगनांतहि मावत नव्हता—त्याच्या उपकारकर्त्या देवतेला बाळदेव झाला होता.

तात्यांच्या आजपर्यंतच्या अंधेऱ्या घरांत–त्या अंधेरनगरीत आज आनंदोत्साहाचा नवा प्रकाश पडला होता !–

# हस्तांदोलन !- ३१

९२

अगदीं मध्यरात्र झाली तरी त्या दिवशीं तात्यांच्या घरांत गडबड चालली होती...

मंजीचा आंत बाहेर बोवाळ...हसणं-खिदळणं-ती तर आनंदानें ओरडतच होती—"दाऽ रेऽदाऽ! मी नऽ राम पाहिला- "

थोरांचा आनंद लाजेच्या भयानें, संकोचानें, मनांतल्या मनांत लपतो; पोरांच्या पोटांत कांहीं रहात नाहीं-त्यांना कसली लाजलज्जा ?-नाचती-बागडती मंजी तात्यांजवळ येऊन हातवाऱ्यांसह म्हणाली-"तात्याऽ तात्याऽ!...पाहिलांत कां बाळ ?.. वाटोळं डोकं न् वाटोळं तोंड छान,... इवलेसे डोळे न् बिटुकले दोन कान,...आहे गोरा गोरा पान्, आन् दिसतोहि कसा छान् !!-"

"अग, देवच हाय् तो, देव !—माईच्या वृंदावनाचा धनी !—" मंजीला प्रेमानें जवळ घेऊन सदू कौतुकानें म्हणाला.

तात्यांचा आनंद डोळ्यांतल्या अश्रूंतून ओघळत होता; त्यांचा चेहरा फुलला होता. कारण ?...कारण...आजपर्यंत अवकळलेलं त्यांचं घर लेणावलं होतं;...ओसाड बाग फुलली होती; माई आई, नि तात्या तात झाले होते; सदूला नवा धनी...मंजीला भाऊ...हलतं...बोलतं खेळणं—

सारींच अगदीं आनंदांत होतीं—

९३

पण त्या आनंदबरोबरच तात्यांच्या हृदयाला-मागलं सारं आठवून —घरं पडल्यासारखं वाटत होतं...; सदूच्या सूडाच्या त्या आपल्या पूर्व भावनेच्या आठवणींचीं शल्यं—तात्यांना सारखीं बोंचत होतीं !—

खालीं त्यांच्या बाजेजवळच सत्रंजीवर रात्रीं सदू पडला होता; चोहों-कडे सारं सामसूम होतं...



तात्या हळूंच वांकले; त्यांनी त्याच्या खांद्यावर हळुवार हात टाकला. दचकून उठून सदू त्यांना म्हणाला—"काय हवंय् , धनी ?"

"कांहीं नकोय्...हवंय् तें सारं मिळतंय्- सारं मिळालंय् !" तात्या गद्गदित स्वरांत म्हणाले- "पण किती हीन...दुष्ट रे मी, सदू ?- वृथाभिमानानें मी तुला छळायला गेलों... पण मीच खालीं आपटलों !... तुला माझा वैरी म्हटलं; पण तूंच अखेर मला धारलंस... माझा कैवारी झालास !- तुला हयादींतून उठवायला मी पाय टाकला, हात उगारला- पण मीच हाता-पायांतून खचलों...हातपाय गमावले !-नि तरी आजचा हा माझ्या घरांतला-मनांतला आनंद !- मंजी...तूं...तुमच्या पुण्याईनेंच मी हा दिवस पाहातोंय्!-सदू-सदू—"

तात्यांच्या गालावरून अश्रू ओघळत होते...

"झालंऽ गेलंऽ, होऊन गेलंऽ, धनी !-" सदू त्यांच्या खांद्यावर थोपटून मध्येंच त्यांना थांबवून म्हणाला-"आतां देव आलाय् , तात्या, आपल्या घरांत ऱ्हायला !- आतां या रामराज्यांत रावनाच्या मागल्या गोष्टी कशाला ?-त्याचं...हें आनंदाचं राज्य !-आतां नवा राजा...नवं राज्य !!-झालं-गेलं काय बी बोलायचं नाय् आतां, धनी..."

# नवा कारभार ! ३२

९४

आणि त्या दिवसापासून तात्यांच्या घरांत एक निराळंच वातावरण नांदु लागलं !- कारण ?- कारण-पंगु तात्यांच्या हातचा प्रत्यक्ष कारभार

केव्हांच गेलेला; "सदूशिवाय नुसत्या पैशानें तरी आपलं काय होणार होतं?" या जाणीवेनें सावकारी वैभवाचा, तात्यांचा उरला सुरला पूर्वींचा मदहि पुरा उतरलेला—

अशांच स्थितींत तें नवं रामराज्य सुरुं झालं होतं-

"गांवची पाटीलकी यापुढं आपल्याला अशक्य" याची तात्यांना आतां खात्रीच झाली होती. तेव्हां एके दिवशीं त्यांनीं पाटिलकीसाठीं सदूचंच नांव सरकारांत कळवलं नि जोरदार शिफारस केली.

देव मामलेदार आतां 'प्रांत' झाले होते. नव्या नेमणूकीचं तें प्रकरण नि सदूचं नांव त्यांच्यापुढें येतांच, त्यांनाहि मागलं सारं आठवलं; लखपतीची आग, सतीची विहीर, अकल्पित भूमीदान करणारा गरीब गांवकर कर्ण— तो सदबा...'तोच का हा सदबा?...'

देवांनी लागलीच सदूची सुंदरगांवचा पाटील म्हणून नेमणूक केली.

हासभास नसतां, तें सरकारांतून लिहून आलं; तात्यांनींच त्याला वाचून दाखवलं; तेव्हां सदू गोंधळला. तात्या आजारी पडून बिछान्याला खिळल्या-पासून तात्यांसाठीं सदूच सारी कामगिरी करी;–तात्या केवळ नामधारीच होते— —तरी आतांची ही नेमणूक...त्यानें तत्काळ ओळखलं–'हें तात्यांचंच काम!'...आणि तात्यांनीहि हसून त्याला धीर दिला, उत्तेजन दिलं.

शेवटीं, सदू सुंदरगांवचा 'सदबा पाटील' झाला!—

## ९५

गांवचा पाटील असा बदलला; पण व्यवहाराचं अंगण तेंच राहिलं; अंगण तेंच राहिलं; पण तिथलं वातावरण—तिथली अधिकार–पद्धति मात्र साफ बदलली!—

पूर्वीं त्या अंगणांतून कोणी बाहेर पडे,...तेव्हां आपल्या बाबतींतल्या अघोर अन्यायाला पोटांतल्या पोटांत गिळून झालेला हिरमुसला आंबट चेहरा असे त्याचा!—आतां प्रत्येकाच्या चेहऱ्यावर न्यायी समाधान झळके!-



पूर्वीं आंत शिरणाऱ्या प्रत्येकाची हुरहुर असे 'जागा चुकलों!–' आतां आपल्या सुखदुःखांतल्या योग्य सल्ल्यासाठीं योग्य जागींच आपण आलों आहों,-हें प्रशांत समाधानच त्याच्या चेहऱ्यावर झळकत असे!—

—अंगणांत शिरतांच... उग्र, त्रासिक, कुरकुऱ्या अगर रागीट चेहऱ्याचे झुलत्या सिंहासनावरचे पूर्वींचे तात्या आतां कोणाला दिसत नसत; त्याच झोंपाळ्यावर एक प्रफुल्ल चेहेऱ्याचा गोंडस बाळ हसत–खेळत, लाडीक शद्ब बडबडत बसलेला त्यांना आढळे.

अशा वेळीं त्यांच्या कल्पनाचक्षूंपुढें जुनीं दृश्यं उभीं राहून ते बावरत; त्यांच्या मनाचा गोंधळ होई क्षणभर-'घर चुकलों कीं काय?'

तेवढ्यांतच, त्या बाळाजवळ झोंपाळ्यावर बसलेली ती काळीसांवळी मोहक पोरगी एकदम् त्यांना सहास्य म्हणे– "याऽ...याना!– कोण हवंय्?– सदबा पाटील कीं तात्या सावकार?–"

हें सारं दृश्य, पाण्याला जातां येतां पाहून, म्हाताऱ्या कोताऱ्या आपल्याशींच आनंदत; नि एखादी आपल्या कानशिलांवर आपलीं बोटं मोडून घेत, हळूच कौतुकानें म्हणे– "बघा गऽ बायानों...नवा राजा...नवं राज...इडापिडा टळो! तूं तरी आतां आयुखवंत हो रेऽ, बाबा! आमच्या सुंदर-गांवाला सुंदर कर!!–"

## ९६

हल्लीं तात्यांच्या खासगी व्यवहारांतसुद्धां सदूच लक्ष घाली... सदूच सगळे निर्णय घेई.

तात्यांचीच त्याला ताकीद होती ती; त्याला ते हसून म्हणत— "हें बघ सदूऽ, मी तर आतां असा पुरा परस्वाधीन! ती बिचारी एकटी बायको माणूस घरांत!– या वाढत्या जीवाचा, माझा, आमचा साऱ्यांचा तूंच आतां एकमेव पालक!– यापुढं तोंड द्यायचंय् काय तें, साऱ्या गोष्टींना, तुला!–

तेव्हां तूंच तुझ्या बुद्धीप्रमाणें कोणाला कसं तें सुखव-दुखव !- मी आतां आणखी कशाला मधें पडूं ??—"

अशी एकदां तात्यांकडून त्याला सदरपरवानगी मिळाल्यावर, तात्यांचे बरेचसे व्यवहार बाक्या-व्याजांच्या सूटी देऊन, सदूनें भरभर बिनबोभाट सोयीवर तोडले; कुळं ऋणमुक्त होऊन हळूंहळूं घरोघर गेलीं; तात्यांची पडलेली वसूलीहि गोळा झाली.

कर्जखोरीचं दुःख नि जंजाळ सदूला स्वतःच्या अनुभवानेंच ठाऊक होता; तेव्हां, वर्षांनुवर्षें ऋणाच्या खाईंत खिचपत पडलेले जीव असे मुक्त झाले, कीं, त्यालाहि त्यांच्याइतकंच हायसं वाटे !—

परत फिरतांना, 'आपण स्वप्नांत तर नाहीं ना ?' अशा विचारानें कांहींसं दचकूनच, ते समोरच्या झोंपाळ्याकडे पाहात–तिथें तात्या नसत; तो त्यांचा गोड बाळ मात्र हंसत बालिश बडबड करीत बसलेला असे;...प्रेमानें त्याचा गालगुचा घेऊन, आर्द्र डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहात, ते जातां जातां म्हणत-" तुझ्याच राज्यांत आम्ही असे हसलों, बाबा !– तुलाहि देव नेहमीं असंच हसत ठेवील !! "

९७

यामुळेंच सदबा पाटलाचाहि गांवांत, गांवाबाहेर बराच बोलबाला झाला होता; कसलीहि चिंता वाटली, कीं, एक दुसऱ्याला सल्ला देई... " सदबा पाटलाकड् जा !–तो लाख मानूस !—लाखांतली गोष्ट सांगल् !"

तात्यांनाहि या साऱ्या पालटाची मोठी मौज वाटे; कधीं कधीं, मंजीच्या खांद्यावर हात ठेऊन, ते लटपटत–लटपटत अंगणांत उतरत; सभोंवर एकदां दृष्टीक्षेप टाकीत; पण त्या झोंपाळ्यावर बसण्याचा मात्र त्यांना पुन्हां कधींच मोह झाला नाहीं.



—ते तोंड फिरवत हसून म्हणत–" मंजेऽ पोरी, पुरे झाला आजचा हा एवढा फेरफटका !—माझी माजघरांतली बाजच आतां बरी मला !— फिरव होडीचं सुकाणूं त्या बाजूला..."

# नवीं आंदोलनें ३३

९८

आतां तात्या स्वतः बसत नसत, तर त्यांचा आनंद बाळ बसे झोंपाळ्यावर; आतां तात्यांना अंगणांत चालतांहि येत नसे; पण त्यांच्या बाळाला मात्र दुडदुडायलाहि अंगण पुरत नसे !– तेवढं पाहून देखील तात्यांच्या जीवाला आनंद होई !– आपला आनंद त्यांना आपला प्रत्यक्ष आनंदच वाटे !—

जुना जमाना म्हणा, खानदानी रीत म्हणून म्हणा, आजपर्यंत कधीं पुढील अंगणाकडे डोकवूनहि न पहाणाऱ्या माई !– आपल्या बाळाचे ते चाळे बघायला पुढच्या दाराच्या उंबरठ्यावर त्या उत्सुकतेनें येऊन उभ्या राहात !–

पण तसं बघतां बघतां माईंचं मन एकदम शंकित होई—त्यांना वाटे– " बाळ नव्यानेंच चालायला,...पावलं टाकायला शिकतोय् !–पण त्यांच्या या पुढल्या अंगणांत ??– नको ग बाईऽती पुढल्या अंगणांतली बेछूट चाल ! या चिमुरड्याला नाहीं जमायची ती!"

अशी हृदयांत पूर्वानुभवामुळें एकदम कालवाकालव होऊन, आनंदानें स्वैर दुडदुडणाऱ्या त्या आपल्या निष्पाप बाळाला त्या पटकन् उचलून घेत; नि-

मागील दारच्या अंगणांतल्या तुळशी वृंदावनाशेजारीं त्याला सोडून, हळूंच स्वसमाधानासाठीं पण त्याला म्हणत–" हं...आधीं इथंच चालायला शीक, बाळ !—मग मोठा झाल्यावर खुशाल जा तूं पुढल्या अंगणांत !–"

## ९९

माईंचे ते शद्व तात्यांना ऐकूं येत नसले, तरी त्यांच्या त्या गडबडीनें स्वतःचा विरस झाल्यासारखंच त्यांना वाटे. नि हें पुनः पुन्हा निमूट पाहून, ते—मंजी त्याला घेऊन पुढील अंगणांत खेळूं लागली, कीं, तिला पण अर्धवट माईंनाच टोमण्यानें म्हणत—" हं हं...मंजे;ऽ त्याला इकडे नको पुढल्या अंगणांत !– दृष्ट लागेल...जा पळ, मागें वृंदावनापाशीं ने त्याला !– त्याची आई रागावेल हो तुला–"

माईंनी तें ऐकावं ही तात्यांची इच्छा असे; आणि तसं त्यांनी ऐकलं तर त्या आपल्या पतीला आदबीनेंच पण फणकाऱ्यानें म्हणत–" हो हो, अक्षू ऱ्यात बरंऽआमचं आपलं ! पण पुरुषच आहे म्हटलं तो...येईलच कीं पुढें तो पुढल्या अंगणांत–तिथले वेडेवांकडे पुरुषी डावपेंच खेळायला !– मी म्हणते–लहानपणीं तरी वृंदावनासमोर नि शेजारीं पाय टाकायला शिकूं द्या कीं त्याला–"

माईंच्या त्या समर्थनावर–मागला सारा अनुभव जमेस धरल्यावर–तात्यांना तोंड सांपडत नसे. ते आपले निमूट राहून माईंकडे पाहात स्वतःशींच हसत.

## १००

पण सदूजवळ पास असला तर तो मात्र लागलींच माईंना म्हणे—" पुढलं मागलं अंगन–दार हा फरक कशाला आतां, माई !– या रामराज्यांत तें नाय् गवसायचं ! नि या तुमच्या रामराजाला पुढल्याच अंगनांत कित्येकानीं



सुखे दिले हाईत आतां !– तिथं ऊन नाही आतां, माई !– मागें गारवा तर पुढें ओलावा !– खेळूं द्या ना बाळाला, त्याला हवं तिथं !–"

आणि मग, वाढत्या आनंदाचं कौतुक करत, तात्या, सदू, मंजी, माई, सारीं तासतास पुढल्या अंगणातहि त्यांच्याशीं खेळत राहात. असल्याच तासातासानें दिवस, दिवसाचे महिने नि महिन्यांचीं वर्षें झालीं; तें लक्षांतच आलं नाहीं कोणाच्या !–

—पण आनंदाची, आमच्या सुंदरगांवाची, भारताची, साऱ्या जगाचीच त्या मधल्या काळांत प्रगती होत गेली होती !– जग पुढें पुढें चाललं होतं...

# सुंदर काया–पालट ३४

## १०१

सदबा पाटील गांवचं काम मोठ्या समजूतदारपणें करीत. सतीसमितीचे सरपंच सदबाच... गांवांत नाना सुधारणा घडवून आणण्यासाठीं सर्व शहाण्या गांवकऱ्यांची त्यांना मदत होई. तात्या म्हणजे जुने सावकार... त्यांची जुनी मुख्त्यारी नि नवी नव्या दृष्टीची सावकारी सदबांच्याच हस्तें होई–. म्हणूनच, अलीकडे अलीकडे सुंदरगांवचे सदबाच मध्यबिंदू झाले होते. त्यांच्याच भोंवतीं गांवकऱ्यांचं वर्तुळ पडलेलं असे—

सतीच्या विहिरीची, सदबांच्या आंब्याची, मध्यवर्ती धर्मशाळेची, कायम नि चांगली व्यवस्था झालेली; गांवातले पाटील–सावकार लोकांच्या

हितासाठीं झटायला तयार झालेले, झटूं लागलेले;—सारा गांव आपल्या न्याय्य हक्काबाबत खडबडून जागा झालेला—

मग आतां आमच्या सुंदरगांवची नवी सुखाची घडी बसली असली नि त्याची प्रतिदिन प्रगति होत असली तर त्यांत आश्चर्यं तरी कसलं?—

## १०२

गांवाला धर्मशाळा—विहीर बांधूनहि सती समितीकडे पैसे उरलेले; तेव्हां साऱ्यांच्या मसलतीनें दुपारीं धर्मशाळेंत शाळा भरूं लागली. देवांच्या साहाय्यानें सदबांनी एक तरुण उमदा मास्तर आणवून त्याची नेमणूक केली. मास्तर तात्यांच्याच घरांतल्या एका खोलींत राहात असे.

हळूहळूं ‘ सती समिती ’च्या पंच मंडळानें उरलेल्या पैशांच्या बळावर व गांवकऱ्यांकडून रुपया रुपया गोळा करून उभारलेल्या नव्या भांडवलावर सहकार पतपेढी स्थापली; त्याबरोबरच गांवचा ‘ धान्य—खजिना ’ उभा झाला. या धान्य पेढीच्या तर्फेंच शेतकऱ्यांना आगोठीच्या नडीच्या वेळीं खावटी, पेरणीच्या वेळीं निवडक बी—बियाणं, नांगरखतासाठीं रोख कर्ज... सारं सारं...अगदीं लाचारीशिवाय, सावकारी पाशांत न पडतां, बिनबोभाट मिळूं लागलं!—

या बाबतींत मोहनराव मास्तरांची आस्था नि मनापासूनची धडपड वाखाणण्यासारखी होती. त्यांची तडफ, त्यांचा धोरणी कल्पकपणा, नि हुशारी सदबांना व गांवकर पंचांना नवनवीन हुरुप आणी. त्यामुळें क्षणभर सदबा पाटलांना विसरून सारा गांव मोहनरावांच्याच भजनीं लागला. मोहनरावांच्या तत्परतेची मोहिनीच तशी मोहक होती.

पंचविशी आंतबाहेरचा, रुबाबदार मोहनराव!— फायनल, एक वर्ष ट्रेन्ड, मॅट्रिक असा लायख माणूस...हिशेबांत नि शिकावण्याच्या कामांत अगदीं चोख...चलाख; पुन्हा स्वभावानें गोड, मनानें निर्मळ नि वृत्तीनें



मनमिळाऊ;...वर्षभरांत मोहनराव सुंदरगांवाशीं एकरूप झाले...ते गांवच्या गळ्यांतले ताईतच बनले!—

## १०३

या मोहनरावांच्या उत्साही कार्यक्रमामुळेंच गांवांत नव्या उत्साहाचं वारं संचारलं; प्रतिदिन ज्ञानाबद्दल कुतूहल वाढत गेलं!—

सुरवातीस सारीं मोठीं मंडळी संध्याकाळीं मोहनराव सांगत त्या गोष्टी ऐकायला एकत्र जमत;—त्यांच्यामागून तरुण तरुण सारे घोषणा ओरडत; किंवा सारेच संघानें प्रार्थना—गाणीं म्हणत... मग मोहनराव जगांतल्या चालू घडामोडी त्यांना समजावीत; नव्या शास्त्रीय शोधांच्या जमती—गमती खूप खुलवून सांगत; हळूच कधीं कसले तक्ते, कसलीं सचित्र पुस्तकं, कसलीं चित्रं दाखवीत; मग ते स्वत वाचून दाखवीत; वाचन सर्वांनाच आलं पाहिजे, असं बोलून दाखवीत; तेव्हां शेवटीं, कांहींनी आपणहूनच शिकायची इच्छा दाखवली; मोहनरावांनींही ती संधि साधून त्यांना लिहावाचायला शिकवायची सुरवात केली. एक, दोन, तीन, करतां करतां आठवड्याच्या आंत, सुंदरगांवांत पंचवीस जणांचा एक प्रौढ साक्षरवर्ग सुरु झाला; त्यांत सदबा पाटील प्रथम दाखल झाले होते; नि ते महिन्यांत स्वतःची सहीहि वळणदार व सुवाच्य करूं लागले होते.

सदबासारखे कितीतरी प्रौढ लोक सहा महिन्यांत साधंसुधं लिहायला नि अडखळत—चुकत वाचायला शिकले. मुंबई इलाख्याच्या नकाशावर, ‘सुंदरगांव कुठं?’ म्हणून विचारूं लागले. एक दुसऱ्याला बारीक काडीनें तें दाखवूं लागला..जें जें येऊं लागलं त्यानें आनंदून उत्तेजून, नवीन नवीन माहिती मोहनरावांकडून शिकून हस्तगत करण्याचें कुतूहल सारेच दाखवूं लागले.

हें सारं पाहून सदबा पाटील तर बेहद्द खूप झाले; त्यांना मोहनराव मास्तरांबद्दल फारफार प्रेम नि आपुलकी वाटूं लागली.

# एकादशीचं स्नान!– ३५

## १०४

पण मग, तेच मोहनराव मास्तर, एके दिवशीं, एका प्रसंगीं, झालेल्या वादविवादावरून सर्व पंच मंडळींवर,...किंबहुना साऱ्यां गांवावरच रुसले;... त्यांचा-त्यांचा मतभेद अखेर अगदीं अटीतटीवर आला.

सुंदरगांवच्या देवळांत, सर्व गांवकऱ्यांचं दरवर्षी आषाढी एकादशीला सम्मेलन असे. भजनी मेळे, कीर्तनं,...गांवजेवण, देवाचा उत्सव–सारं कसं अगदीं घसघशीत पार पडे.

पण त्यांत गांवांतले सुमारें पन्नाससाठ जीव भाग घेऊं शकत नसत. त्यांना देवळाच्या आवारांतहि यायला मुभा नसे. सर्वांचीं जेवणं झालीं, कीं, मग, त्यांना लांब एका झाडाखालीं वाढत नि आग्रहानेंहि वाढीत; पण त्यांच्यापासून सारे लोक अगदीं दूरदूरच राहात...

मोहनराव मास्तरांनीं हें सारं आधल्या...त्यांच्या सुंदरगांवांतल्या पाहिल्या वर्षी, निमूट पाहिलं होतं. पण या वर्षी मात्र, एकादशीपूर्वीच ते सर्व गांवकऱ्यांना म्हणाले—"या वर्षी एकादशी दिवशीं,... आपण आपल्या अंघोळीबरोबरच...कधीं नव्हतों इतकं पवित्र व्हायचं, बरं का?– आपल्या धर्मावरचा एक कायम कलंक धुवून काढायचा!– आपण सारींच देवाचीं लेकरं ना?–मग त्या देवाजवळ आपण साऱ्यांनींच एकत्र जवळ जवळ यायचं, बसायचं, भजन करायचं, एकत्र जेवायचं, एकत्र वावरायचं!...नि याला अगदीं एका गांवकऱ्याचाहि अपवाद होतां नाही उपयोगी!–तेंच होईल खरं एकादशीचं पवित्र स्नान!!"

## १०५

सारींच एकदम दचकलीं. सदबा सचिंतपणं म्हणाले–'मास्तर, वाडकर हें कबूल कसं पन् करतील?—म्हनजे...गांवातले म्हारधेडबी आता देवळांत-



शिरायचे?... बापजाद्यांनीं कधीं केलं नाय् तें करायचं? ते का आमचे वैरी हाईत?– पन् मग धरमच सांगतो ना आपल्याला तसं?–असं काय् धर्मलंड-पनाचं नका सांगूं तुमी, मोहनराव!—"

"धर्म कांहीं एक सांगत नाहीं असं वेडंवांकडं!–" मोहनराव आत्म-विश्वासाच्या उत्कटतेनें म्हणाले– "नि धर्म असं सांगत असला तर तो बदला; माणसाच्या माणुसकीविरुद्ध धर्म कांहीं सांगूं लागला तर त्याला गुंडाळून ठेवा.."

"धर्म बदला?–" दुसरे दोघे पंच आश्चर्यानें उद्गारले. "धर्म गुंडाळून ठेवा?...काऽय मास्तर,... वंगाळ काय सांगतां?–"

"हो!...तुम्हांला वाटतो त्यापेक्षांहि एक मोठा धर्म आहे दुसरा! माणुसकीचा धर्म!–तोच धर्म झोंपेतहि पाळा!–पण आपल्या या गांवांत धर्माच्या नांवाखालीं असलं स्पृश्य–अस्पृश्य मुळींच नाहीं उपयोगी!—या एकादशीला आपण आपल्या देवाला तसंच सांगूं...तसंच करूं! तशी शपथ घेऊं!...देव ऐकेल आपलं सारं!—"

"पन मास्तर...सगळे ऐकनार नाईत तें; एक येळ ते बी ऐकतील;– पन नाग्या म्हार, कान्ह्या धेड असलीं धर्माला माननारीं मंडळी, सवताच ऐकनार नाईत, तुमचं हें!–तीं मानसं अशी देवाला विटाळवनार नाईत!—" सदबा सचिंतपणें म्हणाले; मास्तरांच्या त्या नव्या धोरणेनें त्यांचा अगदीं जीव खालीं वर होत होता.

"मग पाटील,...म्हणूनच तर आपण त्यांना सारं समजवून शाहाणसुर्तं केलं पाहिजे! देव त्यांच्या स्पर्शानें विटाळत नाही हें त्यांना पटवलं पाहिजे!– आपण आपल्या धर्माचा हा कलंक सुंदरगांवापुरता तरी धुतलाच पाहिजे!—"

## १०६

आणखीहि खूप बोलणं झालं त्या बैठकींत; सर्वांना मास्तर म्हणत होते तें सारं समजत होतं,...पण उमजत मात्र नव्हतं!...काय नि कसं करावं, तें समजतच नव्हतं!...

शेवटीं, मोहनराव नाइलाजानें पण एका निश्चयानेंच म्हणाले—"तुमचं काय असेल तें असो;—ठरेल तें ठरो!...मी मात्र उद्यांपासून कान्ह्या–नाग्यांकडेच जाणार;...ते उत्सवांत असले तरच मी उत्सवांत; ते देवळांत शिरले तरच मी देवळांत;..ते तुमच्या शेजारीं जेवले तरच मी तुमच्या शेजारीं–"

यानें साऱ्यांना धक्का बसला; प्रथम साऱ्यांना वाटलं, केवळ आपलं मन वळवण्यासाठींच मोहनराव एवढं बोलताहेत; पण रामपहारीं मोहनराव अस्पृश्यांच्या वस्तींत राहायला गेले सुद्धां होते!...

मग मात्र, साऱ्यांचींच धाबीं दणाणलीं. सभा झाल्या; खलबतं झालीं; पण कांहीं निश्चित असं ठरेना.

## मतमतांचा गलबला!– ३६

### १०७

इकडे, मोहनरावांना रामप्रहरींच आपल्या घरीं आलेलं पाहून, नाग्या-कान्ह्या दोघांचे डोळे अश्रूंनीं भरून आले;...पण तरी त्याक्षणींच त्यांची बोबडीहि वळली.–तेच उलट मोहनराव मास्तरांना त्यांच्या त्या निश्चयापासून परावृत्त करीत होते–"आमची पायरी आमीं जानतों—आमाला देवाचा असा भर्स्टाकार करायची आस नाय्!...वाडवडिलांना धरूनच गांवकरी तसं वागतात; त्यांचं–आमचं काइबी वाईट नाय्—हाय् तें बरं हाय्!"

तसल्या प्रकारचं त्याचं म्हणणं ऐकूनहि मोहनराव जागचे हालेनात; तिथं त्यांच्याकडेच राहिले. तेव्हां मात्र त्यांचा नाइलाज झाला.



चार दिवसांनंतरहि मोहनराव परतले नाहीत!— गांवांत तर खळबळच उडाली होती. अगदीं म्हातारीं मंडळीं म्हणाली..."हा मास्तर हाय् बरा मानूस–पन् डोक्यांत नाय् तीं थेरं घेतो, कदीं कदीं! त्याच्यासाटीं असा भ्रष्टाकार तेवडा नाय् चालू देनार आमी!—जाऊं दे...आभच्यातून उटून गेला तर—"

पण सदबांना त्यांचं तें म्हणणं पटेना!-सुंदरगांवात आतांपर्यंत मोहनरावा-मुळेंच कितीतरी झालेलं;...इतका चांगला प्रेमळ माणूस...एकदम इतकं कांहीं तरी वाईट कधीं वागणार नाहीं; त्यांत कांहींतरीं अर्थ नक्कीच असेल; पण गांवकऱ्यांना तें समजत नाहीं; असंच त्यांना सारखं वाटत होतं.

त्यावर थंडपणें माई म्हणाल्या—"सदबा, गांवकरी म्हणतील तसंच त्यांना वागूं दे!— मोहनरावांनीं तर त्यांची नाडी पक्की ओळखलीयू—त्यांना पाहिजे तसंच तें अखेर करून घेतील त्यांच्याकडून;– मोहनरावांचं सारं बोलणं योग्य असेल...खरं असेल...तर वेळेवर सारा गांवहि बदलेल!–नसेल तर उलट ते गांवाबाहेर होतील! तूं मात्र कोणालाच कांहीं सांगूं नको!—"

### १०८

शेवटीं, एकदांची एकादशी आली. गेल्या वर्षी, उत्सवांतल्या रामलीला-वगैरेंच्या तयारींत, नवीन भजनं बसवण्यांत, जेवणाचा बेत व व्यवस्था करण्यांत,...अशा हजारों भानगडींत मोहनराव रात्रंदिवस अविश्रांत राबले होते; गतसालचा तो समारंभ प्रचंड यशानें गाजला होता; मोहनरावांचे सर्वांनीं अखेर फार आभार मानले होते. एकमुखानें जयजयकार केला होता.

पण या वर्षी ते नव्हते; साऱ्या गांवकऱ्यांना तें जाणवलं; पण त्याबद्दल आधीं कांहींएक बोलायचंच नाहीं, असं–जवळजवळ न ठरतांच–साऱ्यांचं ठरलं होतं; साऱ्या हालचाली गपचुप गपचुप चालल्या होत्या.

तरी मनांत मात्र कोणाकोणाला वाटलं- आयत्या वेळीं तरी मास्तर खात्रीनें निदान हजर राहातील; समारंभांत थोडा तरी भाग घेतील.

—पण अखेर...तसं कांहीं एक घडलं नाहीं.

" अस्पृश्यांच्या वस्तींत जाऊन आठ दिवस राहिलेले...नि त्यांच्याच घरांत शिरलेले मोहनराव आतां बाटले;...ते वाळींतच पडले पाहिजेत!" असाहि उलट कांहीं गांवकरांचा कटाक्ष होता—

सत्रा जणांचीं सत्रा मत होतीं. सर्वांचं कसलंच एक मत नव्हतं!

१०९

नाग्या-कान्ह्यालाहि बेचैन वाटत होतं; काय करावं, कसं करावं, नि काय होणार आहे,...तेंच त्यांना समजत नव्हतं !—

त्या आठ दिवसांत मोहनरावांनी त्यांची ती वस्ती, त्यांचे सर्वांचे कपडे, त्यांची भांडीं, घरंदारं, सारं सारं साफसूफ नि स्वच्छ करवून घेतलं होतं. या सर्व कायापालटामुळें त्यांना एकप्रकारचा नवाच आत्मविश्वास वाटत होता.

तरी पण, या चमत्कारिक कारणावरून गांवांत गोंधळ उडावा, आपापसांत फूट पडावी नि यात्रेवर आपण बहिष्कार टाकावा, असं त्या अस्पृश्यांनाहि मनांत वाटत नव्हतं !—

तेव्हां, एकादशीच्या सकाळीं, पहांटे स्नान करून, स्वच्छ कपडे करून, दर वर्षांप्रमाणें, देवळाजवळ जाऊन उभे राहायला ते तयार झाले.

निघतां निघतां, नाग्या-कान्ह्या मोहनरावांना म्हणाले—" चला मास्तर, देवाच्या सोहाळ्याला—; आज आषाडी यकादशी—"

पण मोहनराव गंभीरपणें म्हणाले—" तुम्ही व्हा पुढं...तुम्हाला जायचं तर !—मी कांही इथून हलत नाहीं !–इथंच माझं पंढरपूर ! "



११०

गांवची यात्रा भरली...पूजा झाली; आरती झाली–जेवणाच्या पंगती मांडल्या...

गांवांतलीं सारीं पोरं-सोरं, म्हतारींकोतरीं हजर होतीं;...तरी पण साऱ्यांना चुटपुट वाटत होती एकच–" मोहनराव मास्तर नाहीत हजर !–"

आयत्यावेळीं सदबा पाटील गोंधळले. सतीचे इतर पंचहि गडबडले. माई सुद्धां इळहळल्या-तात्यांकडे सारे जमले–" आतां काय करावं !... नेहमींचे इतके चांगले मास्तर...आज असे चमत्कारिक वागताहेत; देवाच्या साऱ्या सोहाळ्याचा अगदीं विरस करताहेत !!–"

त्या कारणासाठीं त्यांच्यावर सारेच रागवत होते. पण त्यांच्याशिवाय कोणी जेवायला मात्र तयार होत नव्हतं ! त्यांच्याशिवाय कोणी रामलीलेला, 'रामराज्य वियोग' नाटकाला, भजनाच्या फडाला उभंहि राहायला तयार होत नव्हतं !–

तात्या शेवटीं म्हणाले– "सदू... तो मोहन तुम्हा साऱ्यांना हवाय् म्हणतां ! पण त्याचं सांगणं मात्र तुम्हांला कोणाला नकोय् !... असाच ना याचा अर्थ ? आधीं सर्वांनीं त्याच्या सांगण्याचा तरी नीट विचार केलांत कां ? तुम्हाला नीट समजत नसलं तर आतां आधीं त्यालाच जाऊन विचारा तरी–"

साऱ्यांना एकदम पटलं तें; ओळीनें मांडलेल्या पत्रावळी तशाच न वाढतां टाकून, सारीं मंडळीं अस्पृश्य वस्तीकडे 'रघुपति राघव राजाराम, पतीत पावन सीताराम !' असा घोष करीत निघालीं...मोहनरावांना शोधून, त्यांना देवळांत आग्रहानें खेंचून न्यायचं, असंच सर्वांचं ठरलं होतं!– नव्या दमानें सारे त्याबाजूला लगबगीनें निघाले.

सकाळीं प्रथम घुटमळून, शेवटीं देवदर्शनाला निघून गेलेलीं नाग्या-कान्ह्या वगैरे मंडळीहि त्यांतच सामील झालीं होतीं.

भजन म्हणत सारीं इकडे येत होतीं. स्पृश्याच्या आघाडीला, त्यांचं आपल्या वस्तींत स्वागत करायला, देवळाकडून निघालेल्या त्या मेळाव्याच्या अग्रस्थानीं, नाग्या–कान्ह्या होते. त्यांच्या मागून सदबा पाटील, पंच मंडळी नि इतर बरेच प्रतिष्ठित चालत होते.

सारे म्हारवाड्याजवळ पोंचले;...तेव्हां मोहनराव एका चांभाराच्या घराची साफसुफी करीत होते.

## १११

सुंदर गांवांतली ती त्या दिवसाची खळखळ अपूर्वच होती. त्यांचा ज्ञानदाता प्रेमळ...मोहन—प्रभाकर, नाग्या-कान्ह्यांच्या वस्तीच्या अंधारांत लपला होता. त्याच्याशिवाय त्यांना भोंवतीं अंधार वाटत होता...

सारे आपल्या बाजूला येतांना पाहून, मोहनराव सौम्य हंसले; थोडे पुढे झाले. तेवढ्यांतच, सदोबा अजीजीच्या स्वरांत म्हणाले-"हें काय बरं, मास्तर?- मंडळी वाट बगून बगून दमलीं...आन् तुमी हितंच ? हितं करतांय् काय ?- चला...देवळांत-देवाच्या परसादाला !—तुमी आल्याबीगर आमी कोनी पानावर बसनार बी नाय् !—"

मोहनराव हातांतला झाडू पुढें दाखवून संथपणें नि सहास्य म्हणाले— "मी? आपलं सुदरगांव सुंदर करतोंय् मी;...त्याचीच साफसुफी करतोंय् !— हेंच सगळ्यांतलं मोठं नि पवित्र काम !—तें करणारीं हीं आपलींच माणसं, आपलेच भाई !...त्यांच्या या मंदिरांमध्येंच माझा..तुमचा..सर्वांचा देव आहे. तो टाकून मी तिकडे कशाला बरं येऊं, सदबा ?–त्या देवाचा प्रसाद ?... खुशाल घ्या तुमी !–इथल्या देवांच्या मीठ-भाकरीचा प्रसादच मला अधिक गोड !...पहाऽ...पहाऽ हे देव !—आणि यांचीं हीं मंदिरं !–आतां कशीं स्वच्छ...साफसूफ झालीं आहेत !–नाहीं ?–आपल्याच गांवच्या भूमीचं अन्न ते खातात;...आपल्याच डोक्यावरच्या हवेचे श्वास घेतात ते;...आपल्या इतकेच शरीरानें–मनानें स्वच्छ आहेत कीं ते;...आपल्यासारखींच सुख-



दुःखं भोगतात ते !—मग त्यांच्या आमच्यांत आम्ही मूर्खपणानें खोटा फरक कां करावा ?—माझं हें म्हणणं तुम्हाला पटत नसेल,...तुमच्या देवालाहि तें मानवत नसेल,...तर माझं कांहींच म्हणणं नाहीं !—आतां माझे मात्र हेच देव;...हींच...यांचीं हीं घरंच...माझीं मंदिरं;–या स्वच्छ देहाच्या नि निर्मळ मनाच्या बांधवांनीं दिलेली मीठ-भाकर,...हाच माझा प्रसाद !–यांची सांज–सकाळ भेट...हीच माझी देवाची भेट !!–"

## ११२

तेवढ्यांत नाग्या–कान्ह्यांनीं त्या स्वच्छ सारवलेल्या अंगणांत दोन घोंगड्या अंथरल्या. सदबा पाटील, पंच मंडळी,...सारीं चलबिचल अंतःकरणानें खालीं बसलीं.

" पाटील, आपण आधीं इथं बसून हीं मंडळी देतील तो फराळ करून इथला प्रसाद ग्रहण करूं !–मग हवं तर...या आपल्या साऱ्या बांधवांसहच देवळांत शिरून देवदर्शन घेऊं...नि मग आजचा तुमचा पुढला ठरला कार्यक्रम खुशाल सुरळीत पुढं चालूं द्या !–विचारानें जर तुम्हाला हें सारं पटतंय्...तर मग आज एकादशीच्या पवित्र दिवशींच हें सर्वांत मोठं माणुसकीच्या धर्माचं पवित्र आचारणहि आपण सुरूं करायला कसली हरकत ?–" मोहनराव मास्तर कळवळ्यानें साऱ्यांनाच उद्देशून म्हणाले.

# सत्याग्रह–सत्यनंद !— ३८

## ११३

त्यांच्या त्या रोखठोक सवालानें सगळीकडेच सामसूम झालं...कोणी कांहीं बोलेना–जणूं, त्याक्षणीं साऱ्यांच्या दांतखिळ्याच बसल्या होत्या.

तेवढ्यांत मोहनराव पुन्हां म्हणाले–" असंच करूं या–याक्षणींच, ठरवा काय तें !...एक नवा आचार सुरूं करूं या !—नाही तर आम्हा साऱ्या क्षुद्र अस्पृश्य माणसांना साफ विसरा !–नि तुम्ही सारीं त्या देवाच्या उत्सवासाठीं जा !–हात जोडून विनान्ती करतों मी साऱ्यांना...मला मात्र कसली गळ घालूं नका–"

" मास्तर !–तुमी म्हनतां तें मला समदं पटतं !—पन मी एकटा काय करनार ?" सदबा क्षणभरानें सचिंत चेहऱ्यानें म्हणाले.

" कां बरं ?–मी नाहीं का एकटा ?...एकट्यानें चांगल्यासाठीं सत्यासाठीं आग्रह धरला तर दुसरा आज नाही उद्यां त्याच्यामागें जातोच !–जगांत कोणतंहि नवं चांगलं कार्य सुरवातीला एकटाच करतो !–" मोहनराव गंभीर शद्बांत म्हणाले–" पाटील,–इथं बसून इथल्या या देवांचा प्रसाद ग्रहण करायला तुम्ही स्वतः एकटे तरी आहांत कां तयार ?...बोला !!..."

## ११४

क्षणभरच सदबा घुटमळले; त्यांच्या मनांत मोठा थोरला झगडा झाला; पण शेवटीं ते चांचरत चांचरत म्हणाले..." हो,...तयार हाय् मी !—"

सगळ्या जमलेल्या मंडळींत भयंकर खळबळ झाली. सदबाजवळ बसलेल्या पंच मंडळीकडे पाहून मोहनराव मग पुन्हां म्हणाले—" आणखी कोण तयार आहे ?—"

दोन मिनिटांच्या नितांत स्तब्धतेनंतर दहाबारा जण पुढे झाले !...त्यांत कांहीं सतीचे नि गांवपंचहि होते—



आणि मग, हां हां म्हणतां, सारं वातावरणच बदललं; नाग्या–कान्ह्यांच्या घरासमोरच्या त्या स्वच्छ अंगणांत, पंचवीस स्पृश्यास्पृश्यांची फराळासाठीं एकत्र पंगत बसली. अखेरपर्यंत त्यांत नवी नवी भर पडत होती.

त्या मंडळींना तिथला तो अपूर्व सोहाळा पाहून अचंबा वाटत होता... सर्वांचे डोळे पाण्यानें डबडबले होते.

## ११५

तो सहभोजनाचा समारंभ आटोपल्यावर, मग सारीं मंडळी देवळाकडे निघालीं. मोहनराव, सदोबा· आघाडीला होते...त्यांच्या मागून नाग्या महार कान्ह्या धेड नि त्याचा सारा परिवार—

मग सारीं मंडळी देवळांत शिरलीं; तेव्हां इतर मंडळी निमूटपणें त्या दृश्याकडे टकमकां पाहात होतीं. कांहींच्या मनांत विरोध धुमसत होता; पण तेहि नाइलाजानें गप्प झाले होते.

—आणि मग मोहनरावांच्या पुढाकारानें, सत्याबद्दलच्या त्या न्याय्य आग्रहानें...सुंदर गांवावरचा उरलासुरला डाग धुतला जाऊन, तें तसं अधिकच सुंदर झाल्यावर गांवतल्या झाडून साऱ्या मंडळींनी त्या भक्तिरसाच्या पवित्र सोहळ्यांत, नव्या पवित्र मनांनीं भाग घेतला होता–मोहनरावांचे डोळे आनंदानें चमकले होते. त्या आनंदाचें प्रतिबिंब साऱ्यां गांवकऱ्यांच्या डोळ्यांत पडलं होतं !—

## ११६

समारंभाशेवटीं, मोहनरावांनी स्वतःच तयार केलेला एक नवा अभंग खड्या स्वरांत पण हळुवार पणें त्यांनीं म्हणून दाखवला.

" प्रेमजळीं मन अंतरंग स्नान !...
देवाधिदेवाचें हेंच संकीर्तन !!

नर-देहधारी...हेच खरे देव...
तयांची पूजा...हा भक्ति-भाव !—
तयांचींच घरें...पवित्र मंदिरें !—
देव-अधिष्ठान त्यांत खरें !!—
असा हा अपूर्व पवित्र सोहाळा...
प्रत्यक्ष आम्हीच पाहिला हो डोळां !—
आतां ना कलंक !...अवघेची पवित्र !!
देवमाउलीचे सारे पुत्र-पौत्र !
देह, मन, मती,...सारेंच सुंदर;
सुंदरगावांत देव नाहीं दूर !...
स्वर्ग सोडूनीयां आला देवराया—
आमुच्या हृदयीं सदैव राहाया !—

साऱ्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहात होत्या. त्यांना आपल्या गांवानें आज कसला तरी अभिनव कायाकल्पच केल्यासारखं वाटत होतं.

—गद्गदित कंठ नि अश्रूपूर्ण डोळे यांनीं भांबावून चौफेर निमूट पहात असलेल्या नाग्या, कान्ह्या, सदबा, पंचमंडळी—साऱ्यांचंच एक एकजीव वलय, प्रशांत चेहऱ्याच्या त्या मोहनरावांभोंवतीं पडलं होतं !—

## जिवंत माणसांची रीत !— ३९

### ११७

असेहि कांहीं दिवस, साऱ्यांनी उत्साहानें आपापलं काम करण्यांत



गुंग होऊन, झपाऱ्यानें गेले. पण मग एके दिवशीं एका नव्या कडवट बातमीनें सुंदरगांव भयंकर खळबळलं. मोहनराव मास्तर गांव सोडून जाण्याचा बेत करीत होते...त्यांचं म्हणणं—‘सुंदरगांव आतां बरचसं स्वयंपूर्ण झालंय् ! दुसऱ्या एखाद्या खेड्यांत जाऊन मी कामाला लागलेलं बरं !’

ती आपली जाण्याची इच्छा मोहनरावांनी हळूंच सदबाकडे दर्शवली होती; त्यांनी तें पंचांना सांगितलं होतं; पंचांतहि एकच खळबळ उडाली होती—“कांहींहि झालं तरी आतां मोहनरावांना हातचं सोडायचं नाहीं !—” एवढ्यानेंच काय होतंय् ?...आम्हीं तर आसपासचीं पांचपंचवीस गांवं एकत्र आणणार आहों !—आतां आम्हाला मास्तरना मोकळं करतां येणार नाहीं !” असं सारा पंचवर्ग एकमुखानें बोलला नि या कामीं मास्तरांचं मन वळवण्याच्या कामाचा सारा भरिभार त्यांनीं सदबा पाटलांवर टाकला.

तात्यांजवळ बसल्या बसल्या मंजीनेंहि त्यांना तें सांगितलं; तेव्हां ते हळूच गालांतल्या गालांत हसले...कारण, गेले पांच सहा महिने तात्यांच्या मनांत कांहीतरी नवंच एक घोळत होतं !—

### ११८

गेलीं अडीचतीन वर्षं, मंजी दुपारच्या शाळेंत जाऊन शिकायची; तिच्यांत बुद्धीची उचल चांगली, हौस फार...तिनें वाचन-लेखन, हिशेब, साधींसुधीं गणितं...गाणीं, गोष्टी, सारं कांहीं भरभर हस्तगत केलं होतं. त्यामुळें समाधान वाटून मोहनराव मास्तरहि तिला सकाळसंध्याकाळ वर्गाबाहेर जास्त माहिती सांगत; तिला इच्छा असली तर अधिक शिकवत—निरनिराळ्या विषयांची विविध माहिती देत.

मास्तर कधीं कधीं सदबा पाटलांनाही कौतुकानें म्हणत—“पाटील, हां हां म्हणतां शिकत जाणार बघा, मंजी तुमची! आंतूनच इच्छा आहे तिला तीव्र ! दीडदोन वर्षांत जवळ जवळ पांचवी-चवथीचा अभ्यास उचललान् तिनं, माझ्यामागें लागून—”

त्यांच्याकडून व सदबांकडून तात्यांच्याहि कानावर हें आलं होतं. हल्लीं दोन वर्षे तर मंजीच तात्यांना वर्तमानपत्र वाचून दाखवायची ! नि वाचतां वाचतां कुतुहलानें मोठे चुणचुणीत प्रश्न विचारायची !

११९

" मास्तर चालले म्हणे-" अशी सदबांनीहि जेव्हां तात्यांकडे आज तक्रार केली, तेव्हां गालांतल्या गालांत हसून तात्या म्हणाले-" अरे सदूऽ, अगदींच कसा रे तूं शंभो ! तो एकटा जीव तुझ्या एकाच खेड्यांत-खोड्यांत पडल्यासारखा-वर्षानुवर्षं राहील तरी कसा, सांग ? "

" पन मग करायचं तरी काय म्हनतां, आमी ?" सदबा अगतिक होऊन म्हणाले. " आमाला तर मास्तर हित हवे हायेत कांही दिस... "

" अगदीं सोपं आहे तें! त्यांच्या पायांत बेडी घाल कीं एक, गोडशी !" तात्या मिस्कीलपणें हंसत म्हणाले.

मास्तरांनीच दिलेलं एक पुस्तक वाचत मंजी बाहेरच्या दारांत बसली होती. तात्यांचे ते शद्ब कानीं पडतांच ती उठून घरांत गेली. तें तात्यांच्या दृष्टींतून सुटलं नाहीं. सदबांनीं गोंधळून विचारलं, " म्हंजे-?"

" पाहिलंऽस !-अजूनहि नाही ना आलं तुझ्या ध्यानीं !-फारच सरळ बा तूं !-अरे—मोहनराव कुळशीलवान् मराठा, सुशिक्षित, हुशार, प्रेमळ, रुबाबदार तरुण आहे !—त्याचा आपल्या गांवावर लोभ आहे !...गांवाला तो पाहिजे आहे !—कबूल आहे ना तुला हें ?...पुन्हां...शिष्य म्हणून मंजी त्याला फार पसंत पडलीय्, म्हणून तूंच ना म्हणतोस माझ्याकडे वारंवार ?- मग आतां मोहनरावाला म्हणावं—' तिला आपली तूं आपल्या पदरांतच घे कशी ?—लग्नानंतर तिला खंडीभर का शिकवीनास म्हणावं तूं !-आमचं कांहीं म्हणणं नाही !—' हें बघ सदू, मी सांगतों घे तुला !...जन्मांत तुला मोहनरावहून चांगला जांवाई मिळायचा नाही, बघ !—"

## नवा संसार !



१२०

तात्यांच्या त्या कल्पनेनें प्रथम सदबा गोंधळले; पण मग सारं एकदम पटून आनंदलेहि. 'आपल्याला कधींच कसं हें सुचलं नाहीं ?' याचंच त्यांना मग आश्चर्य वाटलं !-

तेवढ्यांत तात्या पुढें म्हणाले-" ही तीन यत्तांची नि धर्मशाळेंत भरणारी तुमची शाळा-गांवाला किती रे दिवस पुरणार आतां ?-भीक का लागलीय् आपल्या गांवाला ?-एवढी नाही आपल्याला ताकद-हिंमत ?— आतां एक छोटीशीं शाळा बांधू या,...सहासात यत्तांपर्यंतच्या सोयीची ! नवी इमारत उठेपर्यंत आपलं हें घर आहे, अंगण आहे एवढं ऐसपैस !-आणखी दोन तीन नवे मास्तर आणूं निवडून;...काय ?—तुमच्या सती समितीकडे जास्त पैसा नसेल,...तर मी देतों दोनअडीच हजार !—मग सारं झालं कीं नाही ?-एवढं सारं झाल्यावर;...मुंबईला जायच्या गोष्टी काढतो का बघूं या बरं...मोहनराव, बेटा !—"

एवढं बोलून तात्या अगदीं दिलखुलास हंसले. सदूलाहि आनंदानें नि नव्या हुरूपानें अस्मान क्षणभर ठेंगणं वाटलं !

" तुमीचं येवढं मनावर घेतल्यावर काय होनार नाय्, तात्या ? देवाचीबी मदत होईल आपल्याला या बाबतींत !" सदबा खुलून म्हणाले.

" अरे, आपल्या नव्या कॉंग्रेस सरकारला हें असलं प्रत्येक गांवांतच हवंय् !- शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा त्यांनीं कायदा काढला; त्यांना पोटाला मिळायला कुळकायदा काढला. हळूहळू जमिनीहि साऱ्या कसणाऱ्या शेतकऱ्यांच्याच मालकीच्या होणार आहेत ! सदूऽ, अरे आतां आमचे पूर्वींचे सावकारी पाशाचे दिवस चालले ! तेव्हां शेतकऱ्यांना शिकवायसाठीं शाळा काढायला आपल्या सरकारची आम्हांला मदत यापुढें नाहीं होणार,...तर केव्हां नि कोणाची व्हायची ?"

—आणि झालं!...त्याच दिवशीं त्याच बैठकींत सारं ठरलं. शाळा मोठी करायची; तिला तात्यांनी सुरवातीची सारी मदत करायची!—शक्य तितक्या लौकर तात्यांनीं इमारतहि बांधून द्यायची. सदबा म्हणाला—"शाळेचं नवं नांव—'आनंद—माय—मंदिर"

—गांवांत शाळाच नको म्हणणारे पूर्वीचे तात्या!—आज असे एकदम स्वतःच आपणहून शाळा बांधून द्यायला ते पुढे सरसावत होते!—त्यांनीच हा सारा नवा पुढाकार घेतला होता!...किती अकल्पित!...

काळाच्या उदराचा ठाव घेणं असं अगदीं अशक्य असतं!...

## १२१

सदबामुळें तात्या सुखी झालें होते;...आपल्यामुळें आतां तोहि सुखी व्हावा, असं तात्यांना मनापासून वाटूं लागलं होतं!—पण गांवच्या हितांत सदबा सुखी!...आणि सदबा सुखी तर तात्या सुखी!—म्हणून कां होईना, तात्यांना गांवच्या हिताची नि तशा मोठ्या शाळेची ती तळमळ लागली होती!—

तेव्हां शेवटीं, तात्यांनीच मोहनराव मास्तरांना माईकरवीं संध्याकाळीं बोलावलं; नि त्यांच्यापुढें ती गोष्ट हळूच काढली. मंजीच्या लग्नाचं पुण्याहवाचन होतं तें!—

"आपण तर दरिद्री—सेडफटिंग!... ना आपल्याला मोठं नातंगोतं ना ठावठिकाणा—" अशी मोहनरावांची कुरकुर तात्यांनी निमूट ऐकली.

आनंदबाळाला धावतां धावतां धरण्याच्या निमित्तानें, त्याचवेळीं मंजी तिकडे दबदबा धांवत आली. मास्तर व तात्या हे दोघे बोलत बसलेले पाहून तिनं एकदम लाजल्यासारखं केलं. पदर सावरत मास्तरांकडे हळूच लाजून पहात ती झटकन् घरांत पळाली.

मधल्या काळांत मास्तरांच्या मनाला आपल्या आकर्षक चेहऱ्यानें, गोड स्वभावानें, नैसर्गिक हुषारीनें नकळत मंजीनें एक गोड ओढ लावली



होती. त्यांतच तात्यांचा तो प्रश्न,...मंजीचं त्याच सुमारास तिथं येणं,...लाजत लाजत आंत पळून जाणं...

मास्तरांचा तर भयंकरच गोंधळ उडाला; पण ते मनांतल्या मनांत किंचित आनंदितही झाले.

तरी पण त्यावेळी ते अखेर कांहींच बोलले नाहींत.

## १२२

पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं सदबा पाटलांनीं मुद्दाम येऊन त्यांना विचारलं..."तात्यांनीं सांगितलं—विचारलं कां, मोहनराव?"

"हो!" मोहनराव हळूच म्हणाले—

"मग काय ठरलं तुमचं?" सदबांनीं गोंधळल्या मनानें विचारलं.

"कशाबद्दल?" मोहनराव सरळ उत्तर टाळत होते.

"मंजीबद्दल माज्या; हितंच कायम ऱ्हान्याबाबत, तुमच्या!" सदबा चांचरत चांचरतच म्हणाले.

"बरं—मी तुमच्या, गांवाच्या,...आज्ञेबाहेर नाहीं, पाटील!" मास्तर लाजत हसून अस्पष्ट शब्दांत म्हणाले.

सदबांचे डोळे आनंदानें आर्द्र झाले.

मंजीला तें समजल्यावर तिचे मोहक डोळे उत्सुकतेनें चमकले.

१२३

सुंदरगांवच्या नव्या शाळेचा उद्‌घाटन-समारंभ नि मंजी-मोहन लग्न-दोन्हीं जवळजवळ दोन दिवसांच्या अंतरानें व्हायाचीं होतीं.

सदबा पाटील नि तात्या दोघांच्याहि आग्रही निमंत्रणामुळें देव हजर राहणार होते. ते आतां-' प्रांत ' झाले होते. तरी पण सदबांच्या साध्या गरीबाऊ निमंत्रणाचा त्यांनी आनंदादरानें स्वीकार केला.

गांवांतल्या त्या आनंद-उत्सवाला त्या आठवड्यांत अगदीं पूर आला होता. लग्न-समारंभ साध्या पद्धतीनें फारसा गाजावाजा न होतांच पार पडला. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं तात्यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेंत नव्या शाळेच्या इमारतीची कोन-शीला बसणार होती. तिला देवांचा पहिला हात लागणार होता !—

१२४

ती गांवच्या विद्या-मंदिराची—' आनंद-माय-मंदिरा ' ची-मुहूर्त-मेढ घातल्यावर, देव उभे राहिले; नि गांवकऱ्यांना उद्देशून म्हणाले'-'मित्रहो, तुमच्या गांवाची ही गेल्या सहा वर्षांतली द्रुत प्रगती पाहून,...मला किती आनंद होतोय् म्हणून सांगूं? या सर्व यशाला कारण तुमचा उत्साह...तुमची नवी दृष्टि !—म्हणूनच तर तुम्हाला ही नवी सृष्टि बनवतां आली !-सतीनें विहीर-धर्मशाळा दिली;-सदबा पाटलांनी आपल्या गरिबींतहि भूमीदान केलं...गांवाला छाया केली !-कर्ज-पत-पेढी, धान्य-खजिना, साक्षरतावर्ग, मंदिरप्रवेश... या सगळ्यांतच मी पाठवलेल्या मोहनरावांनी तडफेनें, आस्थेनें, समरसतेनें तुम्हाला मदत केली; याबद्दल मला समाधान नि अभिमानच वाटतोय्. तात्या पाटील तर आतां तुमची शाळा बांधून कायम व मोठी सोय करीत



आहेत !-तुमच्या गांवचे एक नवे माननीय गांवकरी मोहनराव—त्यांना त्यांच्या कार्यांत खरा हातभार लावायला...ही मंजीताई कालपासून सप्तपदी चालून पुढे सरसावली आहे;..सारं सारंच अत्यंत आनंदानें भरलेलं आहे हें वातावरण ! हं...नांदा सौख्यभरें !—पण माझी इच्छा अशी आहे, कीं,...ही आनंदाची चढती कमान इथंच थांबणार नाही !—मंजीताई पुढें शिकेल, आपला संसार करीलच;...पण हीच चिकाटी कायम ठेवून, लौकरच ती नर्स झाली... तर इतरांच्या संसारांनाहि ती हातभार लावील. ती स्वतः आदर्श माता होईल-नि इतर मातांनाहि आदर्श माता करील !...त्यांच्या मुलांचं खरंखुरं संगोपन करील !-मग सुंदरगांव याहून आणखी सुंदर तो कसा होणार ?-तो साक्षात् स्वर्गच ठरेल !—समाजांत वर्ग-युद्धं धर्म-युद्धं आहेत, म्हणे !—पण मला सांगा-ज्या गांवांत पूर्वींचेच तात्या नि सदबा पाटील एका घरांत राहातात;...ज्या गांवांत स्पृश्यास्पृश्य एकाच देवाजवळ बसून एकमेकांकडून त्याचा नैवेद्य भक्ति-भावानें चाखतात;...जिथले अल्पसंख्य मुस्लीम भाई -बाहेरील विषाची बाधा न होतां-हातांत हात घालून, धर्मापेक्षां आपल्या ग्रामिण बांधवांवरच निश्चित विश्वास टाकून, स्नेह-प्रेमानें राहात आहेत;... जिथं गांवाचं सारं वैभव या तुमच्या पत-पेढ्यांत नि धान्य-खजिन्यांत साऱ्यांच्या जरूरीसाठीं एकत्र भरून राहिलंय्;..तिथं वर्ग-भेद धर्म-भेद वाढणार तरी कशाला ? नि वर्ग-युद्ध धर्म-युद्ध होणार तरी कशाला !!—"

१२५

देव आणखीहि पुष्कळ बोलले; त्या नव्या जोडप्याचा जाहीर सत्कार करून, त्यांच्या जबाबदाऱ्या व त्यांच्याकडून गांवकऱ्यांनी करावयाच्या अपेक्षा-यांचाहि त्यांनी उच्चार केला; नि शेवटीं ते खालीं बसले—

तात्यांनी दिलेल्या शाळेच्या देणगीचा उल्लेख करतांना, त्यांच्या त्या मागल्या आसुरी महत्वाकांक्षेचा, कारस्थानांचा, व दुष्टाव्याचा देवांनी चुकून उल्लेखहि केला नाहीं; यामुळें (तें अनपेक्षित नसलं तरी) तात्यांना

आपल्याच मनाच्या सहस्र इंगळ्या डसल्या!...पण 'झालं गेलं, गंगेला; आपले डोळे उघांला!—' हें सदब्रांनी सत्रादां सांगितलेलं तत्व आठवून, तात्यांना त्या क्षणीं हायसंच वाटलं; सदब्रांबद्दल प्रेमहि वाटलं.

देवांना हार पडले. टाळ्यांचे कडकडाट पडले; तेंव्हांच कुठं तात्या आपल्या त्या विचारांतून भानावर आले—

एक काळ असा होता, कीं, तात्यांना देवांचं देवपण असह्य, अनैसर्गिक वाटे; आज मात्र तात्यांच्या मनांतच देव जागा होता. म्हणून आदारानें त्यांना त्यांच्यासमोरचे ते देव साक्षात् देवासारखेच वाटले.

मग त्यांच्याहि गळ्यांत एक छोटासा हार पडला; तात्या क्षणभर संकोचले. पण मग, आपल्या (गळ्यांतील पूर्वी सापाच्या वेटोळ्यासारखी वाटणारी) ती पुष्पमाला...आतां अगदीं कोमल, सुगंधी व पवित्रच भासली. त्या सुगंधी स्वर्गीय स्पर्शानें त्यांचंहि सुमन विकसलं !—

## नवें जग—नवे देव !— ४२

### १२६

असेच महिने जात होते—

—आणि मोहनराव मास्तरांची सुंदरगांवची ती शाळा आतां अगदीं आसपासच्या पंचवीसचाळीस खेड्यांत सर्वतोमुखीं झाली होती.

सर्व गांवकऱ्यांनीं आपल्या श्रमांचे तीनतीन दिवस देणगी दाखल गांवाला अर्पण केल्यामुळें, कल्पिलेली इमारत सदू-तात्यांनी वर्षभरांतच पुरी



केली होती. गांवांतली नि आसपासची मिळून सव्वाशें दीडशें मुलं तींत ऐसपैस बसत असत. शिवाय, तिथल्या इतर सामाजिक व्यापांचेंहि तें केन्द्र झालं होतंच. सुंदरगांवची सहकार-पत-पेढी, धान्य—खजिना, मध्यवर्ती धंदा—प्रसारक व दलाली केंद्र, ग्रंथालय व फिरतं वाचनवर्तुळ, इत्यादि अनेक व्यापांबरोबर तेथील छोटेखानी रोगाचिकित्सालय, वगैरे सर्व गोष्टींमुळें सुंदर-गांव हें आतां एक देवाण—घेवाणीचं, बाजारहाटाचं नांवाजलेलं केंद्र बनलं होतं.

एकदां ज्या आंब्याच्या झाडावरील कुऱ्हाडीच्या घावावरून गांवांत खळबळ उडाली, ज्याच्यामुळें गांवांत दूही-दुफळीची बीजं फिरून एकदां माजण्याची शक्यता उत्पन्न होत होती,...त्याच झाडाखालच्या आंबाईच्या त्या उघड्या देवळालाहि अतिशय न्यारं असं महत्व प्राप्त होत होतं.

देव आपल्या दैवी गुणांसह स्वतःच प्रत्यक्ष गांवांत—गांवच्या गृहा-गृहांत—नांदू लागल्यावर, वेशीबाहेरच्या देवाकडे लक्ष तरी कोणाचं जाणार आतां?—गांवांतच देव, तेंव्हां गांवच्या वेशीपर्यंत आणखी जाऊन मुद्दाम देवाच्या दारीं उभं राहण्याची कोणा गांवकऱ्याला क्वचित्‌च आठवण व्हायची!

### १२७

पण सुंदरगांवचं खरं देऊळ आतां निराळंच झालं होतं! शाळेसाठीं बांध-लेल्या नव्या इमारतीचा तळचा भव्य हॉल,...हेंच तें त्यांचं आजचं देऊळ !—त्या पवित्र 'ज्ञान-मंदिरां'त, गांवचा प्रत्येक लहानथोर,...दिवसांतून एकदां तरी या ना त्या कामासाठीं जायचाच जायचा !—कारण ?...

कारण,—त्यांत सार्वजनिक मोफत वाचनालय व ग्रंथालय होतं; त्यांतच जाहीर व्याख्यानांच्या सभा होत; त्यांतच बँकपेढी; धान्य—खजिना कचेरी; तिथंच ग्रामोद्योग—शिक्षण—संघ व केंद्र; तिथंच सती—समितीचं पंच-मंडळ, ग्राम-समिती, 'आनंद-माय-मंदिर' समिती, इत्यादींच्या सभा भरत; तिथंच प्रौढांची बिनवेळापत्रकांची नि बिनपुस्तकांची ज्ञान—शाळा भरे;

आणि तिथंच देवांनीं उद्घाटन्-सभेअंतीं दिलेल्या पांचशेंच्या थैलींतून विकत घेतलेला मोठा रेडिओ असे. त्या नव्या न्याऱ्या देवळांत जायला स्पृश्यास्पृश्य, हिंदु-मुस्लीम कोणालाहि मज्जाव नसे. प्रत्येक न चुकतां दररोज हजर रहायला अगदीं उत्सुक असे. गांवकऱ्यांना जें कांहीं नवीन सांगायचं, तें तिथंच उभं राहून मोहनराव सांगत—

मोहनरावांच्या रोजच्या उत्साही घोषणांमुळें व त्यांनी स्वतः घालून दिलेल्या उदाहरणांमुळें सुंदरगांवानें अलीकडे एक नवाच चंग बांधला होता—"या गांवांत कोणी मद्यपि नाहीं—कोणी रोगी दुबळा नाहीं—कोणी निरक्षर नाहीं—कोणी गरजू हतबल ऋणको नाहीं—कोणी स्वार्थांध, मत्त धनको नाहीं—अर्थात् कोणा सावकाराचा मृत्युपाश नाहीं—कोणी अस्पृश्य नाहीं—कोणी अनाथ अज्ञान नाहीं—कोणी मानवी पशू नाहीं—सारीं जिवंत, सुसंस्कृत, निरोगी माणसंच !—कोणी कोणाचा दुष्मान नाहीं !—सारीं सारीं प्रभूचींच लेकरं ! सारे भाऊ भाऊ !!—आम्हाला पिसाट धर्म नाहीं !...आमचा धर्म एकच—माणुसकी !...आमचं ध्येय एकच—आदर्श माणुसकी !!—"

१२८

नि म्हणूनच एक वर्षापूर्वी 'ब्रह्नमहाराष्ट्रांतील पहिल्या नंबराचं आदर्श खेडं' म्हणून त्याला सरदार पटेलांनी स्वहस्तानें सुवर्ण-पदक दिलं !—आमचं सारं मंत्रि-मंडळहि त्यावेळीं उपस्थित होतं.

तो समारंभ झाला, त्यावेळीं, जवाहरलालजींचा शुभाशिर्वादांचा संदेश आला होता. महात्माजींचं तर स्वतःच्या हस्ताक्षरांत मराठींत पत्र आलं होतं.. त्यांनीं थोडंसंच लिहिलं होतं...पण साऱ्या साक्षर गांवकरांनी स्वतःच्या डोळ्यांनी तें वाचल्यावर, त्यांचे डोळे...आदराच्या, कृतज्ञतेच्या व स्वाभिमानाच्या अश्रूंनीं डबडबले होते !—

बापूजींच्या पत्रांतला तो मजकूर तर जणूं आबाल-वृद्धांना अखेर पाठच झाला होता. त्यांनी आपल्या कांपऱ्या हस्ताक्षरांत लिहिलं होतं—



"पाटील सदाशिव—

तुमचें सर्वांचेंच सदा शिव होवो !.... तुमच्या सुंदरगांवांत सर्व सुंदर असो;...तेथें सर्व सत्य असो !...माझ्या कल्पनेतला आदर्श हिंदुस्थान,...म्हणजे असलींच लक्षावधि सुंदर गांवें !....मनगट, मन व मान पणाला लावून, दुसऱ्याला सुखी करण्यासाठीं अहर्निश झटण्यांतच स्वतःचें सुख मानणाऱ्या प्रत्येक शेतकरी—कामकऱ्यांत नवभारत वास करणार, हें ध्यानीं बाळगा;...सोन्याची नर-काया झिजवा;...पृथ्वीवरील चिखलांतून सोनें पिकवा !...सदैव मनांत खरी सहिष्णुता बाळगा...क्षणभर झटपट यशस्वी झाल्यासारखी वाटणारी हीन हिंसा बलवान अहिंसेनें जिंका !... आपला सर्वांत मोठा धर्म...माणसाचा धर्म !...सर्वांत मोठा देव—सत्यदेव !—त्या देवाचेंच आपण सारे पाईक !...त्याचें त्याच्यासाठींच राज्य तेंच माझें रामराज्य !...तें रामराज्य तुमच्या सुंदर गांवांत सदैव असो-

—बापूजीचा आशीर्वाद."

## नवे पाश !— ४३

१२९

तात्या-सदबांच्या जुन्या पिढीच्या आयुष्यांत आतां कसला आणखी फरक पडायचा ? सदबा पुरा साक्षर होऊन कार्यांत तत्पर !...तात्यांच्या घराभोंवतालचा बाग फुललेला !-तोच साऱ्या गांवची गजबजलेली नवी कर्मभूमी !

संवयी संवयीनें तात्या काठीच्या आधारें ‘ ज्ञान मंदिरा ’पर्यंत अगर शाळेभोंवतीं हळूं हळूं फिरत. कधीं दुपारीं वामकुक्षीनंतर जागें झाल्यावर, ते जवळच्या गजबजीनें एकदम गोंधळत. कां कोण जाणें, दारांत येऊन सभों-वार कावरंबावरं पाहूं लागत.

गांवच्या आया-बायांनी गजबजलेली ती सतीची विहीर;..स्वस्थ बसलेल्या गुरांच्या कळपाला छाया करणारी ती आंबाईच्या आंब्याची छाया;...बाल-गोपाळांच्या कोमल-कर्कश लहान-मोठ्या आवाजानें गगबजलेली समोर भरलेली ती शाळा—

तो सारा नेहमीचाच देखावा !...पण तात्यांच्या बदलल्या दृष्टीला अगदीं रोजच्या रोज तो नवनवीन वाटे...

असे निश्चल उभे राहून एकाग्र नजरेनें तात्या पाहात असतांना कधीं कधीं मागून माई हळूच येत—“ एवढं पाहणं तरी कसलं चाललंय् ? चहा नाहीं का घ्यायचा ?-निवून चालला...”

ते एकदम दचकत, मागें वळत व माईकडे हसून पाहात—नि मग म्हणत—“ पाहातों आहें ही तुझी पुण्याई !—सदूची माणुसकी...आपल्या आनंद बाळाचा पायगुण !!—गांवांतील सावकारी पाश नि त्यांनीं गुंफलेलीं दुःखं आतां गेलीं!—हें समोर सभोंवार दिसतंय् तें प्रेमाचं जाळं;...नवे पाश !—हं...हें जग कांहीं और...निराळंच आहे !...जसं काय एखादं स्वप्नच पडल्यासारखं वाटतंय् मला...हें !!—”

माई सौम्य हसत; तात्यांच्या त्या अभिनव वागणुकीमुळें व त्यांच्या तसल्या पश्चात्तप्त कृतज्ञ उद्गारांमुळें माईंची कालवाकालव होई; त्या साध्वीला आपलं हृदय भरून आल्यागत वाटे. मग क्षणभराच्या निःशब्दतेनंतर त्याहि सानंद म्हणत—“ हं... आहे खरं !—पण...खरं म्हणजे,...मी म्हणतें,... ही सारी मिरा-सतींचीच पुण्याई !!—”

## नवे नागरिक! ४४

### १३०

या मावळत्या पिढीच्या मिश्र प्रशांत आनंदापेक्षां सुंदरगांवच्या नव्या उगवत्या पिढीचा उत्साह-आनंद तर अधिक जोरकस...अधिक खेळकर... अधिक स्वैर...अधिक कार्यक्षम !—

त्या नव्या ‘ आनंद-माय-मंदिरा’चा नि ‘ विद्या-मंदिरा’चा तो तडफदार उत्साही, तरुण, सरस्वतीभक्त चालक— मोहनराव !— जात्याच प्रेमळ,, उत्सुक, कल्पक अशी आपल्या पतीइतकीच सुशिक्षित, कार्यतत्पर नि समर्थ होऊं पहाणारी— त्याची ती नूतन पत्नी— मंजीताई !...

साऱ्या नवीन विचार— बोधामृताचा आधीं आपल्या हृदयांत सांठा करून, तें जोडपं तिथं जमणाऱ्या चिमण्या पांखरांच्या इवलाल्या चिमण्या चोंचींत त्यांतले निवडक थेंबथेंब हळूच सोडीत आहे; आणि ते थेंब उत्साहानें आकंठ पिऊन, ते नव्या विचार—आचाराचे नवीन बालवीर, नवीन जगाच्या नव-नागरिकत्वाचं निरोगी बाळसं अंगावर प्रतिक्षण घेत आहे!...

सुंदरगांवांत नवं न्यारंच सुंदर जग निर्माण होण्याच्या मार्गांवर आहे !—

### १३१

तेव्हां...असा हा आज दिसतोय् तोच आमचा सुंदरगांव!—

तो पूर्वी तसा होता...आतां हा असा आहे !—

त्यांतलीं पूर्वींचीं माणसं तशीं होतीं; नि आज दिसताहेत तीं हीं अशीं !...आम्ही साधींसुधीं खेडवळ माणसं !!...

निसर्गदत्त डोंगर, आमचा ओढा—आजही तो इथं अजून पूर्वी प्रमाणेंच लोकसेवेचं व्रत्त अखंड आचरत आहे. निसर्ग रचना म्हणजे तशीच असते—अव्याहत,—नित्य, अखंड !— इथं होती ती मधली हीन मानवी

रचना! ती मात्र मानवांनीच स्वपराक्रमानें साफ पालटली. नव्या विचारांच्या खत-पाण्यावर इथं आतां नवे अंकुर रुजले आहेत; रुजत आहेत!...

नव्या दृष्टीच्या मोहनरावांनी त्या नवीन मनांच्या बालकांना, आजच्या नवीन पद्धतीचं शिक्षणदान करायचं ठरवलं आहे; तें देण्यासाठीं, अनेक नवे धडे तयार केले आहेत;–प्रत्यक्ष अनुभवाशीं...भोवतालच्या जीवनाशीं ते सारे धडे पूर्णपणें निगडित असले पाहिजेत, असं त्यांचं विचारांतीं पक्कं झालेलं मत!

मंजीनें आजच ही एक त्यांत नवी भर टाकली आहे. असलं प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेलं ज्ञान मनांत पटकन् रुजतं–असं मंजी–मोहनरावांना खात्रीनें वाटतं–

तेव्हां, तो पद्दा-तात्या-माईंचा चौथींतला आनंद!..तो नवा नागरिक!–मंजीनें लिहिलेला तो नवा धडा मोहनरावगुरुजींना तो घडाघड वाचून दाखवीत आहे—बाकीचीं बाळं कान टवकारून ऐकत आहेत.



१३२

मंजुळ बोल—१ –आमचं गांव–

एक होता छोटा गांव--
रंकां–रावां मोठा ठाव!...
ओढा...तुडुंब भरलेला;....
—नि डोंगर सुंदर नटलेला!....

डोंगर पुरवी लांकुड–फांटें;...
नि वई--वाड्या–साठीं कांटे!...
डोंगरावरची मऊ माती...
नि ओढ्याकाठीं विपुल शेती!...

तरिपण नव्हतं समाधान....
याची...त्याची खालीं मान!...
'झाली घरदाराची माती!...'
—प्रत्येकाच्या पोटीं भीती!!

१३३

असं कां?....हें असं कां??..
पुढली कथा आतां ऐका!..

कांहीं चापती पोळी-तूप—
—पण गांवीं माजला चिखल खूप!..
एकटा दुकटा धडपडे;....
कोणी दीनवाणं रडे;....
...कोणी तर चिखलांत पडे!...

गांव ज्यानें असा दुर्बल,...
कोणी केला एवढा चिखल?...

खरी जाणीव तरी कोणाला?...कीं, तो चिखल माणसांनींच केला!...
चंद्रा ग्रासे केतू...राहू!...—पण मग लागे वारा वाहूं!...
चिखलामधें प्रखर ऊन!... गेलं रखरबलेलं सुकून!..
पाय ठेवायला झाला धीर!..., साधासुधाहि बनला वीर!...

अघटित घटना घडली कशी?
त्यांचिच कहाणी ऐका..अशी!—



१३४

गांवीं झाली पहिली सती—स्वता आगींत होरपळली ती!....
तिनें काढलं राखेंत मोती—आणि तें दिलं गांवाहातीं!...

मग गांवाला भेटला नेता—
—देवच जणूं शहाणासुर्ता!..
त्यानें पाहिला गांवचा चिखल!
—नि शहाणपणाचा केला खल!
तेव्हां बांधला साऱ्यांनी चंग!—

—प्रत्येक...प्रयत्न करण्यांत दंग!—
पुढें, गरीब कर्ण पुढें आला—
नवं जीवन देता झाला!—
मागून आली साध्वी माई—
शत्रू झाले भाई-भाई!!—

तिनें तर केली पुरी मात—
कठोर सावकार झाला तात!--

१३५

फुलला मग,..बाग !..सारे भाई !!..
लहान थोर गाणं गाई...
' गेला रे चिखल धुवून !..
...आला रे गांव फुलून !!—'

चिखलांत मग कमळं फुललीं !...
साऱ्यांचींच तोंडं खुललीं !!—
कमळंच हीं कांहीं-(मोहक नि नवीं !)
पण आम्हाला तर आणखीं आणखीं हवीं !!-

आमचा असा एक सुंदर गांव—त्याचंच नांव सुंदरनांव !...
अभिमानानें उन्नत मान—उत्साहानें गातो गान—

—आणि मग म्हणतं...कोणसं—
'अशिं आम्हि खेडवळ माणसं !!-'

— समाप्त —

— ओ ळ ख तां ? —

रघुवीर सामंतांची

उपकारी माणसं

१ प्रवासांतील सोबती
२ अभ्र — पटल
३ आकाश — गंगा
४ घरोघरच्या देवी

तुम्हाला परिचित आहेत कां !

एकूण सुमारें ११०० पानांची
चार स्वयंपूर्ण खंडांची

महाराष्ट्राची पहिलीच
प्रदीर्घ सामाजिक कादंबरी

[ संपूर्ण गटाच्या ग्राहकास विशेष सवलत ]

अँटिक कागदावर छापलेली
एकत्र आणि कापडी
वाचनालय प्रत तयार होत आहे.

— ओळखीचीं वाटतील —

—रघुवीर सामंत संपादित—

★

अमर ज्योति वाङ्मय

★

आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या !

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवाङ्मय


# आम्ही खेडवळ माणसं

## [--मार्गदर्शन—]

I

### — रस ग्रहण —

१

पुस्तकाच्या अनुक्रमणिकेंतील प्रकरणांच्या नांवांचा क्रम व प्रत्येक नांवातील वैशिष्ट्य व सुचकता जातां जातां ध्यानीं घ्या.

अर्पण-पत्रिकेंत कोणकोणत्या गोष्टी ध्वनित केल्या आहेत ? कोणतीं ध्येयें व कोणकोणत्या व्यक्ती दिव्य आहेत असें लेखकाला सुचवावयाचें आहे ? पुस्तकाला अर्पण-पत्रिका जोडण्यांत कोणकोणते हेतु असतात ?

कथानकाला सुरवात ‘ ळळळळत्या ज्वाळा ’ या प्रकरणापासून होते. मग ‘ मोहनचं पत्र ’ व ‘ गांवच्या वेशीपाशीं ’ ह्या दोन ( आधीं टाकलेल्या ) प्रकरणांची आवश्यकता व योजकता कोणती ?

२

पापाचं जळतं कोठार कोणतं ? मानवता आपल्या अस्तित्वाची पताका उंच कशी करीत होती ? त्या गांवांतली धुमसती आग कोणती ? लखपतीच्या घरांत गांवकऱ्यांचे श्रम, घाम नि प्राण कुजत होते म्हणजे काय ?

‘ केवळ धनानें मानवाला सुख-समाधान मिळत नसतं जगांत ’ ह्या कल्पनेचा विस्तार करा. जळू, खरूज नि धनको यांत साम्य कोणतें ?

मिरेच्या जीवाला घरघर लावणाऱ्या जागेत पडलेला अखेरच्या दिवसाचा प्रसंग थोडक्यांत स्वतःच्या शद्धांत लिहून दाखवा.

३

निसर्गाचा व मानवाचा व्यवहार यांत कोणता जमीनअस्मानी भेद दर्शवला आहे ? शहर व खेडें यापैकीं ‘माणसाच्या मनगटा’ची जास्त

आवश्यकता कुठें असते ? मानव म्हणणारे दानव कोण ? त्यांनीं सुंदरगांवाचा सुंदर नकाशा कसा बदलला ?

धनिकपणा गेला कीं मनुष्य गुलाम कां होतो ? धनिकतेचा महिमा पंकज कसा असतो ?—

सुंदरगांवच्या वेशीजवळच्या देवळांतील संध्याकाळचा देखावा स्वतःच्या शद्बांत रंगवा. तात्यांच्या वाऱ्यानें गांवकरी मानवांचे एका क्षणांत दगड कसे होत ? का ? ही शक्ती कशांत होती ?...

तात्यांच्या घरीं जगांतले दोन्ही ध्रुव कसे दिसत ? ते कोणते ? कोणत्या अर्थानें ? आपल्या 'सिंहासना'वर बसलेल्या तात्यांचं वर्णन करा. तात्यांच्या व माईच्या सिंहासनांतील अफाट फरक तुमच्या शद्बांत स्पष्ट करा.

४

सदू कर्जाच्या खाईंत कसा रुतला ?...त्यानें परिस्थितीला प्रामाणिकपणें तोंड दिलें; तरी देखील तात्या सावकार त्याच्याशी तसे का वागले ? सदूवर त्याचा काय परिणाम झाला ?—पोरीच्या डोळ्यांत अश्रू का आले ? मंजी जेवतां जेवतां वांसरासारखी मुरकत हसत कां होती ?

मंतरलेला बुडकुला कोणी कोणाला दिला ? त्यांत मंत्र कसला होता ? त्यानें सदूचें कल्याण कसें झालें ?-सखूचा स्वभाव कसा होता ?

सदूनें कर्ज कसें फेडलें ?—त्यावेळच्या मुलाखतींत त्यानें तात्यांचें सारें कर्ज फेडलें म्हणूनच उलट तात्या त्याच्यावर चिडले !-का ? सदूला कोणत्या देवीनें कसला प्रसाद दिला ?

माणसाला स्वप्नें का पडतात ?-मंजीच्या स्वप्नावरुन मंजीच्या डोक्यात कोणते विचार चालले असावेत असें वाटतें ?

५

सिद्धसाधकांच्या दुकलींतील 'सिद्ध' कोण व 'साधक' कोण ?—ते



दोघे कसली साधना करीत होते ?—पिरत्यानें तात्यांचे कान कसे फुंकले ?

'देवांची सभा' कुठें व कशासाठीं भरली ? त्यांत देव काय बोलले ? सुंदरगांव व भैरवगांव येथील गांवकऱ्यांच्या वागणुकींत फरक कोणता होता ?

मातीच्या चिखलापेक्षां मडकें करणारा समाजांत जास्त श्रेष्ठ कसा ? सत्ताधीश मातीचा देव कसा करूं शकतो ?—

देवांना कर्ण सांपडला पण तो 'दरिद्री कर्ण' कसा म्हणायचा ?-सतीच्या कृपेनें व कर्णाच्या उदारतेनें अमृताचा झरा कसा पाझरूं लागला ?

तात्यांना हार पडला असता तर सापाचं वेटोळंच गळयांत पडल्यासारखं दचकण्याची त्यांच्यावर पाळी कां येती ?—

६

क्षुल्लक गोष्ट विकोपाला जाऊन अखेर देवदानवांची कुस्ती कशी जुंपली ? दानवानें वांकडा पेंच कोणता घेतला ?

"ठीक तर-आतां घरांत चारदोन महिन्यांच्या सर्पणाची तरी माझी चांगली व्यवस्था होईल !" हे कोणाचे शद्ब ? त्यांनें इंगळी डसावीशी कोणाची स्थिती झाली ?-का ? "तू गांवचा कर्ण असशील !-धर्म नव्हेस !" असें तात्या सदूला का म्हणाले ?

देवळांत तात्यांना सर्वांनीं जें कळकळपानें सांगितलें तें त्यांनीं ऐकलं का नाहीं ?-

पिरत्या आयत्या वेळीं का डगमगला ! तात्या कुऱ्हाडीसह पुढें झाले त्यावेळीं त्यांच्या मनांत आलेल्या विचारांची कल्पना करून एक नाट्यछटा तयार करा.

क्रिया-प्रतिक्रिया म्हणजे काय? चिमुकल्या कोषीतून वाढलेला विस्तार नाहीसा करून तात्या काय मिळवणार होते? तात्या दुसरा घाव घालणार इतक्यांत 'आकाशवाणी' कुठून झाली?-त्यामुळें तात्या कोलमंडले कां?—हा सारा झगडा कसला होता?...

७

तात्या पडल्यावर भोंवतालच्या मंडळीला काय वाटलें? सदूची हाल-चाल कोणती झाली?-सदू तसें का वागला?

कुऱ्हाडीच्या प्रसंगानें तात्यांच्या आयुष्यांत कोणती क्रान्ती झाली?—तात्यांच्या बदललेल्या सिंहासनाची व घराची स्थिती स्वतःच्या शद्बांत मांडा.

दुबळेपणा व शारीरिक व्यंगें यामुळें माणसाच्या मनः स्थितींत फरक कसा पडतो?-कां?

तात्यांच्या घरांत आनंद अवतरला त्यावेळचं वर्णन आकर्षकपणें करा.

तात्यांना पश्चात्ताप का झाला?-हस्तांदोलन करून नवा कारभार सुरू झाला त्यानें सारेच जाणारे येणारे सानंद आश्चर्यचकित का होत असत?-तात्यांची वागणूक इतकी बदलण्याचें कारण काय? हा बदल तुम्हाला नैसर्गिक वाटतो की नाही?-आपल्या व्यक्तिगत मताचें स्वतःच्या शद्बांत (अनुभवांतलीं उदाहरणें घेऊन) समर्थन करा.

८

आनंद जन्मानंतर सुंदरगांवानें प्रगतीपर कायापालट कसा केला?-मोहनराव मास्तरांनी गांवांत केलेल्या सुधारणा सांगून त्यांच्या स्वभावाचें एक छोटें शद्बचित्र तयार करा.

मोहनरावांना एकादशीच्या दिवशीं कोणत्या प्रकारचें स्नान सर्वांनी करावें असें वाटत होतें? त्यासाठीं त्यांनी आपली वागणूक कशी ठेवली?-त्याचा गांवकऱ्यांच्या मनावर प्रथम कोणता परिणाम झाला? मतमतांचा गलबला कसा झाला? का?...अखेर मोहनराव जिंकले कसे?—



"इथंच माझं पंढरपूर!" इथेंच म्हणजे कुठें?...असं कोणी म्हटलं? कां? "हे देव...नि ही त्यांची मंदिरें!" असें मोहनरावांनी गांवकऱ्यांना कसें पटविलें? त्या सहभोजनाच्या समारंभाशेवटीं मोहनरावांनी स्वतः रचलेला जो अभंग म्हटला त्यांतील कल्पनांचा स्वतःच्या शद्बांत विस्तार करा.

९

मोहनराव व मंजुळा यांचें लग्न कसें जमलें?-त्यावेळीं ज्या ज्या प्रकारच्या हालचाली तात्यांनी केल्या त्या पूर्वीच्या तात्यांच्या हातून कधींच घडल्या ना. मग हें सर्व घडलें तरी कसें?

लग्नसमारंभ व विद्यामंदिर—मुहूर्तमेढ समारंभ झाला त्यावेळीं देवांनी गांवकऱ्यांना जो उपदेश केला तो थोडक्यांत स्वतःच्या शद्बांत लिहा. त्यावेळीं गळ्यांत पडलेल्या पुष्पहारानें पंगू झालेले तात्या खरेखुरे आनंदित का झाले?

देव मामलेदारांचें १५।२० ओळींत स्वभावचित्र तयार करा.

१०

सुंदरगांवच्या नव्या जगांत नवे देव कोणते आले? मोहनरावांनी गांवकऱ्यांसाठीं कोणत्या अर्थपूर्ण घोषणा तयार केल्या? त्यांतील आशय स्वतःच्या शद्बांत लिहा. बापूजींच्या पत्रांतील उपदेश सुस्पष्ट पद्धतीनें लिहा.

त्या सर्व देखाव्याकडे पाहून तात्यांच्या मनांत कोणते विचार येत असत?-पूर्व घटना, चालू परिस्थिती व भावी काळचीं सुखस्वप्नें यांच्या

विचारांच्या बैठकीवर त्यांचें एक आकर्षक स्वगत भाषण सुमारें तीस ओळींत लिहा.

मंजीनें लिहिलेल्या नव्या धड्यांतून मंजीनें सुंदरगांवच्या पूर्व इतिहासाचें व भावी उज्वल काळाचें जें आकर्षक चित्र चिमुकल्या मुलांपुढें ठेवलें आहे तें निबंधरूपानें आपल्या शद्वांत मांडा.

११

तुम्हाला एका खेड्याचे प्रमुख केलें तर तुम्ही त्याची अद्यावत् सुधारणा घडवून आणण्यासाठीं एखादी पंचवार्षिक योजना कशी आंखाल? कोणकोणत्या टप्प्यानें तुम्ही त्या गांवाचा कायाकल्प घडवून आणाल?—

पुजारीदादांनी गोष्ट सांगायला सुरवात केली अशी कादंबरीला सुरुवात आहे. सारी गोष्ट त्यांनीच तुम्हाला सांगितली असें तुम्हाला अखेर वाटतें का?

सुरुवातीला गांवच्या वेशीपाशीं भेटलेला तो भयंकर अवलीया वेडा गोष्टींत तुम्हाला पुन्हां कोठें भेटला? त्याच्या पूर्वायुष्यांतील घटना व त्याच्या आयुष्याचा तो शेवट यांचा आधार घ्या व तो एकाएकी वेडातून भानावर येऊन अंबाईच्या झाडाखाली बसल्या बसल्या आज विचार करीत आहे अशी कल्पना करून त्याचे विचार आकर्षक पद्धतीनें मांडा.

१२

पुस्तक छपाईच्या वेळीं जुळवलेल्या टाइपमधील चुका सुधारण्यासाठीं 'प्रुफ करेक्शन' करतात. या छापून झालेल्या पुस्तकांतहि चुका राहिल्या आहेत. प्रुफ करेक्शनच्या पद्धतीनें त्या वाचतां वाचतां पेन्सिलीनें सुधारा.

"आम्ही खेडवळ माणसं" ही छोटी कादंबरी तुमच्याकडे अभिप्रायार्थ आली आहे असें समजून, तुमच्या नियतकालिकाचे जबाबदार संपादक या नात्यानें त्यावर गुणदोषविवेचक सविस्तर बरावाईट अभिप्राय तयार करा व पोस्टानें तो लेखकाकडे पाठवा.



II

-कथनशैली-

खालील प्रसंग-चित्रण स्वतः लक्षपूर्वक अभ्यासा

(१) अवलीयाची तिन्हीसांजेला भेट. (२) मिरेची अखेरची धडपड. (३) तात्या-सदूंची पहिली व दुसरी भेट. (४) सखू-माईंचें हितगुज व बुडकुल्याचें गुपित. (५) तात्या-पिरत्यांचा कट. (६) सदू आपली जमीन गांवाला देतो. (७) तात्यांनी सदूवर टाकलेला डाव. (८) गांवात कुन्हाडीनें केलेला गोंधळ. (९) तात्यांनी केलें तसें भरलें. (१०) अकल्पिक योगायोग व सदूची माणुसकी (११) बदललेल्या सुंदरगांवांतील तात्यांचे दिवस. (१२) मोहनरावांचा सत्याग्रहइ.

III

-वर्णनशैली-

खालील वर्णनांची शैली सूक्ष्म दृष्टीनें ध्यानीं घ्या—

(१) अवलीयाची प्रथम भेट (२) आग (३) मीरा-लखपतींचें आयुष्य (४) निसर्ग आणि मानव (५) भानिकतेचें सूत्र (६) देवळांत मानव व दानव (७) तात्यांचें सिंहासन (८) माईचें वृन्दावन (९) सदूचीं संकटें (१०) माईच्या घरीं मंजी; सदूचें जेवण (११) "पै न् पै बाकी चुकवायला आलोय् आज-" (१२) "मग झाड आपलं असलं तर आपलं" (१३) मंजीचं सपन (१४) "गप्प बस; पिरत्या!—सद्या रहला नाही आज-" (१५) पिरत्याचा धंदा (१६) भेरवगांवचा दरोडा (१७) अधिकाराचा मोठेपणा (१८) देवांची मागणी, तात्यांची टाळाटाळी व सदूचें दान. (१९) विहीरीचें बांधकाम (२०) अमृताचा झरा व पेढे (२१) तात्या–

पिरत्यांचा विहीरबांधणीनंतरचा संवाद (२२) आंब्याबाबतचा तात्या-सदूंचा अखेरचा संवाद (२३) देवळांत तात्यांभोंवतीं गांवकरी (२४) आंब्यावर कुन्हाड व गांवकऱ्यांचा मेळावा (२५) क्रिया-प्रतिक्रिया (२६) माईची रद-बदली (२७) आकाशवाणी व अधःपात (२८) सदूची उदारमनस्क सुश्रूषा (२९) बिछान्याला खिळलेले तात्या (३०) बाळ-जन्मापूर्वीची घालमेल (३१) सदूची नवी कारकिर्द (३२) आनंदाच्या आईच्या जिवाची गोड धडपड (३३) मोहनरावांची ग्रामसुधारणा (३४) एकादशीच्या दिवशीं (३५) गांवकऱ्यांना पडलेला पेंच (३६) सहभोजनाचा समारंभ (३७) सदबा तात्यांची मंजीच्या लग्नाची जुळवाजुळव (३८) विद्यामंदिराचें उद्‌घाटन (३९) देवांचा नव्या जोडप्याला आशीर्वाद. (४०) नवीन नवीन ग्राम-सुधारणा. (४१) तात्या-माईचा मुग्ध आनंद. (४२) 'नवीन घड्या'ची रचना.

IV

### भाषाशैली

या पुस्तकांतील प्रादेशीक शद्व, वाक्प्रचार म्हणी वाचतां वाचतां निवडून काढा व त्यांच्या उपयोगाचा अभ्यास करा.

---

—रघुवीर सामंत संपादित—

★

अमर ज्योति
वाङ्मय

★

**आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या !**

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

**मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवाङ्मय**